नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १६८ * | * नागपूर * | गुरुवार, दिनांक १८ सप्टेंबर २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## दादांच्या ताफ्यासमोर तरुणांचा आत्मदहनाचा प्रयत्न

■ वृत्तसंस्था, बीड, दि. १७ :
मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या कार्यक्रमासाठी बीडमध्ये आलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताफ्यासमोर दोन तरुणांनी आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने एकच खळबळ उडाली. पोलिसांनी तात्काळ दोन्ही तरुणांना ताब्यात घेतले आहे.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार ध्वजारोहण करण्यासाठी बीडमध्ये दाखल झाले, त्यांचा ताफा नगर नाका परिसरात येताच दोन तरुणांनी अंगावर ज्वलनशील पदार्थ ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. हे दोन्ही तरुण केज तालुक्यातील असून, त्यांच्या गावातील ग्रामपंचायतीच्या कामाच्या चौकशीची मागणी त्यांनी केली होती.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# काहीच ठाऊक नाही

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वर्षपूर्तीचा सोहळा आज देशभर साजरा करण्यात आला. गेली ११ वर्षे ते आपल्या देशाची धुरा वाहत आहेत. गतवर्षीच्या लोकसभा निवडणुकीपर्यंत मोदी साहेबांचा आलेख आणि त्यांचा ध्वज उंचच उंच उडत होता मात्र गेल्या निवडणुकीच्या निकालापूर्वी त्यांच्या सहकाऱ्यांनी ४०० पारचा नारा दिला होता. तो नारा वाऱ्यात उडाला आणि मग आपल्या दोनशे चाळीस खासदारांना घेऊन मोदी साहेबांनी मोदी सरकार ऐवजी एनडीएचे सरकार स्थापन केले म्हणजेच बनवले. हे सरकार सध्या योग्य प्रकारे चाललेले आहे पण आता आपले सुविद्य पंतप्रधान ज्या दोन घटनांमुळे अडचणीत आलेले दिसतात, ती बाब आता उघड झालेली आहे. त्यापैकी पहिली घटना म्हणजे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यापूर्वीच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत उभे असताना अमेरिकेच्या दौऱ्यावर आपले पंतप्रधान गेले होते. तिथे आपल्या पंतप्रधानांनी 'अब की बार ट्रम्प सरकार' असा नारा दिला होता. यावेळच्या अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीवेळी ट्रम्प यांच्या निमंत्रणानंतरही त्यांच्या भेटीला आपले पंतप्रधान गेले नाहीत. त्यामुळे अत्यंत लहरी लाला ट्रम्प त्याच्या स्वभावाप्रमाणे आणि लहरीप्रमाणे कोपिष्ट झाला की काय हा एक प्रश्न आपल्यासमोर उभा राहिलेला आहे. ट्रम्प यांनी आपला मित्र म्हणून गणलेल्या नरेंद्र मोदी यांच्याऐवजी पाकिस्तानच्या सैन्य प्रमुख मुनीर याला जवळ केले. त्याला मेजवानी देण्याच्या निमित्ताने व्हाईट हाऊसला बोलावले आणि त्यांच्याबरोबर जेवायला या, म्हणून भारतासारख्या मोठ्या देशाच्या पंतप्रधानांना मुद्दाम आमंत्रण दिले. चीनसह इतर अनेक देश रशियाकडून क्रूड ऑइल खरेदी करत आहेत, त्याच्याकडे कानाडोळा करून भारतावर जबरदस्त टेरिफ ट्रम्प यांनीच लावले. त्यानंतर वारंवार इन्कार करूनही फुशारकी मारणाऱ्या ट्रम्पला आपल्या देशाने सुनावले नाही आणि अजूनही हाच ट्रम्प, 'आपणच भारत आणि पाकिस्तान मधील लढाई थांबवली' अशा फुशारक्या जवळजवळ अडीच डझन वेळा मारतो आहे. ट्रम्पच्या अशा वागण्याच्या मुळाशी मोदीजींचे त्यांच्या मागच्या निवडणूक दरम्यान न भेटणे हेच एकमात्र कारण आहे असे आम्हाला वाटते. ट्रम्प तोंडाने कितीही गोड बोलत असेल तरी कृतीने भारताला पाण्यात पाहात आहे असे स्वच्छ दिसते. मोदींची दुसरी चूक म्हणजे लोकसभेच्या निवडणुकीच्या दरम्यान वृत्तपत्रांना मुलाखती देताना त्या वेळेचे भाजपचे अध्यक्ष जेपी नड्डा यांनी आता आम्हाला संघाची गरज नाही असे उद्गार काढून खड्डा खणला होता. हे उद्गार काढल्यानंतर ज्या ज्या ठिकाणी मतदान झाले त्या त्या ठिकाणी संघाने आपला हिसका दाखवला. कारण ४०० पारची गाडी २०० वर अडवली गेली. त्यातल्या त्यात चाळीस जागा काठावर बहुमत मिळाल्यामुळे जिंकता आल्या, हे मत गणनेवरून दिसून येतच आहे. आपल्या मुंबई शहराचा विचार केला तर कोणीतरी एक अमोल जागा जिंकली होती पण त्याच जागी किर्तीवंत अमोलला निसटता पराभव स्वीकारावा लागला. त्यानंतर संघाला पुचकारण्याचे म्हणजेच चूचकारण्याचे अनेक प्रयत्न झाले. मोदी यांनी संघ स्थानावर स्वतःची पाय धुळ झाडून संघ नायकांना वंदन केले. तरी संघ काही विरघळलेला दिसत नाही. विरोधी पक्षाने गेल्या निवडणुकीपूर्वी अनेक आरोप केले होते पण त्याचा पुरावा तेव्हा विरोधी पक्षाजवळ नव्हता. आता विरोधी पक्षाने पुराव्यानिशी अनेक आरोप केले आहेत ते खरे आहेत की खोटे आहेत, हे आम्हाला ठाऊक नाही. त्यांनी दिलेले किंवा दाखवलेले पुरावे खरे आहेत की खोटे आहेत हेही आम्हाला ठाऊक नाही. निवडणूक आयोग त्याची चौकशी का करत नाही हे ही आम्हाला ठाऊक नाही. भारतीय जनता पक्षात काही असंतुष्ट आत्मे असतील, तर ते आहेत की नाहीत हे ही आम्हाला ठाऊक नाही. सर्वोच्च न्यायालय सरकारच्या विरोधात अनेक निर्णय का देत आहे हेही आम्हाला ठाऊक नाही. आपल्या आईचा अपमान करणारे जे कोणी असतील त्यांना न्यायालयात का खेचले जात नाही हे ही आम्हाला ठाऊक नाही. अशा अनेक रहस्यमय बाबी दररोज कशा उघड होतात हेही आम्हाला ठाऊक नाही. ठाऊक आहे ते एवढेच आहे की या सर्व संकटांना आपले पंतप्रधान पुरून उरलेले आहेत आणि त्यांची देशसेवा यापुढेही अशीच राहणार आहे. त्यांची घणाघाती वक्तव्ये जनतेसमोर जशी पूर्वी येत होती तशीच येणार आहेत. आम्ही वर म्हटल्याप्रमाणे मोदीजींच्या या दोन चुकांचे परिमार्जन न झाल्यामुळे काही विपरीत गोष्टी घडत आहेत का, याचा विचार जाणकारांनी करावा. कारण या सगळ्यातले आम्हाला काहीच ठाऊक नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## राज्यातील १ कोटी महिलांना

# लखपती दीदी बनवणार!

■ वृत्तसंस्था
छत्रपती संभाजीनगर, दि. १७ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील किनगाव येथे 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना'चा राज्यस्तरीय शुभारंभ केला. यावेळी बोलताना त्यांनी राज्यातील एक कोटी महिलांना 'लखपती दीदी' बनवण्याचा संकल्प व्यक्त केला.

हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम किनगाव (ता. फुलंब्री) येथील देवगिरी सहकारी साखर कारखान्याच्या आवारात आयोजित करण्यात आला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे आणि मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधून हा शुभारंभ करण्यात आला. हे अभियान १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत सर्व ग्रामपंचायतींमध्ये राबवले जाईल.

या सोहळ्यास राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, खासदार डॉ. कल्याण काळे, संदीपान भुमरे, आमदार अनुराधा चव्हाण आणि आमदार संजना जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे आश्वासन : समृद्ध पंचायतराज अभियानाचा किनगाव येथे शुभारंभ

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणाची सुरुवात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या शुभेच्छा देऊन केली. मराठवाड्याला दुष्काळमुक्त करण्याचा निर्धार व्यक्त करत ते म्हणाले की, 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' हे केवळ योजनांची अंमलबजावणी करून लाभ देणारे अभियान नाही, तर ते प्रत्येक ग्रामस्थाला स्वाभिमानाने जगायला शिकवणारे अभियान आहे. लोकसहभाग हा या अभियानाचा मूळ गाभा आहे.

फडणवीस यांनी सांगितले की, महिलांना केवळ १५०० रुपयांवर अवलंबून राहावे लागू नये यासाठी त्यांना महिला बचत गटांच्या माध्यमातून उद्योग व्यवसायासाठी आर्थिक सहाय्य दिले जाईल. प्रत्येक गावात महिलांसाठी एक पतसंस्था सुरू करून जिल्हा बँकेमार्फत त्यांना एक लाख रुपयांचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून दिले जाईल. यातून राज्यातील एक कोटी महिलांना 'लखपती दीदी' बनवण्याचा शासनाचा संकल्प आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी या अभियानातील पारितोषिक योजनेची माहिती दिली. या स्पर्धेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना एकूण २५० कोटी रुपयांची पारितोषिके दिली जाणार आहेत. तालुकास्तरावर प्रथम १५ लाख, द्वितीय १२ लाख आणि तृतीय ८ लाख रुपये, जिल्हास्तरावर प्रथम ५० लाख, द्वितीय ३० लाख आणि तृतीय २० लाख रुपये तर राज्यस्तरावर प्रथम ५ कोटी, द्वितीय ३ कोटी आणि तृतीय २ कोटी रुपयांची बक्षिसे दिली जातील. इतकी पारितोषिके देणारी ही देशातील पहिलीच योजना असल्याचे त्यांनी नमूद केले.

## क्लोरीन गॅस गळतीमुळे चंद्रपूर शहरात घबराट

शेकडो नागरिक बाधित

■ प्रविण बतकी, चंद्रपूर, दि. १५ :
चंद्रपूर शहरात बुधवारी संध्याकाळी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातून (एसटीपी) मोठ्या प्रमाणात क्लोरीन गॅस गळती झाल्याने शेकडो रहिवाशांना गंभीर आरोग्य समस्यांना तोंड द्यावे लागल्याने रहमतनगर परिसरात घबराट पसरली. ही घटना सायंकाळी घडली.

एसटीपी परिसरातील स्थानिक नागरिकांना अचानक क्लोरीनचा तीव्र वास आला.रहिवाशांनी डोळे, नाक आणि घशात जळजळ, सतत खोकला, शिंका येणे, श्वास घेण्यास त्रास होणे, छातीत जळजळ होणे आणि काही प्रकरणांमध्ये मळमळ आणि उलट्या होत असल्याचे सांगितले.

जवळच्या मशिदीत नमाज अदा करणाऱ्या डझनभर लोकांना नमाज दरम्यान थेट गॅसचा संपर्क आला, ज्यामुळे परिसरात तीव्र लक्षणे दिसू लागली ज्यामुळे परिसरात भीती निर्माण झाली. चंद्रपूर महानगरपालिकेने (सीएमसी) २०११-१२ मध्ये बांधलेला हा एसटीपी इरई नदीच्या काठावर आहे. परंतु रहमत नगरमध्ये दाट लोकवस्ती असलेल्या गृहसंकुलांनी वेढलेला आहे. गॅस गळतीचे कारण अद्याप अस्पष्ट आहे.

या घटनेला दुजोरा देताना, सीएमसीचे अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील यांनी सांगितले की, उपाययोजना केल्या जात आहेत. त्यांनी सांगितले की, एसटीपी ऑपरेशन आणि देखभालीसाठी महानिर्मितीला देण्यात आला आहे. तथापि, महानिर्मितीच्या अधिकाऱ्यांनी संपर्क साधला नाही तोपर्यंत त्यांना गळतीची माहिती नव्हती असा दावा केला. परिस्थिती बिकट होताच, पोलिस आणि अग्निशमन दलाचा एक बंब घटनास्थळी दाखल झाला. अधिकाऱ्यांनी तात्काळ परिसरातील सुमारे २०० कुटुंबांना बाहेर काढले आणि त्यांना तात्पुरत्या निवारासाठी ज्योतिबा फुले महानगरपालिका शाळेत हलवले. तथापि, वैद्यकीय पथके संध्याकाळी उशिरापर्यंत बाधित भागात पोहोचली नव्हती, त्यामुळे रुग्णालयात दाखल झालेल्यांची संख्या अनिश्चित होती.

चंद्रपूर सुपर थर्मल पॉवर स्टेशनचे उपमुख्य अभियंता भूषण शिंद यांनी दावा केला की प्रकल्प बंद करण्यात आला आहे आणि गळती रोखण्यात आली आहे. वायूचा प्रसार रोखण्यासाठी उपाययोजना सुरू असून, गळतीची कारणे शोधण्यासाठी केमिस्टची एक तज्ज्ञ टीम प्लांटमध्ये पाठवण्यात आली आहे.

## दोन महिला नक्षलवादी चकमकीत ठार

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. १५ :
एटापल्ली तालुक्याच्या जांबिया-गट्टा पोलीस हद्दीतील मोडस्के जंगल परिसरात बुधवारी सकाळी झालेल्या चकमकीत दोन जहाल महिला नक्षलवाद्यांना ठार करण्यात गडचिरोली पोलिसांना यश आले. चकमकस्थळी शोधमोहीम सुरूच असल्याने मृतांचा आकडा वाढू शकतो, असे पोलीस सूत्रांनी सांगितले.

१७ सप्टेंबर रोजी जांबिया गट्टा पोलीस स्टेशन हद्दीतील मोडस्के जंगल परिसरात गट्टा दलमचे काही जहाल नक्षल लपून बसल्याची गोपनीय माहिती पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांना मिळाली होती. अहेरीचे अपर पोलीस अधीक्षक सत्य साई कार्तिक यांच्या नेतृत्वात नक्षलविरोधी पथक सी ६० च्या पाच तुकड्या अभियानासाठी रवाना करण्यात आल्या. यावेळी गट्टा पोलीस दल आणि सीआरपीएफ जवानांनी परिसराला वेढा घातला होता.

लपून बसलेल्या नक्षलवाद्यांनी जवानांच्या दिशेने जोरदार गोळीबार केला. जवानांनीही त्याच तीव्रतेने प्रत्युत्तर दिले. पोलिसांचा वाढता दबाव बघून नक्षलवाद्यांनी जंगलाच्या दिशेने पळ काढला. दरम्यान जवानांनी घटनास्थळी शोध घेतला असता दोन महिला नक्षलवाद्यांचे मृतदेह, शस्त्र व साहित्य आढळून आले.

## हा नवा भारत आहे..

# घरात घुसून मारतो!



■ वृत्तसंस्था, धार, दि. १७ :
भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा बुधवारी ७५ वा वाढदिवस होता जगभरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव झाला.

मध्य प्रदेशच्या धार जिल्हातून बोलताना नरेंद्र मोदी म्हणाले की, पाकिस्तानातून आलेल्या दहशतवाद्यांनी आमच्या बहिणींचे सिंदूर उजाडले, आम्ही ऑपरेशन सिंदूर करून दहशतवादी ठिकाणे उद्धवस्त केली. आमच्या वीर जवानांनी पाकिस्तानला गुडघ्यावर आणले. आता कालच देश आणि जगाने बघितले की, पुन्हा एकदा पाकिस्तानी दहशतवाद्यांनी रडून रडून आपली परिस्थिती सांगितली आहे. हा नवीन भारत आहेह्वहा कोणाच्या परमाणू धमकींना भीत नाही.

पुढे मोदी म्हणाले, हा नवीन भारत आहे, घरात घुसून मारतो, आजच्याच दिवशी भारतीय सैन्याने अनेक अत्याचारापासून हैद्राबादला मुक्त केले. त्यांच्या अधिकारांची रक्षा करत भारताच्या गौरवाला प्रस्थापित केले होते.

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिवस आम्हाला प्रेरणा देतो. भारताच्या आन, बाण शानपेक्षा काहीही मोठे नाही. आम्ही जगलो तरीही देशासाठी, प्रत्येक क्षण देशासाठी समर्पित होवो, असेही त्यांनी म्हटले.

### नव्या स्टाईलने आंदोलन

■ धाराशिव, दि. १७ :
मराठा समाजाच्या आरक्षणात फसवणूक केली जर काही मागे-पुढे केले तर आपण दसऱ्यापर्यंत सांगितले आहे. नंतर मराठा समाजाचे आंदोलन वेगळ्या स्टाइलने उभे राहणार. पुन्हा सरकारला मान खाली घालूनच चालावे लागेल, असा इशारा मनोज जरांगे यांनी सरकारला दिला आहे.

## बीड-अहिल्यानगर रेल्वे

# गोपीनाथ मुंडेंना अर्पण

■ वृत्तसंस्था, बीड, दि. १७ :
अनेक वर्षांची प्रतीक्षा, तीन पिढ्यांचे स्वप्न आणि अथक प्रयत्नांनंतर अखेर आज मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या मुहूर्तावर बीडच्या भूमीवर रेल्वे धावली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी रेल्वेला हिरवा झेंडा दाखवला. बीडमध्ये सुरू झालेली ही रेल्वे गोपीनाथ मुंडेंना अर्पण करतो असे वक्तव्य फडणवीस यांनी केले.

### पंकजा मुंडे भावूक



कष्टाळू आणि कर्तृत्ववान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे ही रेल्वे सुरु होत आहे, असे म्हणत पंकजा मुंडे यांनी केशर काकू क्षीरसागर यांच्यापासून ते बजरंग बप्पा सोनवणे, प्रीतम मुंडे यांची भूमिकाही महत्त्वाची राहिली आहे. गोपीनाथराव मुंडे यांच्या काळात ४५० कोटींचा निधी आला होता. या रेल्वेला अखेर स्वरूप मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. या प्रसंगी पंकजा मुंडे भावूक झाल्याचे पाहायला मिळाले.

# ईव्हीएम मतपत्रिकेवर आता उमेदवारांचे रंगीत छायाचित्र

मोठ्या अक्षरात असतील नावे : बिहार निवडणुकीपासून सुरुवात




■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. १७ :
ईव्हीएम मतपत्रिकेवर आता उमेदवारांचे रंगीत छायाचित्रे असतील. उमेदवारांचे क्रमांक आणि फॉन्ट आकार मोठा असेल, ज्यामुळे मतदारांना ते वाचणे आणि पाहणे सोपे होईल.

एएनआय वृत्तसंस्थेनुसार, निवडणूक आयोग बिहार विधानसभा निवडणुकीपासून या उपक्रमाची सुरुवात करेल. यासाठी निवडणूक आयोगाने मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.

निवडणूक आयोगाने सांगितले की, मतदारांची सोय आणि निवडणूक प्रक्रिया सुधारण्यासाठी गेल्या सहा महिन्यांत राबविण्यात आलेल्या २८ सुधारणांचा हा एक भाग आहे. ईव्हीएम मतपत्रिकेत सर्व उमेदवारांची नावे, निवडणूक चिन्हे आणि छायाचित्रे असतात. मतदार हे पाहून मतदान करतात.

आयोगाने म्हटले आहे की, निवडणूक नियम, १९६१ च्या नियम ४९ब अंतर्गत, ईव्हीएम मतपत्रिकेच्या डिझाइन आणि छपाईसाठी स्पष्टता आणि वाचनीयता वाढविण्यासाठी सुधारणा करण्यात आल्या आहेत.

ईव्हीएम मतपत्रिकेत फॉन्ट आकार ३० आणि ठळक अक्षरात असेल

आयोगाने सांगितले की नोटा क्रमांक आंतरराष्ट्रीय स्वरूपात भारतीय अंकांमध्ये छापले जातील.

## आंदोलकांनी दाखवले काळे झेंडे

### मराठा समाजाला ओबीसी आरक्षण देण्याचा निषेध

■ वृत्तसंस्था
छ. संभाजीनगर, दि. १७ :
येथील सिद्धार्थ उद्यानात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी काही आंदोलकांनी काळे झेंडे दाखवून निषेध नोंदवला. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी हैदराबाद गॅझेट लागू केल्यामुळे ओबीसी समाजाचा संताप या निषेधातून व्यक्त झाला.



आंदोलकांनी हैदराबाद गॅझेट रद्द करण्याची मागणी केली आणि ओबीसींवर अन्याय करू नका अशा घोषणा दिल्या.

ओबीसी समाज संघटनेचे रामभाऊ पेरकर यांच्यासह चार जणांनी हा निषेध केला. पोलिसांनी तात्काळ आंदोलकांना ताब्यात घेतले. या घटनेवर मुख्यमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली.

श्री स्वामी समर्थ बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ
मालेगाव, जि. वाशिम

सौ रंजनाताई
अरविंदराव देशमुख
(सचिव)



आपणास
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

*शुभेच्छुक*
श्री पी. आर देशमुख (मुख्याध्यापक)
• कु. पी. आर. रहाटे ( सहा. शिक्षक) • श्री आर. वाय. पोघे (सहा. शिक्षक) • श्री जे. यु. देवकर ( सहा. शिक्षक)
• कु. बी. एम. खोटे (सहा. शिक्षक) • कु. जे. एन. सरकटे (सहा. शिक्षक) • श्री. एन. एन. घुगे (सहा. शिक्षक)
• श्री. एस. एस. काकडे (सहा. शिक्षक) • श्री. एस बी आखरे (सहा. शिक्षक) • श्री एस. एम खिल्लारे (सहा. शिक्षक)
• कु. एस. एन. फुटाणे (सहा. शिक्षक) • श्री.एस. एन. भालेराव (सहा. शिक्षक) • कु. एस. आर. रोठे (सहा. शिक्षक)
सर्व कर्मचारी वृंद

बाल शिवाजी मराठी विद्यानिकेतन व
माध्यमिक विद्यालय मालेगाव जि. वाशिम

# मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी छत्रपती संभाजीनगर येथे ध्वजारोहण

## मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी अथकपणे काम करू : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी
छत्रपती संभाजीनगर, दि. १७ :
मराठवाड्याची सर्वांगीण प्रगती करण्यासाठी उद्योग आणि त्यातून रोजगार निर्मिती, कृषि, पायाभूत सुविधा विकास अशा सर्व क्षेत्रात अथकपणे काम करू, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन कार्यक्रमात दिली.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सिद्धार्थ उद्यानात मराठवाडा मुक्ती संग्राम स्मृतिस्तंभ येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. प्रारंभी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्मृतिस्तंभाला पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. पोलीस दलातर्फे शस्त्र सलामी, मानवंदनेनंतर ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, राज्यसभा सदस्य खासदार डॉ. भागवत कराड, खासदार डॉ. कल्याण काळे, खासदार संदिपान भुमरे, आमदार सर्वश्री सतीश चव्हाण, प्रशांत बंब, प्रदीप जैस्वाल, विलास भुमरे, आमदार संजना जाधव, विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी खासदार



चंद्रकांत खैरे, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, महापालिका आयुक्त जी. श्रीकांत, पोलीस आयुक्त प्रविण पवार, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, निजामाच्या जुलमी राजवटीतून मराठवाड्याला मुक्त करण्यासाठी मोठा लढा उभारला, यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, रवीनारायण रेड्डी, देवीसिंगजी चव्हाण, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंग नाईक, विजेंद्र काबरा, बाळासाहेब परांजपे, काशिनाथ कुलकर्णी, दगडाबाई शेळके, विठ्ठलराव काटकर, हरिश्चंद्र जाधव, जनार्धन होरटीकर गुरुजी, सूर्यभान पवार, विनायकराव चारठाणकर अशा अनेक जणांनी स्वातंत्र्यसंग्रामात पुढाकार घेऊन काम केले. त्यांच्यासोबत असंख्य लोकांनी रझाकारांच्या जुलूमातून मराठवाड्याला मुक्त केले. भारत स्वतंत्र झाल्यानंतर जवळपास १३ महिने हा रणसंग्राम चालला आणि त्यातून मराठवाड्याला मुक्ती मिळाली आणि म्हणूनच हा दिवस केवळ मराठवाड्याच्या मुक्तीचा दिवस नाही, तर एकसंघ भारत निर्मितीचा दिवस म्हणून देखील या दिवसाकडे आपण पाहू शकतो. या सर्व लोकांचा आदर ठेवत मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव प्रयत्न करणे आपले कर्तव्य आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

अतिवृष्टीमध्ये दगावलेल्यांना श्रद्धांजली अर्पण करत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या सर्वांना राज्य सरकारच्या वतीने तात्काळ मदत देण्यात येईल आणि मराठवाड्यातल्या अतिवृष्टिग्रस्त शेतकरी किंवा गावकरी त्यांच्या पाठीशी हे सरकार निश्चितपणे उभे असल्याची ग्वाही दिली.

मराठवाड्याचा दुष्काळ भूतकाळ करायचा आहे, यासाठी कृष्णा खोऱ्यातले पाणी हे मराठवाड्यापर्यंत आणले. दुसऱ्या टप्प्यामध्ये सांगली आणि कोल्हापूरचे पुराचे पाणी हे पुन्हा उजनीपर्यंत आणून ते मराठवाड्यात आणण्यात येणार आहे. उल्हास खोऱ्याचे ५४ टीएमसी पाणीदेखील मराठवाड्यामध्ये आणण्यात येईल. गोदावरीच्या खोऱ्यातील तूट दूर करून यासंदर्भात प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत हे पाणी पोहोचवण्याचे काम निश्चितपणे सरकारच्या माध्यमातून केले जाईल. डिसेंबरपर्यंतचा डीपीआर तयार होईल आणि त्यानंतर जानेवारी- फेब्रुवारी मध्ये याची निविदा प्रक्रिया पार पाडली जाईल असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले. छत्रपती संभाजीनगर येथे २०२३ मध्ये झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाची गतीने अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. घृष्णेश्वर मंदिराला ६१ कोटी रुपये दिले आहेत, तुळजाभवानी मंदिरासाठी ५४१ कोटींची तरतूद केली तर औंढा नागनाथ आराखड्याला मंजुरी दिली आहे. मानव विकास कार्यक्रमांतर्गत ९४ बसगाड्या दिल्या असून छत्रपती संभाजीनगरला ११५ बसेस दिल्या आहेत. ९१६ अंगणवाड्यांची सुरुवात केली, २६५०० नवीन बचतगट तयार करून त्यामध्ये २.७० लाख महिलांना जोडले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत ९५ कोटींचा निधी वितरित केला. विविध स्मारके, मंदिरे यासाठी २५३ कोटी रुपये दिले, ३९२१ कोटींच्या रस्त्यांची कामे सुरू केली, जी प्रगतीपथावर आहेत. ४४ लाख सिंचन विहिरी पैकी ३० हजार विहिरी पूर्ण केल्या, आणि १.११लाख एवढ्या सिंचन विहिरींचे काम सुरू केले आहे. मंत्रिमंडळाची बैठक ही केवळ एक औपचारिकता नव्हती तर त्यात घेतलेल्या एकेका निर्णयावर कार्यवाही करण्याचे काम सुरू असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी २७०० कोटी रुपयांची योजना सरकारने मंजूर केली आणि महानगरपालिकेचा ८०० कोटीचा हिस्सा देखील भरण्याचा निर्णय घेतला.

## सामाजिक विण दुबळी होता कामा नये : शरद पवार



पुणे : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी राज्यात आरक्षणाच्या मुद्यावर सुरू असलेल्या आंदोलनांमुळे सामाजिक विण दुबळी होत असल्यावर चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी या प्रकरणी राज्य सरकारला रास्त तोडगा काढण्याचा सल्ला दिला आहे. आज मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन साजरा केला जात आहे. आज आनंदाचा दिवस आहे. पण दुर्दैवाने तसे चित्र दिसत नाही. सध्या दोन समाजात कारण नसताना वातावरण ढवळून निघत आहे. त्यामुळे सरकारने सर्वांमध्ये एकवाक्यता कशी येईल हे पाहिले पाहिजे, असे ते म्हणाले. महायुती सरकारने मराठा समाजाला कुणबी आरक्षण देण्यासाठी नुकताच एक जीआर काढला. या जीआरमुळे मराठवाड्यातील मराठा समाजाला हैदराबाद गॅझेटमधील नोंदींच्या आधारावर कुणबी अर्थात ओबीसी आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पण यामुळे ओबीसी बांधव नाराज झालेत. त्यांनी मराठा समाजाला ओबीसी आरक्षण देण्यास कडाडून विरोध केला आहे. त्यातच बंजारा समाजाने हैदराबाद गॅझेटमधील नोंदीनुसार आपल्या समाजाला एसटी अर्थात अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याची मागणी केली आहे. त्यावर आदिवासी बांधवांनी आक्षेप घेतला आहे. या प्रकरणी एक समाज दुसऱ्या समाजाविरोधात उभा टाकत असताना शरद पवारांनी सरकारला या मुद्यावर रास्त तोडगा काढण्याचे व सर्वांमध्ये एकवाक्यता निर्माण करण्याचे आवाहन केले आहे.

## रब्बी हंगामासाठी युरियाचा तुटवडा टाळा : दत्तात्रय भरणे



मुंबई : रब्बी हंगामात शेतकऱ्यांना युरियाचा तुटवडा भासू नये म्हणून महाराष्ट्राचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केंद्र सरकारकडे तातडीने अतिरिक्त पुरवठ्याची मागणी केली आहे. सध्या राज्यातील युरियाचा साठा केवळ २.३६ लाख मेट्रिक टन इतकाच असून, खरीपातील वाढलेल्या पेरणीमुळे आणि मक्याच्या क्षेत्रात झालेल्या तब्बल ५४ टक्के वाढीमुळे खताची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यासाठी १२ लाख मेट्रिक टन युरियाच्या प्रस्तावाला मंजुरी देण्याची विनंती भरणे यांनी रसायन व खत मंत्री जे.पी. नड्डा यांना पत्राद्वारे केली आहे. राज्याला एप्रिल ते जुलै या कालावधीत केंद्राकडून १०.६७ लाख मेट्रिक टन युरियाचे वाटप होणे अपेक्षित होतं, मात्र, एकूण युरिया खतापैकी फक्त ७८% म्हणजे ८.४१ लाख मेट्रिक टन युरियाचा पुरवठा करण्यात आला. त्यातच ऑगस्ट महिन्यात २.७९ लाख मेट्रिक टन वाटपातील केवळ ०.९६ लाख मेट्रिक टन पुरवठा मिळाला आहे. राज्यात खरीप हंगामातील पेरणी ९८ टक्के पूर्ण झाली असून, एकूण पेरणी क्षेत्र १४४ लाख हेक्टर आहे. विशेष म्हणजे, यंदा १४.३० लाख हेक्टरवर मक्याची पेरणी झाली असून मका पेरणी तब्बल ५४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे कापूस, मका आणि इतर पिकांसाठी टॉप ड्रेसिंग डोसची मागणी वाढली आहे.

## राज्यात ओला दुष्काळ जाहीर करा : सुप्रिया सुळे



पुणे : गेल्या 4 महिन्यांपासून ( 15 मे ते 15 सप्टेंबर) सतत पाऊस पडत आहे. राज्यात अतिवृष्टी होत आहे. त्यामुळे मी महाराष्ट्र सरकारला विनंती केली आहे की दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मुख्यमंत्री यांनी जो शब्द दिला होता की आमचे सरकार आल्यावर सरसकट कर्जमाफी देऊ हे शब्द पाळावा आणि राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, राज्यामध्ये गेल्या काही महिन्यांपासून प्रचंड अस्वस्थता आहे. सरकारने जो जी आर काढला आहे त्यातून नक्की कुणाला आरक्षण मिळाले आहे हे कुणालाच समजत नाहीये. सरकारकडून कन्फ्युजिंग सिग्नल हे सरकार देत आहे, असे सुळे यांनी म्हटले आहे. तर ओला दुष्काळ, राज्याची आर्थिक परिस्थिती असे अनेक विषय राज्यात असल्याची आठवण त्यांनी सत्ताधाऱ्यांना करुण दिली.

## मीनाताई ठाकरे पुतळ्याची विटंबना शिवसैनिकांचा संताप उसळला



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :
दादरमधील शिवाजी पार्क मैदानावरील माँसाहेब मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर आज सकाळी अज्ञात इसमाने लाल रंग फेकल्याने तणाव निर्माण झाला आहे. या प्रकरणाची दखल गृहखात्याने घेतली आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी पोलिसांची तीन विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत. दोषींना लवकरात लवकर शोधून कारवाई करू, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली.

दादरच्या शिवाजी पार्क मैदानाच्या प्रवेशद्वारावर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्नी मीनाताई ठाकरे यांचा पुतळा उभारण्यात आला आहे. मीनाताई ठाकरे यांना शिवसैनिकांमध्ये त्यांच्याबद्दल अत्यंत आदराचे स्थान आहे. शिवाजी पार्कला येणारे शिवसैनिक माँसाहेबांच्या पुतळ्यासमोर नतमस्तक होतात.

कडेकोट पोलीस बंदोबस्त

या पुतळ्यावर बुधवारी सकाळी कुणी तरी लाल रंग टाकलयाचे आढळले. ही बातमी पसरतात संतप्त शिवसैनिकांनी शिवाजी पार्क मैदानात गर्दी केली. यामुळे मोठा तणाव निर्माण झाला होता. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन या परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

हा विषय आमच्यासाठी अत्यंत भावनिक आहे. माँसाहेब तमाम शिवसैनिकांच्या आई होत्या. दोषींना शोधून त्यांच्याविरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलिसांना देण्यात आले आहेत. यासाठी पोलिसांची तीन विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली.

## राज्यभरातील ३९४ नगरपरिषदा, नगरपंचायतींमध्ये नमो उद्यान

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :
राज्यातील सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये वैशिष्ट्यपूर्ण व नविन नगरपंचायत,नगरपालिका योजने अंतर्गत एक उद्यान विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी प्रत्येकी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करतानाच या उद्यानांना नमो उद्यान नाव देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केली.




यानिर्णयामुळे राज्यातील एकूण ३९४ नगरपरिषद आणि नगरपंचायतींमध्ये नमो उद्यान वर्षभरात विकसित करण्यात येतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्राने दिलेली ही भेट असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले. नव्याने विकसित झालेल्या या उद्यानांची विभागीय स्तरावर स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. त्यामाध्यमातून प्रत्येक विभागातून ३ नगरपरिषद/नगरपंचायतींना बक्षिसे देखील देण्याचा निर्णय शिंदे यांनी जाहीर केला आहे. नमो उद्यानांच्या स्पर्धेत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे पारितोषीक संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना जाहिर करण्यात येतील. त्यामध्ये प्रथम क्रमांकासाठी पाच कोटी, द्वितीय तीन तर तृतीय क्रमांकासाठी एक कोटी रुपये अशी बक्षिसाची रक्कम अतिरिक्त विकास निधी म्हणून विजेत्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींना देण्यात येणार आहे.

## वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्यात वाढ

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १७ :
मागासवर्गीय मुला-मुलींच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी तसेच त्यांना समाजातील इतर घटकांप्रमाणे जीवन जगता यावे आणि सर्व प्रकारचे शिक्षण व उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात विभागांतर्गत शासकीय वसतिगृहे ही योजना राबविण्यात येते. झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत शासकीय वसतिगृहांतील प्रवेशित विद्यार्थ्यांना देण्यात येणारा निर्वाह भत्ता तसेच मुलींना स्वच्छता प्रसाधनासाठी देण्यात येणाऱ्या भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला असून ही वाढ दि. १ सप्टेंबर २०२५ पासून लागू करण्यात येणार असल्याचे संजय शिरसाट यांनी सांगितले.

## राज्यात नमो पर्यटन कौशल्य कार्यक्रम राबवणार : शंभूराज देसाई

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १७ :
प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून पर्यटन विभागामार्फत राज्यातील ७५०० युवांना प्रशिक्षण देण्याचा नमो पर्यटन कौशल्य कार्यक्रम व पर्यटकांना सुविधा देणारे नमो पर्यटन माहिती व सुविधा केंद्र पाच ठिकाणी उभारण्यात येणार आहे. 'नमो पर्यटन' उपक्रम स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी देत, जागतिक पर्यटकांना आकर्षित करेल. हा उपक्रम प्रधानमंत्री यांच्या सर्वसमावेशक आणि आत्मनिर्भर



भारताच्या संकल्पनेचे मूर्त स्वरूप आहे, अशी माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. मेघदूत बंगला येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत पर्यटनमंत्री शंभूराज देसाई बोलत होते.

यावेळी माजी मंत्री आमदार दीपक केसरकर, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव डॉ.अतुल पाटणे, पर्यटन संचालक डॉ.बी.एन.पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे उपस्थित होते. 'नमो पर्यटन कौशल्य कार्यक्रम': स्थानिकांना सक्षम बनवणे या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमांतर्गत ७ हजार ५०० स्थानिक युवक-युवतींना आदरातिथ्य आणि मार्गदर्शक म्हणून जागतिक दजार्चे प्रशिक्षण दिले जाईल.

## बाणेर परिसरात १३ वर्षीय मुलावर लैंगिक अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १७ :
शाळेतून घरी जात असलेल्या एका 13 वर्षीय मुलाला रस्त्यात अडवून त्याच्या ओळखीतील एका अल्पवयीन मुलाने लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी एका 17 वर्षीय अल्पवयीन मुलाविरुद्ध बाणेर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत पीडित मुलाच्या आईने बाणेर पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात फिर्याद दिली आहे.

त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, अल्पवयीन आरोपी विरुद्ध बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित 13 वर्षीय मुलगा 11 सप्टेंबर रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास शाळेतून घरी निघाला होता.

त्यावेळी आरोपी अल्पवयीनाने त्याला रस्त्यातच अडवले. खेळायला जाऊ असा बहाणा केला. त्यानंतर मुलाला शाळेच्या परिसरात एका झाडाजवळ नेऊन त्याला पैसे देण्याचे आमिष दाखविले. मुलावर त्याने बळजबरीने लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. मुलाने त्याला विरोध केल्यानंतर त्याला जीवे मारण्याची धमकी देऊन त्याच्यावर अत्याचार करण्यात आल्याचे तक्रारीत सांगण्यात आहे. पोलिस उपनिरीक्षक एस सानप पुढील तपास करत आहेत.

## महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करावा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :
राज्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने तब्बल ३० जिल्ह्यांत नुकसान झाले आहे. राज्यातील १७ लाख ८५ हजार ७१४ हेक्टर इतके क्षेत्र या पावसाने बाधित झाले आहे. आधीच शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली नाही त्यात शेतातील पीक देखील हातातून गेले आहे. त्यामुळे बळीराजा अडचणीत आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना राज्य सरकारने तातडीने मदत करावी अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवर यांनी केली आहे.



विजय वडेट्टीवारांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

राज्यात मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे.सोयाबीन, मका, कापूस या पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी वडेट्टीवर यांनी केली. शेतकऱ्यांचा रब्बी हंगाम धोक्यात येण्याची शक्यता आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करावी. तसेच बँकेकडून शेतकऱ्यांची होणारी वसुली थांबवावी, पिक विमा कंपन्यांनी तातडीने शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी वडेट्टीवार यांनी आपल्या पत्रात केली आहे.

मंत्रिमंडळाच्या बैठकीकडे बळीराजा आस लावून बसला होता की त्याला काही मदत मिळेल पण या बैठकीत देखील शेतकऱ्यांसाठी काही निर्णय झाला नाही.शेतकरी निराश झाला आहे. त्यांना तातडीने मदतीची गरज आहे. राज्यातील पंचनामे लवकर पूर्ण करून ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदतीची घोषणा करावी अस वडेट्टीवार यांनी पत्रात नमूद केले आहे.

मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये आज मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. 1948 साली मराठवाडा निजामाच्या राजवटीतून मुक्त झाला, त्या ऐतिहासिक क्षणाचे स्मरण म्हणून दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. यानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथील स्मारकावर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. आजच्या समारंभासाठी शहरातील सिद्धार्थ उद्यानातील स्मारकाच्या ठिकाणी कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

## गडचिरोली जिल्ह्यात हंगाम २०२०-२१ पासून सिएमआर मिलिंगमध्ये प्रचंड भ्रष्टाचार

■ महासागर प्रतिनिधी
देसाईगंज, दि. १७ :
राज्याच्या शेवटच्या टोकावर वसलेल्या अतिदुर्गम, अतिसंवेदनशील गडचिरोली जिल्ह्यात पणन हंगाम-२०२०-२१ पासुन सिएमआर मिलिंग मध्ये प्रचंड भ्रष्टाचार करण्यात येत असल्याचे धक्कादायक वास्तव असुन येथील गोरगरिबांच्या आरोग्याशी खेळण्याचा सर्रास प्रकार सुरु आहे. मात्र स्थानिक लोकप्रतिनिधींनी विधानसभेत व विधानपरिषदेत सुरु असलेल्या प्रचंड भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी सातत्याने लक्षवेधी सुचना लावूनही शासन होत असलेल्या प्रचंड भ्रष्टाचाराकडे दुर्लक्ष करीत असल्याने स्थानिक राईसमिलर्स गोरगरीबांना मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा करण्यात सातत्य राखून असल्याने शासनाच्या एकुणच धोरणाप्रती सखेद आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

गोरगरीबांना एकवेळच्या अन्नावाचुन उपाशी झोपावं लागु नये करीता शासकीय स्तरावरून पाच किलो तांदुळ मोफत दिले जात आहेत.मात्र देण्यात येत असलेले तांदुळ खाण्यायोग्य राहात नसल्याने उचल केलेला तांदुळ राशनधारक परस्पर दुकानात विकत असुन तोच तांदुळ राईसमिलर्स मार्फत परत राशन दुकानात संबंधित अभिकर्ता संस्थेच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून वाटपा करीता पाठविल्या जात असल्याचे धक्कादायक वास्तव आहे.ही गंभीर बाब लक्षात घेता सिएमआर मिलिंग मध्ये होणाऱ्या गैरव्यवहाराची व भ्रष्टाचाराची चौकशी करीता विधानपरिषद सदस्य डॉ.परिणय फुके यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्रमांक ४८२ सन २०२२ चे प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशन, आमदार अभिजीत वंजारी, राजेश राठोड,डॉ. वजाहत मिर्झा व भाई जगताप विधानपरिषद सदस्य यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अनुसार लक्षवेधी सुचना क्रमांक १५९ सन २०२२ चे हिवाळी अधिवेशनात लावलेली आहे. तसेच विधानसभा सदस्य सुभाष धोटे यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार सन २०२३ चे हिवाळी अधिवेशनात दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १५५४, विधानसभा सदस्य नाना पटोले यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार सन २०२५ चे प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिलेली लक्षवेधी सुचना क्रमांक १७४०,विधानसभा सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार सन २०२५ चे प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिलेली लक्षवेधी सुचना, विधानपरिषद सदस्य अभिजीत वंजारी यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अनुसार सन २०२५ चे प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिलेली लक्षवेधी सुचना क्रमांक ३०४ तसेच विधानसभा सदस्य विकास ठाकरे यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार सन २०२५ चे पावसाळी अधिवेशनात दिलेली लक्षवेधी सूचनेनुसार सिएमआर मिलिंग मध्ये होत असलेल्या प्रचंड भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी वेळोवेळी कसोशीने प्रयत्न केले आहे.

## १८ लाख हेक्टर शेती बाधित

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :
ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात महाराष्ट्रात झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. राज्यातील तब्बल 30 जिल्ह्यांतील 195 तालुके या मुसळधार पावसाने बाधित झाले आहेत. या दोन महिन्यांत झालेल्या मुसळधार पावसामुळे 17 लाख 85 हजार 714 हेक्टर क्षेत्रातील खरीप पिकांना फटका बसला आहे. मराठवाडा आणि विदर्भात पावसाची तीव्रता अधिक असल्याचे समोर आले असून नांदेड, वाशिम, यवतमाल, बुलढाणा, अकोला, सोलापूर, हिंगोली, धाराशिव आणि परभणी जिल्ह्यांत मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः सोयाबीन आणि कपाशीची मोठ्या प्रमाणात हानी झाली.

## महाराष्ट्र सिनेमा ॲक्टमध्ये सुधारणा करणार : ॲड. आशिष शेलार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :
महाराष्ट्र सिनेमा ॲक्टमध्ये इज ऑफ डुईंग बिझनेस या धर्तीवर सुधारणा करण्याबाबत विभागाने केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा. चित्रपटगृहांना परवाना देणे, त्यांचे नियमन करणे आणि त्यांच्या सुविधा व सुरक्षेसाठी कालबाह्य नियम बदलून काळानुरूप सिनेमा व्यवसायाच्या विकासानुरूप धोरण बनविण्यासाठी शासन सकारात्मक आहे असे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले.



मंत्रालयामध्ये सिनेमा ओनर्स व एक्झिबिटर्स असोसिएशन ऑफ इंडिया, मुंबई यांच्या विविध समस्या आणि मागण्याबाबत आयोजित बैठकीत सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार बोलत होते. यावेळी आमदार डॉ.परिणय फुके, आमदार राजू तोसम, आमदार उमेश यावलकर, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी, फिल्मसिटीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, सिनेमा ओनर्स व एक्झिबिटर्स असोसिएशन ऑफ इंडिया, मुंबईचे अध्यक्ष तेजस करंदीकर यासह विविध विभागाचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले की, महाराष्ट्र सिनेमा ॲक्टमध्ये बदल करण्यासाठी विभागाने तातडीने कार्यवाही करावी. परवाना अटींमध्ये बदल करणे, पर्यायी व्यावसायिक वापरासाठी सिनेमा हॉल आणि परिसराचा वापर, परवान्यांसाठी एक खिडकी योजनेचा वापर करणे, बांधकाम परवानगी, सेवा शुल्क नियम, चित्रपट उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी योजना तयार करणे, मालमत्ता पुनर्विकास धोरण, करमणूक करामध्ये बदल करणे, सिंगल स्क्रिन सिनेमांसाठी नियमावली अशा विविध मागण्या लक्षात घेवून शासनाकडून सर्वसमावेशक आवश्यक ते बदल करून इज ऑफ डुईंग बिझनेस या धर्तीवर निर्णय घेण्यात येईल. यामध्ये सहभागी सर्व विभागांनाही निर्देश देवून कार्यवाही गतीने करण्यात यावी असे निर्देश ॲड. शेलार यांनी दिले.

# निवडणुकीसाठी लाडक्या बहिणींचा वापर

**महासागर प्रतिनिधी,**
**अमरावती, दि. १७ :**
प्रहार जनशक्ती पार्टीचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी शेती प्रश्नावरून राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. शेतकरी कर्जमाफी, अतिवृष्टी तसेच शेतमालाचे दर व शेतकरी आत्महत्या या मुद्द्यावरून त्यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. तसेच लाडकी बहीण योजने वरून सुद्धा बच्चू कडू यांनी सरकारवर टीका केली आहे.

बच्चू कडू म्हणाले, राज्य सरकार आता सांगत आहे की आमच्याकडे पैसे नाहीत. मात्र, निवडणुकी अगोदर तुम्ही लाडक्या बहिणींना तीन हप्ते एकत्र पैसे दिले. जशा निवडणुका झाल्या तशा अर्ध्या लाडक्या बहिणी अपात्र केल्या. पैशाअभावी लाडका भाऊ प्रशिक्षणार्थी योजना ही बंद करून टाकली. कारण हा फक्त निवडणुकीपुरते कार्यक्रम होता. हा मदत म्हणून कार्यक्रम नसून त्यांचा राजकीय वापर करून घेण्यासाठी होता, अशी टीका बच्चू कडू यांनी केली आहे. पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले, मला वाटते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील की नाही हेच माहिती नाही. कारण प्रशासन ठेवून सगळा माल जमा करायचा आहे. ना नगरसेवक, ना जिल्हा परिषद सदस्य सगळा नियंत्रण एकाच ठिकाणाहून करायचे आहे. निवडणूक आयोग भाजपाच्या कार्यालयातून चालवा. ईव्हीएम देखील भाजपाच्या कार्यालयात ठेवा लोक येतील बटन दाबून जातील, असा हल्लाबोल कडू यांनी केला आहे.

जयकुमार गोरे यांना भाजपाचे डोके आहे. त्यांना लोकांची डोकी थोडीच आहेत. आमचे डोके हे सामान्य लोकांचे डोके आहे. आमदारांचे पगार जर दहा वर्षात ७०००० वरून तीन लाखापर्यंत जात असेल आणि दिव्यांग बांधवांचा निधीसाठी लढावे लागत असेल, सोयाबीन ३४०० रुपयांना विकावे लागत असेल, कापसावर शुल्क लागणार असेल, तर मग करणार काय? असा सवाल बच्चू कडू यांनी उपस्थित केला आहे.

बच्चू कडूंचा गंभीर आरोप



पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले, आता आम्हाला सांगता शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी पैसे नाहीत. देशातील २०० उद्योगपत्यांचे तुम्ही १८ ते २४ लाख कोटी कर्ज माफ केले आहे. शेतकऱ्यांचे ३० ते ४० हजार कोटी कर्ज माफ करायला काय होते असे कडू म्हणाले. आमचे सोयाबीन, तूर, धान याला २० टक्के बोनस द्यायला पाहिजे, त्यासोबतच जीएसटीचा परतावा देणार असेही सांगितले होते, मात्र काहीच होते नाही असे कडू म्हणाले.

तसेच अतिवृष्टी झाली त्यावर कोणी बोलायला तयार नाही. सोयाबीन ३ हजार ४०० रुपयांनी विकायला निघणार आहे त्यावर सरकार बोलायला तयार नाही असे कडू म्हणाले. १५ ऑक्टोबरच्या आत सोयाबीन खरेदी केंद्र सुरु झाली नाहीतर आम्ही सोयाबीन कलेक्टर आणि पालकमंत्र्यांच्या घरात नेऊन टाकणार असल्याचा इशारा कडू यांनी दिला आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या जाहिरातीवर टीका**

आमदार बच्चू कडू यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जाहिरात मोहिमेवर जोरदार टीका केली आहे. ते म्हणाले की, शिवाजी महाराज केवळ मराठ्यांचेच आहेत असे दाखवण्याचा प्रयत्न जाहिरातीतून होत आहे. यामागे सर्व महापुरुषांना जातींमध्ये वाटून टाकण्याचे षडयंत्र असून, मराठा आंदोलन संपल्यावर शिवाजी महाराजांच्या पायावर फूल वाहताना देवा भाऊ दाखवणे हा याच षडयंत्राचा भाग आहे. जाती-जातींमध्ये आणि महापुरुषांमध्ये भांडणे लावण्याचे काम सरकार करत असल्याचा आरोप करत हे सर्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारधारेनुसार होत असल्याचा दावाही त्यांनी केला.

शेतकऱ्यांसाठी आयुष्य वाहून घेणार प्रत्येक जातींना आपापल्या आरक्षणासाठी लढावे, मात्र कार्यकर्त्यांनी आणि समाज बांधवांनी आपसात भांडू नये, गावातले वाद वाढवू नये, असे बच्चू कडू म्हणाले. मी कुठल्याच जातीबद्दल बोलणार नाही हे कालच शपथ घेऊन सांगितले आहे. मी फक्त शेतकऱ्यांसाठी बोलणार आणि शेतकरी हा सगळ्यात जातीत धर्मात आहे आणि यासाठी मी माझे आयुष्य वाहून घेणार असल्याचे कडू म्हणाले.

**गोरक्षकांप्रमाणेच शेतकऱ्यांनाही अनुदान द्यावे**

आमदार बच्चू कडू यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गोदावरीच्या पुराच्या आलेल्या संकटात शेतकऱ्यांना भेटण्यासाठी न गेल्याबद्दल जोरदार टीका केली. ते म्हणाले की, ज्यांनी उद्धव ठाकरे यांच्या 'ऑनलाइन' कार्यपद्धतीवर टीका केली होती, तेच आता स्वतः 'ऑनलाइन' झाले आहेत. गोवंश हत्या बंदीवरूनही त्यांनी सरकारवर निशाणा साधला. गोमातेची हत्या होऊ नये हे मान्य असले तरी, गोरक्षण करणाऱ्या संस्थांना अनुदान मिळते, पण त्याच गाईचे संगोपन करणाऱ्या शेतकऱ्यांना काहीही मिळत नाही. त्यामुळे हे सरकार केवळ आपल्या कार्यकर्त्यांचे 'पोट भरण्यासाठी' असे निर्णय घेत असल्याचा आरोप करत, गोरक्षकांप्रमाणेच शेतकऱ्यांनाही अनुदान देण्याची मागणी कडू यांनी केली.

## बसला कट मारल्यामुळे अपघात
## दोन्ही वाहनाचे मोठे नुकसान

**महासागर प्रतिनिधी,**
**पुसद , दि. १७ :**
खंडाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घाटामध्ये महामंडळाच्या बसला अशोक लेलँड ट्रकने कट मारल्याने भीषण अपघात झाला आहे. या अपघातामध्ये दोन्हीही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. अपघातात चालकासह काही प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत.

अपघात करणाऱ्या ट्रक चालका विरोधात खंडाळा पोलिस ठाण्यात चालक व वाहककडून तक्रार देण्याची प्रक्रिया सुरू होती.

शेगाव -उमरखेड बस क्रमांक एमएच ४०-एक्यू६२५१ हि बस उमरखेड येथे पुसदमार्गे जाणार होती. त्या बसमध्ये सुमारे ४० ते ४५ प्रवासी पुसद आगारात येत होते. तर अशोक लेलँड वाहन क्रमांक एमएच- २९-बीई-३९४९ हे वाशिमकडे जात होते. अशातच खंडाळा घाटामध्ये दोन्हीही वाहनांची समोरासमोर धडक बसल्याने अपघात झाला आहे. या अपघातामध्ये बस





चालकाच्या बाजूच्या समोरील भागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# परतीच्या पावसाचा कहर
## खरीपाच्या पिकांना फटका, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**महासागर प्रतिनिधी**
**दिग्रस, दि. १७ :**
गेल्या काही दिवसांपासून अधून-मधून बरसत असलेल्या पावसाने अनेक भागांमध्ये जोरदार हजेरी लावली. त्यामुळे शेतीमध्ये उभ्या असलेल्या खरीप हंगामाच्या पिकाला त्याचा फटका बसून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

काही भागामध्ये नदी-नाल्यांना पूर आला तर काही भागात शेतांमध्ये पावसाचे पाणी साचल्याचे दिसून आले.

सध्या मान्सूनच्या पावसाने परतीचा प्रवास सुरू केल्याचे दिसत आहे. त्यामुळे राज्यात सर्वत्र पावसाची जोरदार बॅटिंग सुरु आहे.



या पावसाचा फटका जिल्ह्यातील काही तालुक्यांनाही सहन करावा लागत आहे. त्यात सकाळपासून जिल्ह्यात सर्वत्र ढगाळी वातावरण कायम होते.

त्यात काही तालुक्यांमध्ये मुसळधार तर काही ठिकाणी हलक्या सरींसह पावसाने हजेरी लावली. आर्णी तालुक्यामध्ये पाऊस पडल्याने काही गावांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली होती. बाभुळगाव तालुक्यातीही नागरिकांना पावसामुळे पूर परिस्थितीचा सामना करावा लागला. दिग्रस तालुक्यातील धानोरा बु. शेत शिवारात गुरे-ढोर चारण्यासाठी गेलेल्या इसमावर विज पडून ते गंभीर जखमी झाले. देवराव नारायण वाघमारे (वय ६०) वर्ष रा. धानोरा बु. असे त्यांचे नाव आहे.

## भय्यासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ टपाल तिकीट प्रसिद्ध करण्याची मागणी

**महासागर प्रतिनिधी,**
**अकोला, दि. १७ :**



चैत्यभूमी स्मारकाचे निर्माते व समतेच्या चळवळीचे शिल्पकार स्व. यशवंत भीमराव आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त केंद्र शासनाने टपाल तिकीट प्रसिद्ध करावे, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे शहर संघटक नीलेश देव यांनी केली.

या संदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून राज्य शासनाने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा, अशी विनंती केली. भय्यासाहेब आंबेडकर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सुपुत्र असून, ते स्वतः प्रभावी विचारवंत, पत्रकार, बौद्ध धर्मप्रचारक, विधान परिषदेचे माजी सदस्य होते. चैत्यभूमी स्मारकाच्या उभारणीत त्यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांनी 'मडू ते चैत्यभूमी' ही ऐतिहासिक यात्रा काढून लोकनिधी उभारला आणि चैत्यभूमी उभारली. आज हे स्थळ जागतिक स्तरावरील आंबेडकरी अनुयायांचे श्रद्धास्थान आहे. यापूर्वी नीलेश देव यांनी या टपाल तिकीटासाठी गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला आहे. २ जानेवारी २०१६ रोजी पहिला प्रस्ताव शासनाकडे सादर केला. २१ जुलै २०२३ रोजी प्रस्ताव राज्य शासनाला दिला होता. ११ सप्टेंबर २०२३ रोजी केंद्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडे अधिकृत प्रस्ताव सादर केला. ९ ऑक्टोबर २०२३ रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांनाही स्मरणपत्र दिले. तथापि, आजपर्यंत केंद्र शासनाकडून अंतिम मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांनी हस्तक्षेप करून निर्णय घ्यावा, अशी मागणी देव यांनी केली आहे. हा निर्णय आंबेडकरी समाजापुरता मर्यादित नसून, महाराष्ट्राच्या सामाजिक न्यायाच्या इतिहासाला नवी दिशा देणारा ठरेल, असे देव यांनी पत्राच्या शेवटी नमूद केले आहे. ही मागणी नाकारल्यास जनआंदोलनाचा इशारा या वेळी देण्यात आला.

## फुटपाथ, रस्त्यांवरील अतिक्रमणे केली जमीनदोस्त

**महासागर प्रतिनिधी,**
**अमरावती, दि. १७ :**
महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने मंगळवारी जेसीबीद्वारे नागपुरी गेट चौक, जमील कॉलनी, ट्रान्सपोर्ट नगर, वलगाव रोड, वली चौक परिसरात अतिक्रमणांविरोधात धडक कारवाई केली. मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांच्या आदेशानुसार व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर यांच्या मार्गदर्शनात ही मोहीम राबवली. या कारवाईत रस्ते, फुटपाथ व सार्वजनिक ठिकाणी केलेली अतिक्रमणे हटवण्यात आली. यात झोपड्या, शेड, पक्याचे शेड, बेकायदेशीर बांधकाम तसेच व्यावसायिकांनी पसरवलेल्या जागेवरील सामग्री हटवण्यात आली. या कारवाईमुळे परिसरातील मुख्य रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणे मोकळे होऊन वाहतूक सुलभ झाली आहे.



नागरिकांच्या तक्रारीवरून ही कारवाई केली. पुन्हा अतिक्रमण करू नये, अन्यथा कठोर कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

ट्रान्सपोर्ट नगर परिसरात राबवलेली अतिक्रमण हटाव मोहीम ही नागरिकांच्या सोयीसाठी आणि सुरळीत वाहतुकीसाठी आहे. रस्ते, फुटपाथ आणि सार्वजनिक ठिकाणे ही सर्वांची सामाईक मालमत्ता असून त्यावर कोणीही बेकायदेशीरपणे कब्जा करू नये. मनपाच्या वारंवार सूचनांनंतरही काही ठिकाणी अतिक्रमण केले जात असल्यामुळे ही कारवाई अपरिहार्य ठरली. नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने अतिक्रमण टाळून मनपाला सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त सौम्या शर्मा यांनी केले.

सकाळी ११ वाजतापासून जेसीबीद्वारे नागपुरी गेट चौक ते जमील कॉलनी, ते ट्रान्सपोर्ट नगर ते वलगाव रोड, वली चौकापर्यंत मनपाच्या कर्मचाऱ्यांनी अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली. जोपर्यंत शहरातील रस्ते व फुटपाथ मोकळे होणार नाही तोपर्यंत ही अतिक्रमणाची कारवाई सुरू राहील.

## अर्धवट सिमेंट काँक्रीट रस्त्यांचे चढउतार ठरताहेत धोकादायक

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, दि. १७ :** शहरातील अनेक भागांत रस्त्यांची काहीशी विचित्र स्थिती निर्माण झाली आहे. २०० ते १५० मीटरच्या डांबरी रस्त्यावर मध्येच अर्धवट कुठेतरी सिमेंट काँक्रीटचा ५० मीटरचा रस्ता तयार करून ठेवण्यात आला. या रस्त्याचे उताराही (रॅम्प) व्यवस्थित नाहीत. त्यामुळे अशा धोकादायक रस्त्यावर वाहन चढवताना आणि त्यावरून उतरताना नागरिकांना प्रचंड मनःस्ताप सहन करावा लागत आहे. वाहन वर चढवताना किंवा उतरवताना वाहनासह शरीराला जोरात धक्का बसतो. बरेचदा वाहनावरून नियंत्रण सुटून वाहन खाली पडण्याचे प्रकार घडत आहेत. यामुळे शहरातील अनेक नागरिकांना दुखापती झाल्या आहेत. शहरातील जुना भाग, पन्नालाल नगर, गुरुकृपा कॉलनी तसेच नवीन भागात असे अर्धवट रस्ते तयार झाले आहेत. निधी आला की उर्वरित रस्ता पूर्ण करू, असे सांगून नागरिकांची बोळवण केली जात आहे. परंतु, मनपाकडे निधीची चणचण असल्यामुळे हा रस्ता केव्हा पूर्ण होईल ते काही सांगता येत नाही. मनपा सध्या मोजक्याच डांबरी रस्त्यांना मंजुरी देत आहे. सिमेंट काँक्रिटचा १०० मीटर रस्ता तयार करण्यासाठी किमान ८ ते १० लाख रुपये खर्च येतो. त्या १०० मीटरसाठी किमान ३ डांबरी रस्ते तयार होतात. सिमेंट काँक्रीटचे रस्ते बरीच वर्षे टिकतात. त्याचवेळी डांबरी रस्ते मात्र एका वर्षातच उखडतात.

# ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाचे अधिवेशन संपन्न

**महासागर प्रतिनिधी**
**शेगाव, दि. १७ :**
राज्यात आरक्षणावरून जाणीवपूर्वक गोंधळ निर्माण केला जात आहे. ओबीसी विरुद्ध मराठा असा लढा सुनियोजित पद्धतीने उभारला जात आहे. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी आपली आरक्षणावरील भूमिका जाहीर व स्पष्ट करणे आवश्यक आहे.

यावर जातीनिहाय गणना हाच उपाय आहे. यामुळे संघटना या गणनेसाठी आग्रही आहे. यावर जनजागृतीसाठी संघटना वर्षभर राज्यात जात गणना परिषद आयोजित करणार असल्याची घोषणा सुनिल शेळके यांनी केली.



ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाचे राज्य अधिवेशन व एक दिवसीय चिंतन शिबिर शेगाव येथील हॉटेल विघ्नहर्ता इनमध्ये पार पडले. यावेळी ओबीसी कर्मचारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुनिल शेळके हे अध्यक्षस्थानावरून बोलत होते. प्रमुख वक्ते म्हणून युनिटी ऑफ मुल निवासी समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष व ओबीसी अभ्यासक कमलाकांत काळे आणि जीएसटी विभागाचे माजी सहायक आयुक्त आणि एससी, एसटी, ओबीसी कर्मचारी वेल्फेअर फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय थुल उपस्थित होते. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष पद संघटनेचे बुलडाणा जिल्हाध्यक्ष किशोर पवार यांनी भूषविले.

अधिवेशनाला संघटनेचे राज्य सल्लागार डॉ. शिवशंकर गोरे, महासचिव राम बाडीभष्मे, अधिवेशनाचे जिल्हा सरचिटणीस विठ्ठल पाटेखेडे, जिल्हा उपाध्यक्ष संजय ठाकरे, सुनिल धंदर, संतोष सातव, जिल्हा संघटक विकी जगताप, सहसंघटक सुधीर दाते, सहसचिव प्रकाश आढाव, गजानन अहिरे, प्रसिद्धी प्रमुख विठ्ठल इंगळे, शेगाव तालुकाध्यक्ष प्रमोद इंगळे, रमेश जुमळे, रामविजय ढोरे, शाम कौलकार, तुषार आसोलकर, संजय उमाळे, निळकंठ उचाडे, गजानन पडोळ, राजाभाऊ वायाळ, गणेश पऱ्हाड, संदीप शिंदे, नंदकिशोर खरात, संजय खांडवे, गजानन हूडेकर, गजानन राऊत, अनिल पवार, मुरलीधर टेकाळे, रवींद्र सावळे आदी पदाधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन राज्य सल्लागार शिवशंकर गोरे यांनी तर सरचिटणीस राम बाडिभस्मे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. उद्घाटन सत्रात ओबीसी समाजाचे अभ्यासक व लेखक कमलाकांत काळे यांनी 'ओबीसी आरक्षण: सामाजिक लढा व आताची परिस्थिती' या विषयावर अभ्यासपूर्ण विवेचन केले. संविधानाने दिलेल्या आरक्षणाचे विविध पैलू त्यांनी उलगडून सांगितले.

चळवळीमध्ये सातत्याने प्रबोधन, प्रशिक्षण आणि सुदृढ संघटन असणे अत्यावश्यक ठरते. आरक्षण म्हणजे पहिल्या पंक्तीत जेवण्याची संधी नसल्याचे सांगून त्यांनी मुळात पंगत वाढण्याची व्यवस्थाच आपल्याकडे असणे आवश्यक आहे.

ओबीसींना आरक्षण हा ऐतिहासिक क्षण ठरला. मात्र त्याविरोधात अदृश्य शक्तींनी विविध अडचणी, अदृश्य भिंती उभ्या केल्या. तेव्हा यात्रा काढण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## बेपत्ता मुलाचा शेततळ्यात मृतदेह
### दोन दिवसांपासून होता बेपत्ता



**अमरावती:** कुऱ्हा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वीरगव्हाण येथील ११ वर्षीय मुलगा रविवारपासून (दि. १४) बेपत्ता होता. त्या मुलाचा नातेवाईक, कुटुंबीय, एलसीबी तसेच ग्रामीण पोलिसांकडून शोध सुरू होता. दरम्यान या चिमुकल्याचा मृतदेह गावापासून काही अंतरावरील एका मोठ्या स्वरूपातील शेततळ्यात तरंगताना दिसला. या घटनेने गावात खळबळ उडाली असून मुलगा शेततळ्यावर कधी व का गेला, असे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

ध्रुव विजय राठोड (११, रा. वीरगव्हाण, ता. तिवसा) असे मृत मुलाचे नाव आहे. ध्रुव राठोड हा रविवारपासून बेपत्ता झाला होता. याबाबत कुटुंबीयांनी ग्रामीण पोलिसांना माहिती दिली होती. मुलाचा कुटुंबीयांकडून शोध सुरू होता. मात्र दोन दिवस मुलगा कुठेही दिसला नाही. दरम्यान गावापासून काही अंतरावरील एका शेतातील शेततळ्यात एक निर्वस्त्र मृतदेह तरंगताना आढळला. ही माहिती गावकऱ्यांना मिळाली. त्यावेळी गावकरी तसेच कुऱ्हा पोलिस घटनास्थळी पोहोचले होते.


**सार्वजनिक सूचना**

कायदेशीर मापनशास्त्र (पॅकेज्ड कमोडिटीज) नियम, २०११ च्या तरतुदींचे पालन करून, ग्राहकांना येथे कळविण्यात येते की २२ सप्टेंबर २०२५ पासून लागू होणाऱ्या जीएसटी दरांमध्ये सुधारणा झाल्यामुळे,ZODIAC, Z3 आणि ZOD! या ब्रँड अंतर्गत विक्री केलेल्या काही प्री-पॅकेज्ड पोशाख उत्पादनांच्या कमाल किरकोळ किमती (MRPs) सुधारित करण्यात आल्या आहेत.
कायदेशीर मापनशास्त्र विभागाने परवानगी दिल्यानुसार सुधारित MRPs उत्पादनांच्या लेबलवर स्टिकर्सद्वारे कळवल्या जातील.
उत्पादनाची इतर माहिती अपरिवर्तित आहे.
कोणत्याही ग्राहकांच्या प्रश्नांसाठी, कृपया संपर्क साधा:
झोडीऐक क्लोथिंग कंपनी लिमिटेड.
नोंदणीकृत. कार्यालय: नायलॉक हाऊस, २५४, डी-२, डॉ. ॲनी बेझंट रोड वरळी, मुंबई - ४०० ०३०. महाराष्ट्र राज्य, भारत
ग्राहक हेल्पलाइन: +९१ २२ ६६६ ७७०००,
ईमेल: contactus@zodiacmtc.com



**MAHAVITARAN** **E-TENDER NOTICE**

Super scribed percentage rate e-tenders are invited from established, reputed, experienced contractors and who are registered for e-tendering with MSEDCL. The offers are invited for the works of **1)** Annual Civil Maint. Work for MSEDCL Assets under Butibori Division, Dist. Nagpur for year **2025-26** amounting to **Rs. 8.16 Lakhs 2)** Annual Civil Maint. Work for MSEDCL Assets under katol Division, Dist. Nagpur for year **2025-26** amounting to **Rs. 8.28 Lakhs 3)** Annual Civil Maint. Work for MSEDCL Assets under Umred Division, Dist. Nagpur for year **2025-26** amounting to **Rs. 8.28 Lakhs 4)** Annual Civil Maint. Work for MSEDCL Assets under Mouda Division, Dist. Nagpur for year **2025-26** amounting to **Rs. 8.28 Lakhs 5)** Annual Civil Maint. Work for MSEDCL Assets under Saoner Division, Dist. Nagpur for year **2025-26** amounting to **Rs. 8.28 Lakhs 6)** Maintenance Work at Urja Guest house and bijili nagar Dist Nagpur amounting to **Rs. 8.40 Lakhs 7)** Repairing of CD work at Zilpa Tq Katol Dist. Nagpur amounting to **Rs. 3.68 Lakhs 8)** construction of Transformer plinth at Kawtha Dist Nagpur amounting to **Rs. 2.51 Lakhs** vide e-tender specification No. **EEC/NGP/e-T-19(IIIrd call)/2025-26, EEC/NGP/e-T-34/2025-26, EEC/NGP/e-T-35/2025-26, EEC/NGP/e-T-36/2025-26,EEC/NGP/e-T-37/2025-26,EEC/NGP/e-T-38/2025-26, EEC/NGP/e-T-39/2025-26 and EEC/NGP/e-T-40/2025-** respectively. The tender with all details will be available on MSEDCL's website **www.mahadiscom.in** from date – **18.09.2025 to 24.09.2025** and submission on **25.09.2025** up to **13.00 hrs.** Corrigendum shall not be published in newspaper

**PRO No. 112/NZ.**
**Dt.17.09.2025**

**Executive Engineer (C)**
**CCCM Division, Nagpur**


# विद्यापीठात केशव सिताराम ठाकरे यांची जयंती साजरी



**महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १७ :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला प्र-कुलगुरुडॉ. महेंद्र ढोरे, राज्यपाल नामित व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठा संख्येने उपस्थित होते. संचालन व प्रबोधनकार ठाकरे यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

## शेतकरी, शेतमजुरांचा नदीतून जीवघेणा प्रवास

**किन्होळा :** स्वातंत्र मिळाल्यापासून कोलारी हा गाव विविध समस्याने ग्रस्त आहे. चिखली तालुक्यातील किन्होळा व कोलारी गावाला लागूनच पैनगंगा नदी आहे. नदीला पूल नसल्यामुळे दळणवळण करणे नागरिकांना कठीण जात असून दोन-तीनवर्षांपासून नदीचे खोलीकरण झाल्याने नदीपात्र सात ते आठ फुट खोल झाले आहे. नदीवर काही ठिकाणी बंधारे बांधल्याने नदीपात्रात चार ते पाच फूट पाणी कायम राहते. त्यामुळे या वाहत्या पाण्यामधून शेतकरी व शेत मजुरांना आपला जीव धोक्यात घालून शेती करावी लागत असल्याचे वास्तव समोर आले आहे. पैनगंगा नदीपात्रात चार ते पाच फूट पाणी राहत असल्याने शेती मशागतीची कामे वेळेवर होत नाही. त्याचा परिणाम शेती उत्पन्नावर होऊन शेतकरी आर्थिक व मानसिक अडचणीत सापडला आहे. त्यामुळे कोलारी, किन्होळा, ब्रम्हपुरी शिवारातील शेतकऱ्यांना शेती करणे अव?घड झाले आहे. बरेच शेतकरी आपली शेती विक्रीच्या तयारीत आहेत आहेत. परंतु नेहमीच पूर परिस्थिती असल्यामुळे या भागातील शेती खरेदी करण्यास ग्राहक सुद्धा मिळत नाही. बळीराजाला दिलासा देण्यासाठी शासनाने प्राधान्याने स्मशान भूमी लगत पैनगंगा नदीवर पूल व बंधारा बांधून दिल्यास किन्होळा व कोलारी गावकऱ्यांची पिण्याच्या पाण्याची, सिंचनाची व रस्त्याची समस्या कायमची मिटणार आहे.


**NAGPUR MUNICIPAL CORPORATION, NAGPUR**
**E-TENDER NOTICE**

Commissioner NMC invites e-tenders for the following work. These e-tenders can be downloaded by the Registered Contractors in appropriate class of the Nagpur Municipal Corporation, Nagpur, from the e-tendering Portal **(www.mahatenders.gov.in)** The Terms and Conditions of e-tenders are available on the e-tendering Portal **(www.mahatenders.gov.in)** The sale and purchase of e-tenders can be done through Online.

| Tender No. | Name of the work | Amount Put To Tender (In Rs) | EMD (In Rs) |
|---|---|---|---|
| 09/2025-26/ EE/Project-1 | Providing and Fixing Aluminium Partation Cabin for Executive Engineer (Sports Department) 3rd floor and Renovation cabin of Executive Engineer (PHE Department) 4 th floor in New Administrative Building at NMC Civil Lines, Nagpur. | 3,75,177/- | 3,760/- |
| 10/2025-26/ EE/Project-1 | Providing and Fixing T- Shape Kerbs for Divider at Gittikhadan to Dinshaw Factory Cement Road, NMC Nagpur. | 6,98,295/- | 7,000/- |
| 11/2025-26/ EE/Project-1 | Repairing and Maintenance of Old Administrative building (G+2) and New Administrative Building (G+7) at NMC Civil Lines, Nagpur. | 8,39,868/- | 8,400/- |

**Note :- 1)** Right to reject any or all tenders without assigning any reason is reserved by the Municipal Commissioner N.M.C. Nagpur. **2)** Eligiblity criteria and mode of submission shall be as stated in uploaded tender document. **3)** For any details regarding project, contact Executive Engineer (Project-1) , 5 th floor NMC Building, Civil Lines, Nagpur 440001. **Email ID- eeprojectnmc@gmail.com. 4)** Tender Submission End Date **(16:00 hrs): 25 Sep 2025. 5)** Tender Opening Date (If Possible **16:00 hrs): 26 Sep 2025.**

**Advt. No 483 PR**
**Date 17.09.2025**

**Executive Engineer (Project-1)**
**Nagpur Municipal Corporation, Nagpur.**

# मराठवाडा : ऐतिहासिक पार्श्वभूमी

पूर्वार्ध

महाराष्ट्र राज्याचा भाग असलेला मराठवाडा हा प्रदेश पूर्वी हैदराबाद संस्थानाचा भाग म्हणून ओळखला जात होता. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हा भूभाग स्वतंत्र होऊन भारतात समाविष्ट झाला. यंदा १७ सप्टेंबरला या घटनेला ७७ वर्षे पूर्ण होऊन ७८ वे वर्ष सुरू झाले. या निमित्ताने, मराठवाड्याचा इतिहास, त्याचे नाव कसे पडले, आणि तो निजामशाहीच्या जोखडातून कसा मुक्त झाला, याबाबतचा हा लेखाजोखा.

-------------







**भाषिक-ऐतिहासिक पार्श्वभूमी**

शासन दरबारी असणाऱ्या नोंदीनुसार, सम्राट अशोकाच्या १६ महाजनपदांपैकी दोन महाजनपदे एक अश्मक आणि दुसरे मूलक हे गोदावरीच्या खोऱ्यात नांदणारे होते. या दोन्ही महाजनपदात बहुतांश लोकं महाराष्ट्री प्राकृत बोलणारी होती.

सातवाहन राजा हाल यांनी ७०० गाथा एकत्र करून संपादित केलेला 'गाथासप्तशती' म्हणजेच गाथा सप्तशती ही प्राकृत मधून असलेली निर्मिती आहे. यात या गोदावरी खोऱ्यातील लोकांचे लोक जीवन प्रतिबिंबित झाले आहे. यातून एकच ध्वनीत होते की, हा प्रदेश म्हणजे मराठीचे आद्य रूप महाराष्ट्री प्राकृत बोलणारा प्रदेश.

पुढे अनेकांनी या प्रदेशावर आपली हुकूमत गाजवली. १७२४ मध्ये दिल्लीचा सुभेदार निजाम उल मुल्क या निजामशहाने हैदराबादमध्ये निजामशाही स्थापन केली. या निजामशाहीत तीन भाषा बोलणारे प्रदेश होते. एक तेलगू (आंध्र), कन्नड (कर्नाटक) आणि मराठी (मराठवाडा). म्हणजे निजामाच्या काळात भाषे प्रमाणे प्रदेशाची नावे झाली. यातील मराठी भाषिक पट्ट्याला 'मराठवाडा' (मराठ + वाडा/भाग) अशी प्रचलित संज्ञा मिळाली आणि ती प्रशासन, महसूल व लोकप्रिय वापरात कायम झाली.

**पूर्वप्रचलित शब्दरूप आणि उल्लेख**

काही जुन्या नोंदींमध्ये मराठवाडी/मरहटवाडी असा शब्दप्रयोग दिसतो, जो पुढे 'मराठवाडा' या अधिक परिचित रूपात रूढ झाला. फारशी-पर्शियन इतिहासग्रंथ, निजामकाळातील कागदपत्रे आणि प्रांतीय गॅझेट्समध्ये हा भाषिक पट्टा म्हणून निर्देश आढळतो.

१८ व्या -१९ व्या शतकात निजामकाळातील महसूल-विभागणी, आणि पुढे १८६० च्या दशकानंतरच्या प्रशासकीय सुधारणांमध्ये 'मराठवाडा' ही संज्ञा दस्तऐवजांत दिसू लागते. १९५६ च्या राज्यपुनर्रचनेत हा 'मराठवाडा विभाग' म्हणून बॉम्बे राज्यात समाविष्ट झाला; १९६० नंतर महाराष्ट्रात हा विभाग अधिकृतरीत्या त्या नावानेच ओळखला गेला.

**मराठवाडा शब्दाचा अर्थ व व्युत्पत्ती**

'वाडा/वाड' हा शब्द मराठीत भाग/पट्टा/वस्ती अशा अर्थाने येतो; 'मराठ'/'मराठी' + 'वाडा' म्हणजे मराठी लोकांचा भाग/पट्टा असा सरळ अर्थ लागतो. त्यामुळे 'मराठवाडा' ही भाषिक-प्रादेशिक ओळख दर्शवणारी संज्ञा आहे, जी लोकव्यापारातून प्रशासकीय वापरात स्थिरावली.

**आजचा वापर**

१९५६ मध्ये राज्य पुनर्रचनेनंतर मराठी भाषिक मराठवाडा महाराष्ट्रात सामील झाला. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बीड, लातूर, परभणी, नांदेड, जालना, हिंगोली, धाराशीव (उस्मानाबाद) हे जिल्हे मिळून आजचा मराठवाडा झाला.

'मराठवाडा' हा शब्द आज सांस्कृतिक, भाषिक आणि प्रशासकीय या तिन्ही पातळ्यांवर मान्यताप्राप्त प्रादेशिक ओळख आहे. मराठी बोलीभाषेची छटा, सांस्कृतिक वारसा आणि ऐतिहासिक अनुभव यांमुळे हे नाव केवळ भूभाग नव्हे तर एक सांस्कृतिक ओळख सूचित करते.

**मराठवाड्याचा इतिहास थोडक्यात**

प्रसिद्ध पुरातत्त्वज्ञ आणि मूर्तिशास्त्रज्ञ डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी आपल्या लेखात म्हटले की, पुरातत्त्वज्ञांच्या मतानुसार, मराठवाड्यात मानवाची वस्ती सुमारे ७० हजार वर्षांपासून आहे. १९६५ मध्ये वायने या भूगर्भशास्त्रज्ञाला पैठणजवळ मुंगी येथे मध्यपाषाणयुगीन दगडी हत्यारे मिळाली.

महाराष्ट्रात मिळालेली ही पहिली अश्मयुगीन हत्यारे होते. मानवाने स्थिर जीवनास प्रारंभ केला, तेव्हापासून मराठवाड्यात त्याचे अस्तित्व आढळते. इतकेच नव्हे तर महाराष्ट्रातील आद्य शेतकऱ्यांची वस्ती श्रीज्ञानेश्वरांच्या जन्मगावी आपेगाव येथेच पुरातत्त्वज्ञांना आढळून आली. उत्खननात तेथे ताम्रपाषाणयुगीन घरांचे अवशेष, रंगीत खापरे, धान्ये आणि दगडी हत्यारे मिळाली. या वस्तींचा काळ इ. स. पू. १५६४ असा कार्बन-१४ पद्धतीने ठरविण्यात आला आहे.

पुराणातील वर्णनानुसार मराठवाड्याचा काही भाग नंदांच्या साम्राज्यात असावा असे दिसते. नव-नंदडेरा म्हणजे नांदेड असेही मानले जाते. ज्ञानकोशकारांच्या मते पैठण ही त्यांची दक्षिणेकडील राजधानी होती. पुढे अशोकाच्या लेखातून पेतनिकांचा म्हणजेच पैठणवासियांचा उल्लेख आढळतो.

मराठवाड्याला महत्व आले ते सातवाहन वंशाच्या कारकीर्दीत. दक्षिणेतील पहिल्या व मोठ्या साम्राज्याची राजधानीच पैठण (प्रतिष्ठान) येथे होती. या राजकुलाने मराठवाड्याला राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांत स्थान मिळवून दिले, तसेच साहित्यात आणि कलाक्षेत्रात मोलाची कामगिरी करण्यास प्रवृत्त केले. पैठण, तेर, भोकरदन ही गावे या काळातच भरभराटीस आली. अजिंठा येथील पहिल्या गटातील व पितळखोरे येथील लेणी याच काळातील होत.

गौतमीपुत्र सातकर्णीने नहपान आणि कर्दमकासारख्या शत्रूंना पराभूत करून महाराष्ट्राला वाचविले. हाल या राजाने गाथासप्तशतीसारखा तत्कालीन लोकजीवनाचे प्रतिबिंब असलेला ग्रंथ संपादित केला.

सातवाहनांनंतर मराठवाड्याच्या काही भागावर वाकाटकांनी राज्य केले त्यांच्या कारकीर्दीत अजिंठ्याच्या काही लेण्यांत चित्रकाम झाले. वाकाटकांनंतर चालुक्य वंशाच्या राजांचा मराठवाड्याशी संबंध आला. त्यानंतर राष्ट्रकूट घराण्याने ७४४ ते ९७३ पर्यंत येथे राज्य केले. त्यांची एक उपराजधानी नांदेड जिल्ह्यातील कंधार येथे होती. वेरूळ येथील अद्वितीय लेणी यांच्या कारकीर्दीत खोदली गेली.

कल्याणी चालुक्यांच्या काळातील शंभराहून अधिक शिलालेख नांदेड, उस्मानाबाद (आताचे धाराशिव) व परभणी जिल्ह्यांतून मिळतात. या राजांनी याच जिल्ह्यांतून कलापूर्ण मंदिरे उभारली. सहाव्या विक्रमादित्याच्या काळात विद्यास्थाने व महाघटिकास्थाने (महाविद्यालये) यांना अनुदान दिले गेले. मराठवाड्याच्या काही भागावर कलचुरींना व त्यांच्या वंशजांनी सुमारे वीस वर्षे राज्य केले, असे अभिलेख सांगतात.

मराठवाड्याला यादव घराण्याच्या काळात अत्यंत महत्व आले. यादव वंशातील पाचव्या भिल्लमाने ११७५ मध्ये देवगिरी येथे राजधानी हलवली आणि तेथे देवगिरी किल्ला बांधला. यादव काळात मराठवाड्याची सर्व क्षेत्रांत, विशेषतः संगीत, कला, वाङ् मय इत्यादींत, प्रगती झाली.

यादवकालीन अनेक मंदिरे मराठवाड्यात असून ती हेमाडपंती या नावाने प्रसिद्ध आहेत. हेमाद्री तथा हेमाडपंत हा बहुश्रुत विद्वान यादवांच्या दरबारी होता. याने चतुर्वर्गचिंतामणी हा बृहद् ग्रंथ लिहिला. रामचंद्र (१२७१ ते १३११) हा यादवांचा शेवटचा राजा मराठवाडा याच्या काळात परमोत्कर्षाला पोहोचला होता.

देवगिरीच्या वैभवामुळे मोहित होऊन अल्लाउद्दीन खिल्जीने दक्षिणेवर स्वारी केली. रामचंद्र यादवला पराभव पत्करून अपमानास्पद तह करावा लागला. पुढे मलिक काफूरने देवगिरीवर आक्रमण केले. त्यात देवगिरी पडली. यादवांचे साम्राज्य लयास गेले.

खिल्जींनंतर दिल्लीच्या गादीवर तुघलक आले. त्यांपैकी मुहम्मद तुघलकाने देवगिरी येथेच दिल्लीची राजधानी हलवली. देवगिरीचे नाव दौलताबाद केले. तुघलकानंतर मराठवाड्याचा बराचसा भाग बहमनी राज्यात समाविष्ट झाला. १५३८ मध्ये बहमनी राज्याची पाच शकले झाली आणि मराठवाड्याचा प्रदेशही आदिलशाही, इमादशाही, कुतुबशाही, बरीदशाही आणि निजामशाही यांत विभागला.

पुढे १६३३ मध्ये शहाजहान या मोगल राजाने दौलताबाद जिंकले. त्याचा मुलगा औरंगजेब दक्षिणेचा सुभेदार म्हणून काही काळ येथे होता. यानंतर आसफजाही घराण्याचे म्हणजे हैदराबादच्या निजामाचे १७२४ पासून मराठवाड्यावर आधिपत्य होते.

**हैदराबादच्या निजामशाहीचा उदय**

दिल्लीचा सुभेदार निजाम उल मुल्कचा कालखंड हा निजामशाहीच्या उदयाचा होता. त्या कालखंडात मराठ्यांशी कधी मैत्री, कधी तह करून तर कधी माफी मागून निजामशाही टिकून राहिली. इ.स. १७२४ ते १७४८ अशी २४ वर्ष ही कारकीर्द राहिली. त्यानंतर निजामाच्या वारसदारांमध्ये इ.स. १७४८ ते १७६२ पर्यंत वारसायुद्ध घडून आले.

निजाम-उल-मुल्क नंतर त्याचा मुलगा निजाम अली हा हैदराबाद संस्थानचा राजा झाला. त्याने स्वतःला निजाम अशी पदवी धारण केली. म्हणून नंतरच्या सर्व राजांना निजाम असे संबोधण्यात येते. निजाम-उल-मुल्काला मोगल सम्राटाकडून आसफ जहा असा किताब मिळाला होता. म्हणून या घराण्याचा उल्लेख आसफ जाह घराणे असाही करण्यात येतो.

निजामशाहीच्या सुरुवातीपासून बलदंड सत्तेबरोबर मैत्री करून किंवा नमते घेऊन आपले राज्य केल्याचे दिसून येते. 18 व्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात ब्रिटिशांचा दबदबा वाढायला लागला होता. हे हेरून निजाम अली यांनी ईस्ट इंडिया कंपनी यांच्या बरोबर १२ ऑक्टोबर १८०० मध्ये तैनाती फौजेचा करार केला.

या करारांद्वारे संरक्षणासाठी इंग्रजांची फौज सिकंदराबादला कायम झाली. या कारणामुळे निजामाने हिंदुस्तानातील कोणत्याही राजाबरोबर कसलाही संबंध ठेवणार नाही, हे मान्य केले. इंग्रजांना फौजेच्या खर्चासाठी कडाप्पा, कर्नुल, अनंतपूर व बेल्लारी हे जिल्हे निजामाने ईस्ट इंडिया कंपनीला दिले. या करारामुळे परकीय आक्रमणापासून व अंतर्गत बंडखोरापासून पूर्ण रक्षण करण्याची जबाबदारी कंपनीने स्वतःवर घेतली.

या करारापासून हैदराबादच्या निजामाचे स्वातंत्र्य नष्ट झाले. निजामअली नंतर (सन १७६३ ते १८०३) निजाम सिकंदरशहा (सन १८०३ ते १८२९), नासिरदौला (सन १८२९ ते १८५७), अफजुद्दौला (सन १८५७ ते १८६९), महेबूब अली खान (सन १८६९ ते १९११) यांनी राज्य केले.

**मीर उस्मान अलीची कारकिर्द**

सातवा व शेवटचा निजाम मीर उस्मान अली खान २९ ऑगस्ट १९११ रोजी सत्तेवर आला. पहिल्या महायुद्धात निजामाने इंग्रजांना पैसा, सैन्य,वस्तू यांची भरपूर मदत केली. युद्धातील मदतीचे बक्षीस म्हणून ब्रिटीश सम्राट पाचवा जॉर्ज ह्याने निजामाला हिज एक्झाल्टेड हायनेसस असा किताब दिला. निजाम मीर उस्मान अली खूप महत्वकांक्षी होता. स्वतंत्र इस्लामी राज्य स्थापन करण्याचे त्याचे स्वप्न होते. हैदराबाद राज्यात राजभाषा फारशी होती.

**मराठवाडा मुक्तीसंग्राम चळवळ**

जुलूम जितका वाढतो, तितकी प्रतिकाराची ठिणगी तेजाळते. १९३०-४० च्या दशकात भारतीय स्वातंत्र्याची हवा निजामशाहीत पोहोचली. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महात्मा गांधींनी जसे नेतृत्व केले, त्याचप्रमाणे मराठवाड्याच्या लढ्याचे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ यांनी केले.

१९३८ मध्ये स्थापन झालेल्या हैदराबाद स्टेट कॉंग्रेसने या लढ्याची सूत्रे हाती घेतली. जनतेमध्ये स्वातंत्र्याची भावना जागृत करण्यासाठी सत्याग्रह, मोर्चे आणि आंदोलने सुरू झाली. यात गोविंदभाई श्रॉफ, अनंत भालेराव, बाबासाहेब परांजपे यांसारख्या अनेक नेत्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

रझाकारांकडून संस्थांनातील नागरिकांवर, स्वातंत्र्यलढ्यातील कार्यकर्त्यांवर, भारतीय सीमेवरील चौक्यांवर आणि तेथील खेड्यांवर हल्ले करून रझाकारांनी सर्वत्र विध्वंस व प्रचंड रक्तपात सुरू केला. या सर्व अत्याचारांना निजामाची मूक संमती होती. हैदराबाद संस्थानातील जनतेच्या मागणीकडे निजाम दुर्लक्ष करत होता. त्यांना भारतात सामील होण्याऐवजी स्वतंत्र राष्ट्र म्हणून राहायचे होते. यासाठी त्यांनी पाकिस्तानची मदत घेण्याचा प्रयत्न केला.

**ऑपरेशन पोलो,**
**निजामाविरुद्ध पोलिस कारवाई**

निजामाचे मनसुबे पाहून भारत सरकारने कठोर पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला. भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी निजामाच्या जुलमी राजवटीला संपवण्यासाठी 'पोलिस कारवाई' सुरू करण्याचा आदेश दिला. हैदराबाद संस्थांनावरील लढाईची ही योजना 'ऑपरेशन पोलो' या सांकेतिक नावाने ओळखली जाते.

भारतीय सेनेच्या सदर्न कमांडचे प्रमुख जनरल गोडार्ड यांनी ही योजना तयार केली. मात्र, नंतर ते निवृत्त झाले आणि त्यांच्याजागी लेफ्टनंट जनरल राजेंद्रसिंग यांची नियुक्ती झाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मेजर जनरल जयंत चौधरी, मेजर जनरल डी. एस. ब्रार, मेजर जनरल ए. ए. रुद्र, ब्रिगेडीयर शिवदत्त सिंग आणि एअरव्हाईस मार्शल मुखर्जी यांनी ही योजना राबवली व पूर्णत्वाला नेली.

---------------

(उर्वरीत भाग पुढील अंकी)

■ ■ ■

# पितृपक्षातच कावळ्यांचे स्मरण..?



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८

तसा कावळा सजीवसृष्टीत नावांप्रमाणेच काळा पृष्ठवंशीय पक्षी होय. कावळा आणि मानवाचे जन्मोजन्मीचं नातं असं समीकरण. कावळा आणि मानवी नातं हे कसे काय म्हणायचे, असे आपल्याला वाटतचं असेल! आपण आपल्या बालपणी नाही का? कावळ्याला 'कावळे दादा' आणि चिमणीला 'चिऊताई' म्हणायचो. हो, तिथूनचं आपलं नातं सुरू होते आणि मृत्यूनंतरही प्रतिवर्षी येणाऱ्या पितृपक्षात त्यांचे स्मरण होतेच ना..! मग आहे की नाही, जन्मोजन्मीचं नातं.

कावळ्याचा आणि आपला परिचय होतो तो 'कावळ्याचं घर शेणाचे, चिमणीचं घर मेणाचे' बालकथेतून.पुढे हा कावळा जणू मानवी सहजीवनाचा भाग बनतो. अर्थात त्याला कुत्रा, मांजरी, पोपटा सारखे त्यांचे पालन करीत नाही. कारण त्याला पूर्वपार रुढीनुसार मानवाने शुभ/अशुभ म्हणून तर कधी 'बिच्चारा' असं ठरवून त्याला दुर्लक्षित केलं आहे.

पक्षीतज्ञांच्या म्हणण्यानुसार कावळा उष्टकटिबंधीय प्रदेशात वावरतो. तो समूहात राहणे पसंत करतो. तसे त्यास सामुदायिक इतर सहकाऱ्यांच्या धोक्याची सूचना आणि पूरकअन्न शोधण्यासाठी एकमेकांशी संवाद करतात. कावळ्यांच्या उत्क्रांतीचा इतिहास खूप जुना आहे, असे सांगितले जाते. म्हणून त्याचा उल्लेख पौराणिक कथेत सुद्धा आढळतो.

संत वाङःमयात सुद्धा त्याचा उल्लेख आढळतो. कावळे हे पूर्वाश्रमीचे जंगलातले पक्षी होते. लोक वस्तीत राहून त्यांची जीवनशैली बदलली आहे. कावळ्यांनी आपल्या अधिवासात राहून अनेक परिस्थितींशी जुळून घेतले आहे. मानवी वस्त्यांत राहून अन्न शोधणे, घरटे बनविणे, शिकारींपासून संरक्षण करणे शिकले आहे.

कावळा पर्यावरणीय संरक्षणात अत्यंत मोलाची भूमिका बजावतो. त्याला सर्वभक्षी म्हणून बघितले जाते. मानवी वस्त्यातील अन्नांचे तुकडे, कीटक, मृतप्राणी, फळे,धान्य शिवाय स्वच्छ पाणी पितो. त्याच्या आहारात विविधता असून ते स्वतः अन्नाचा शोध घेतात. जिथे अन्नाची उपलब्धता आहे; तिथे इतर कावळ्यांनाही बोलावतो. आज मानवाची झपाट्याने बदललेली जीवनशैलीच्या परिणामाने शहरीकरणाच्या रूपाने कावळ्यांच्या नैसर्गिक अधिकारांवर विपरीत परिणाम होत आहे. सतत होणारी वृक्षतोड कावळ्यांचे अधिवास संपुष्टात आणत आहे. त्यांच्या अधिवासातील बदलांमुळे काकवंशावर मोठा विपरीत परिणाम होताना दिसतो.

त्यांच्या नैसर्गिक अन्न स्त्रोताच्या अभावामुळे कावळ्यांची दर्शन दुर्लभ होऊन बसले आहे. कोणी एकेकाळी या झाडांवरून दुसऱ्या झाडांवर सतत फिरणारे थवे आज दुर्लभ झालेले दिसतात.

कावळे साधारणतः जून ते सप्टेंबर या काळात झाडावर घरटे बांधतात. अर्थात त्यांचा हा विणीचा हंगाम मानला जातो. आजही जुने जाणते शेतकरी कावळ्यांचे घरटे किती उंचीवर आहे. यावरून यंदा पर्जन्यमान कसे असेल, याचा अचूक अंदाज बांधतात. सजीव सृष्टीतला प्रत्येक पशुपक्षी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोलाची भूमिका बजावत असतात. त्यात कावळ्यांची अढळ स्थान आहे.

आज होणारी बेसुमार वृक्षतोड, हवेतील प्रदूषण, सगळीकडे होणारा कीटकनाशकांच्या वापरांमुळे सजीवसृष्टी आज धोक्यात आली आहे. पर्यावरणा विषयी आजही मनुष्य प्राणी गाफिल आहे. हे जर असेच चालत राहिले तर,भविष्यातील पीढीला पितृपक्षात दर्भाचा कावळा करावा लागेल काय? हा प्रश्न आज पडताना दिसतो.

# लोकशाहीचा कणा मजबूत करण्याची वेळ



डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार
९४२२१२५६५६

लोकशाहीच्या बळकटीचा पहिला पाया म्हणजे अचूक मतदार यादी. जर यादीच त्रुटीपूर्ण असेल तर निष्पक्ष निवडणुकीचं स्वप्न अपुरं राहील. बिहारमध्ये निवडणूक आयोगाने जेव्हा विशेष सखोल पुनरावलोकन सुरू केलं, तेव्हा राजकीय वर्तुळात भूचाल आला. विरोधकांनी याला लोकशाहीवर हल्ला ठरवलं, पण न्यायालयीन सुनावण्या आणि सखोल चर्चेनंतर हे स्पष्ट झालं की मतदार यादी शुद्धीकरण ही निवडणूक आयोगाची जबाबदारीसुद्धा आहे आणि अधिकारही.

या प्रक्रियेमुळे प्रथमच सर्वसामान्य मतदारांना समजलं की मतदार यादीत नाव जोडणं किंवा दुरुस्ती करणं ही त्यांची वैयक्तिक जबाबदारी आहे, पक्ष किंवा नेत्यांवर अवलंबून राहून ते शक्य नाही. गंमतीशीर बाब म्हणजे विरोधकांनी दिलेल्या बहुतांश हरकती या नव्या नावं जोडण्याऐवजी जुनी नावं काढून टाकण्याशी संबंधित होत्या.

कॉंग्रेसने दावा केला की तिने ८९ लाख हरकती दिल्या, पण त्यातील बहुतेक काटछाट संबंधी होत्या. अखेरीस आयोगाने सुमारे ६५ लाख नावं वगळली, ज्यात मृत, स्थलांतरित आणि अनुपलब्ध मतदारांचा समावेश होता. प्रश्न असा आहे की जेव्हा प्रत्यक्षात यादीची साफसफाई सुरू होती, तेव्हा तिला लोकशाहीचा संकटकाळ का म्हटलं गेलं?

**बंगालमधील खरी कसोटी**

एसआयआरची खरी कसोटी आता पश्चिम बंगालमध्ये होणार आहे. तेथे घुसखोरी आणि प्रशासनाचं राजकारणीकरण यामुळे मतदार यादीच्या शुद्धतेवर नेहमीच प्रश्न उपस्थित होत आले आहेत.

आकडेवारीनुसार बंगालच्या सीमावर्ती जिल्ह्यांत–उत्तर २४ परगणा, मालदा आणि मुर्शिदाबाद–मतदार वाढ दर राष्ट्रीय सरासरीपेक्षा (1.5-2%) दुप्पट म्हणजे 3.5-4% इतकी आहे. याचा अर्थ यादीत संशयास्पद नावं असण्याची शक्यता आहे. जर बंगालमध्ये ही प्रक्रिया यशस्वी झाली, तर देशभरात तिचा मार्ग सुकर होईल.

**तंत्रज्ञान का आवश्यक आहे?**

* देशातील नोंदणीकृत मतदार : सुमारे 98 कोटी
* निवडणूक आयोगाचा अंदाज : 6-7% नावं डुप्लिकेट किंवा चुकीची
* दरवर्षी सरासरी 2 लाख लोक नागरिकत्व सोडून परदेशात स्थायिक होतात
* आधार, पासपोर्ट, पॅन आणि महानगरपालिका डेटा लिंक केल्यास डुप्लिकेट नावं आपोआप वगळली जाऊ शकतात.

**बिहारमधून वगळलेली नावं : वर्गीकरण**

| प्रकार | संख्या (अंदाजे) |
|---|---|
| मृत मतदार | २२ लाख |
| स्थलांतरित मतदार | १८ लाख |
| अनुपलब्ध/लुप्त | २५ लाख |
| एकूण | ६५ लाख |

सध्या पासपोर्ट कार्यालय आणि गृहमंत्रालयाचा डेटा निवडणूक आयोगाला थेट उपलब्ध होत नाही. जर ही व्यवस्था झाली, तर मृत किंवा परदेशात स्थायिक झालेल्या नागरिकांची नावं वेळेवर काढली जाऊ शकतील. यामुळे निवडणूक प्रक्रिया पारदर्शक बनेल आणि जनतेचा विश्वास अधिक दृढ होईल.

आजची खरी गरज ही आहे की सत्ताधारी आणि विरोधकांनी मिळून या मोहिमेला यशस्वी करावं. मतदार यादीत फक्त भारतीय नागरिकांची नावं असावीत आणि अद्ययावत प्रक्रिया पूर्णपणे स्वयंचलित व्हावी–यातच लोकशाहीची खरी ताकद दडलेली आहे. रक्क ला वादग्रस्त ठरविण्याऐवजी पारदर्शक आणि विश्वासार्ह लोकशाहीच्या दिशेने ही एक संधी म्हणून पाहिलं पाहिजे.

■ ■ ■

## वाचक लिहितात

**मूर्ती कला एक जबाबदारी**

काही दिवसांनी नवरात्र सुरू होत असून, दुर्गादेवीच्या मूर्तीची निर्मिती अंतिम टप्प्यावर आहे. मध्य प्रदेशातील भोपाळ येथे श्री दुर्गादेवीच्या मूर्ती मोठ्या प्रमाणात बनवल्या जातात. यावर्षी कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे बनविलेल्या श्री दुर्गादेवीच्या रूपानुसार बालिकेप्रमाणे दिसणाऱ्या देवीच्या मूर्तींना विशेष मागणी असल्याने मूर्तिकारांनी तशाच पद्धतीच्या मूर्ती बनवण्याला प्राधान्य दिले आहे.

हे बनवत असताना देवीच्या मूळ स्वरूपातच पालट करण्यात आला आहे. गणपती किंवा श्री दुर्गा देवी ह्या असुरांचा संहार करणाऱ्या देवता असल्याने मूळ स्वरूपाच्या मूर्ती बनवणे योग्य आहे. महिषासुराचे मर्दन करणारी, उग्र भाव असलेली श्री दुर्गा मातेची मूर्ती जितकी मारक तितकीच सज्जनांना आश्वस्त करणारी असते पण कलेच्या नावाखाली मूर्तीच्या मूळ स्वरूपात बदल करून देवीला शस्त्रहीन किंवा बालिकेच्या रूपात दाखविणे हे त्या देवतेचा अपमान करण्यासारखेच आहे.

दहा हातात दहा शस्त्र घेतलेली श्री दुर्गादेवीची मूर्ती ही धर्मरक्षण, शक्ती आणि दुष्टांचा नाश यांचे प्रतीक आहे अशी मूर्ती पाहणाऱ्याच्या मनात संकटांशी सामना करण्याची शक्ती मिळते पण अन्य रुपात, वेशभूषेत असणारी, शस्त्रहीन मूर्ति ह्या कार्टून प्रमाणे वाटतात व त्यांचा तसा प्रभाव देखील नसतो. डिजिटल माध्यमाद्वारे बनवलेल्या अशा देवतांच्या चित्रांना डिजिटल अवतार असे म्हटले जाते.

ही चित्रे सामाजिक माध्यमांवर मोठ्या प्रमाणात वायरल ही होतात त्यामुळे त्यांची मागणी वाढते. रशिया, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान या देशात श्री दुर्गादेवीच्या मूतीर्ची मोठी मागणी असते.

यंदा एआयच्या माध्यमातून बनवलेले गेलेल्या चित्रानुसार बालिका रूपात बनवलेल्या मूर्तीच्या विक्रीत दुप्पट, तिप्पटीने वाढ झाली आहे. कोणतीही कला असो मग ती चित्रकला असो, मूर्ती कला असो, या द्वारे जे सादर केले जाते त्यात असणाऱ्या देवदेवतांचे तत्व तिथे कार्यरत होऊन ते बनवणाऱ्याला जसे मदत करते तसेच ते पाहणाऱ्यालाही मदत करते. त्यामुळे मूर्तीचे किंवा चित्रातल्या देवदेवतांचे मूळ स्वरूप दाखवणे किंवा घडविणे हे जवाबदारीचे व जिकिरीचे काम आहे.ज्या कलेतून देवाची स्पंदने तुमच्या कडे येतात, देव तुमच्या कडे येतो तीच खरी कला आहे.

■ लीना मकरंद गाडगीळ
पनवेल.

# दीर्घ उपवासानंतर कोणत्या गोष्टी खाणे टाळाव्यात



लवकरच नवरात्र सुरु होणार आहे. ज्यामध्ये लोक संपूर्ण ९ दिवसांचा उपवास करतात. कोणताही व्रत केल्यानंतर त्याच्या पारणाला विशेष महत्त्व आहे म्हणजे उपवास सोडण्याच्या विधिला. पण कोणत्याही व्रताच्या पारणावेळी अन्नाची विशेष काळजी घेणे फार आवश्यक असते. म्हणजे तुम्ही उपवास सोडताना कोणतं अन्न ग्रहण करता हे जास्त महत्त्वाचं आहे. कारण जास्त दिवस उपवास केल्याने पचनक्रिया मंदावते. त्यामुळे उपवास सोडताना पदार्थांच्या निवडीमध्ये चूक झाली तर त्या निष्काळजीपणामुळे पचन बिघडण्याची तसेच आरोग्य बिघडण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत, उपवासाच्या पारणानंतर कोणत्या गोष्टी खाऊ नयेत हे जाणून घेऊयात.

**तिखट आणि मसालेदार पदार्थ**

उपवास सोडल्यानंतर, कधीही मसालेदार आणि तिखट पदार्थ खाऊ नयेत. दीर्घ उपवासानंतर आतड्यांचे अस्तर खूप मऊ होते. अशा परिस्थितीत, मिरचीचा तिखटपणा अन्ननलिकेतून आतड्यांचे अस्तर जाळतो. ज्यामुळे अनेक समस्या उद्भवू शकतात.

**आंबट पदार्थ**

उपवास सोडल्यानंतर दही, ताक, लिंबू यांसारखे आंबट पदार्थ टाळावेत. आंबट पदार्थांमध्ये आम्लयुक्त पदार्थांचे प्रमाण जास्त असते जे आतड्यांच्या अस्तरांना नुकसान पोहोचवू शकतात. त्यामुळे पचनक्रिया बिघडते आणि दीर्घकाळात छातीत जळजळ होण्याची समस्या उद्भवू शकते.

**जड धान्याचे पीठ, जसे की बेसन**

अशा पदार्थांमुळे बद्धकोष्ठता होते आणि ते पचण्यास कठीण असतात. उपवास संपल्यानंतर या पिठाचे कोणतेही पदार्थ खाऊ नयेत. बेसन खाल्ल्याने पोटात बद्धकोष्ठता होते. आणि त्याचे पचन देखील लगेच होत नाही.

**गोड आणि साखरयुक्त पदार्थ**

उपवास सोडल्यानंतर, तुम्ही घन गोड पदार्थ खाणे पूर्णपणे टाळावे. जर तुम्हाला गोड पदार्थ खायचे असतील तर द्रव गोड पदार्थ प्या. यामुळे शरीराला आराम मिळेल. परंतु जड गोड खाल्ल्याने पदार्थांमुळे बद्धकोष्ठतेची समस्या उद्भवू शकते.

**थंड पदार्थही खाणे टाळा**

उपवासानंतर, थंड पदार्थ आणि द्रवपदार्थ जसे की थंड भात खाणे देखील टाळावे

**किती दिवस सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे?**

जर तुम्ही नवरात्रीचे नऊ दिवस सतत उपवास करत असाल तर किमान चार ते पाच दिवस खाण्याच्या या नियमांची काळजी घेणे आवश्यक आहे. जेणेकरून शरीर आणि पचनसंस्था पूर्णपणे स्थिर होईल. एक दिवस उपवास करणाऱ्यांनी दुसऱ्या दिवशी उपवास सोडल्यानंतर देखील खाण्या-पिण्याची काळजी घेणे गरजेचे आहे. जेणेकरून आरोग्य बिघडू नये.

**कोणते पदार्थ खावेत?**

उपवास सोडल्यानंतर, नेहमी सहज पचणारे अन्न खावे. त्याचप्रमाणे, द्रव गोड पदार्थ प्यायले तरी चालते. यामुळे तुमच्या पचनाला त्रास होण्याऐवजी आतड्यांमध्ये अन्न पचण्यास मदत होईल.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

**या पाखरांनो परत या!**

भारत 'माता ' मी तुमची
तुम्ही माझी लेकुरे
जन्म घेऊनी या भूवरती
कुशीत माज्या वाढले रे.. !

पालन पोषण करूनी
'स्वयंपुर्ण ' तुम्हा केले रे
वेळ येता पांग फेडण्याची
सोडूनी परदेशी गेले रे !!

बुध्दीवंत लेकरे विदेशी राहे
हे शल्य माज्या हृदयी आहे
गुणवंतानो एक व्हा सारे
वाढवा 'तिरंगा 'ची शान रे !



## तनाएराचे नवे फेस्टिव्ह कलेक्शन 'मियारा', यंदाच्या सणासुदीत दोन अंकी वृद्धीचे अनुमान

**नागपूर, १७ सप्टेंबर :** महिलांचा एथनिक वेयर ब्रँड आणि टाटा परिवारातील एक सदस्य, तनाएराने प्रस्तुत केले आहे नवे फेस्टिव्ह कलेक्शन 'मियारा' – हाताने विणलेले आणि शुद्धतेमध्ये रुजलेले हे कलेक्शन आधुनिक महिलांसाठी तयार केले आहे. आधुनिक डिझाईन आणि पारंपरिक कला यांच्या अप्रतिम विणीतून एक आगळीवेगळी डिझाईन भाषा तयार होते जी या कलेक्शनला इतरांपेक्षा वेगळे स्थान प्रदान करते. विविध विणकाम परंपरा 'मियारा' मध्ये पाहायला मिळतात. स्वतःची आवड, स्वप्ने पूर्ण करण्यासाठी असो किंवा एखाद्या प्रिय व्यक्तीला विचारपूर्वक दिलेली भेट असो, आनंद आणि उत्साहाचा प्रत्येक क्षण शानदार व संस्मरणीय बनावा ही यामागची भावना आहे.

वर्षातील सर्वात मोठे सण जवळ येत आहेत, त्यांना अनुसरून तनाएराने आपले नवे कॅम्पेन देखील तयार केले आहे, 'द गिफ्ट ऑफ प्युअर लव्ह', सणासुदीच्या काळात साडी म्हणजे कालातीत प्रेमाचे प्रतीक असा साडीचा सन्मान या कॅम्पेनमध्ये करण्यात आला आहे. प्रियजनांना भेटवस्तू देण्यामागची आपली भावना ब्रँडने या कॅम्पेनमध्ये व्यक्त केली आहे, तनाएरा साडी म्हणजे तुमच्या भावनेइतकी दुर्लभ आणि मौल्यवान, ती भेट म्हणून देणे प्रेमाचा सोहळा साजरे करण्यासारखे आहे याची आठवण हे कॅम्पेन करून देते. शुद्धता हेच प्रेमाचे खरे माप आहे, शुद्ध प्रेम पाहता येत नाही, ते जाणिवेतून मनाला स्पर्श करते, हा विचार हे कॅम्पेन मांडते. तनाएराचे रिटेल प्रमुख, अनिर्बन बॅनर्जी म्हणाले, यंदाच्या सीझनसाठी आम्ही प्रस्तुत केलेले मियारा कलेक्शन हे कल्पनेचे आणि वैविध्यपूर्ण विणकामातून प्रदर्शित होणाऱ्या वारशाचे प्रतिबिंब आहे. तनाएरामध्ये आम्ही असे मानतो की, साडी ही फक्त परिधान केली जात नाही तर अनुभवली जाते. साडी कोणत्याही सोहळ्याला तुमचा स्वतःचा समारंभ बनवते, तुमच्या भेटवस्तूंना शुद्ध प्रेमाचे प्रतीक बनवते. हीच भावना आम्ही आमच्या फेस्टिव्ह कॅम्पेनमधून मांडली आहे. आमच्या विशेष ऑफर्स आणि गोल्डन कक्रून योजनेमधून आमची इच्छा आहे की, तनाएरा साडी हा यंदाच्या सीझनमधील ग्राहकांची सर्वात सार्थक निवड बनावी. बाजारपेठेत तेजी आहे, आमचे अनुमान आहे की, या संपूर्ण सणासुदीच्या काळात आमच्या व्यवसायात दोन अंकी वाढ होईल.

## अदाणी सिमेंट फ्युचर एक्स भारतातील नव्या पिढीचे लीडर्स तयार करणार

**अहमदाबाद, १७ सप्टेंबर :** जगातील नवव्या क्रमांकाची सर्वात मोठी बिल्डिंग मटेरियल्स आणि सोल्यूशन्स कंपनी तसेच अदाणी समूहाचा भाग असलेल्या अदाणी सिमेंटने इंजिनियर डेच्या निमित्ताने अदाणी सिमेंट फ्युचर एक्स या देशव्यापी शैक्षणिक-उद्योग सहभाग कार्यक्रमाची घोषणा केली आहे. या उपक्रमाचा उद्देश वर्गखोल्यांतील शिक्षणाला प्रत्यक्ष जगातील पायाभूत सुविधा आणि टिकाऊपणाच्या आव्हानांशी जोडणे आहे.

अदाणी सिमेंट फ्युचर एक्सची सुरुवात ही योग्य वेळेवर आणि उद्योगाला दिशा देणारे पाऊल आहे. याचा उद्देश भविष्यासाठी सक्षम कार्यबल तयार करणे आहे. हा उपक्रम सरकारच्या योग्य भारत मिशन आणि शिक्षण मंत्रालयाच्या त्या आवाहनाशी जोडलेला आहे, ज्यामध्ये रोजगार आणि उद्योजकतेच्या कौशल्यांची कमतरता भरून काढणे, भारताच्या लोकसंख्येच्या ताकदीचा योग्य उपयोग करणे आणि विकसित भारत २०४७ साठी सक्षम मानवी भांडवल उपलब्ध करून देणे यावर भर दिला आहे.

देशभरातील १०० हून अधिक प्रमुख इंजिनिअरिंग संस्था (आयआयटी, एनआयटी, नामांकित खासगी/राज्य महाविद्यालये) आणि १०० पेक्षा अधिक शहरांतील १००+ शाळांशी जोडून, हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेपासून करिअरपर्यंतच्या सातत्यपूर्ण प्रवासासाठी तयार करण्यात आला आहे, जेणेकरून भारताच्या लोकसंख्येच्या ताकदीला राष्ट्रनिर्मितीसाठी एका कुशल शक्तीत बदलता येईल.

अदानी ग्रुपच्या सिमेंट बिझनेसचे सीईओ विनोद बाहेती म्हणाले: अदाणी सिमेंट फ्युचर एक्स ही विकसित भारत २०४७ या भारताच्या दृष्टिकोनाशी असलेली आमची बांधिलकी आहे. जिथे सरकार योग्य भारत मिशन द्वारे तरुणांना रोजगार आणि उद्यमशीलतेची कौशल्ये देऊन सक्षम करत आहे, तिथे आमचा हा उपक्रम शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात वास्तवातील शिकण्याचे पूल बांधून या प्रयत्नाला अधिक बळकटी देतो. स्मार्ट सिमेंट लॅब्सपासून रोबोटिक्स, एआय-आधारित इनोव्हेशन, डिकार्बोनायझेशन संशोधन आणि करिअर संधींपर्यंत, आम्ही हे सुनिश्चित करत आहोत की भारताची युवा प्रतिभा फक्त नोकरीस पात्र राहू नये, तर उद्योजकही बनावी. तरुणांची शक्ती ही विकसित भारताची खरी प्रेरक शक्ती आहे आणि आम्ही आमचा दृढ विश्वास आहे की पढेगा इंडिया ते बढेगा इंडिया. ज्याप्रमाणे सिमेंट देशाच्या पायाभूत सुविधांची उभारणी करते, त्याचप्रमाणे फ्युचरएक्स भारतातील जनरेशन झेडच्या आकांक्षा आणि क्षमतांची उभारणी करेल आणि प्रतिभा, नवकल्पना व जबाबदारी यांना एकत्रित करून देशाच्या प्रगतीला गती देईल.

## २०१४ ते २०२५: प्रेम, नाट्य आणि भावनांचा दशकभराच्या प्रवासाचा समारोप झी टीव्हीवरील कुमकुम भाग्यचा ११ वर्षांचा सुंदर प्रवास आता समाप्त!



**मुंबई, १७ सप्टेंबर :** २०१४ साली झी टीव्हीवरील कुमकुम भाग्यने आपला अद्भुत प्रवास सुरू केला आणि पहिल्या भागापासूनच ही फक्त एक मालिका न राहता कुटुंबाचा आणि हृदयाचा भाग बनली. देशभरातील लाखो प्रेक्षकांसाठी ही आनंद, दिलासा आणि एकत्रतेचा विश्वासू सोबती ठरली. प्रत्येक भागासोबत, मनाला भिडणाऱ्या कथा, अनपेक्षित वळणे आणि हृदयस्पर्शी क्षणांमुळे प्रेक्षकांनी पात्रांसोबत हसणे, रडणे आणि स्वप्न पाहणे अनुभवले आणि हा प्रवास चुकवणे जवळजवळ अशक्यच ठरले.

वर्षानुवर्षे प्रेक्षकांचे अखंड प्रेम, साथ आणि पिढ्यान पिढ्या जोडलेला चाहतावर्ग यामुळे कुमकुम भाग्य खऱ्या अर्थाने घराघरातील नाव बनले. आता ११ अविस्मरणीय वर्षांनंतर जपलेल्या असंख्य आठवणींनंतर आणि कुटुंबांना प्रत्येक संध्याकाळी टीव्हीसमोर एकत्र आणल्यानंतर, या मालिकेचा मनापासून निरोप देण्याची वेळ आली आहे. भारतीय दूरदर्शनच्या सुवर्ण इतिहासात ही कहाणी कायमस्वरूपी एक खास स्थान मिळवून राहील.

जरी रोमहर्षक कथा प्रेक्षकांना खिळवून ठेवत होती, तरीही खरी जादू निर्माण केली ती कलाकारांनी प्रत्येक प्रेममध्ये मनापासून केलेल्या अभिनयाने ज्यामुळे हा प्रवास खऱ्या अर्थाने अविस्मरणीय झाला. या मालिकेने लाखो प्रेक्षकांना अशा जगात नेले जिथे पात्रे कुटुंबासारखी भासत होती आणि कलाकार आपल्या दैनंदिन आयुष्याचा भाग बनले.

कथा जरी शेवटाला पोहोचली असली तरी कुमकुम भाग्यचे हास्य, अश्रू आणि प्रेम अनेक वर्षे चाहत्यांच्या हृदयात गुंजत राहील.

## लग्नाचा प्रत्येक क्षण खास करण्यासाठी सोनी इंडिया वेडिंग क्रिएटर्सना आमंत्रित करते

**नवी दिल्ली, १५ सप्टेंबर :** सोनी इंडियाने आज अब कुछ सिनेमॅटिक करते हैं नावाची नवीन जाहिरात प्रदर्शित केली. भारतीय लग्नांना अधिक खास बनवणारे हेच खरे नायक आहेत. स्थानिक फोटो आणि व्हिडिओ स्टुडिओ पिढ्यानपिढ्या भारतातील ही प्रेमकथा टिपत आले आहेत.



अनेक दशकांपासून, भारतातील लहान शहरांमधील लग्नाचे व्हिडिओ देखील अशाच स्थानिक हातांनी तयार केले आहेत. आणि मग पिढ्यानपिढ्या तीच परंपरा सुरू राहिली आहे. हे स्टुडिओ घरातील साऱ्यांच्याच विश्वासाचे होते. शिवाय कुटुंबातील सर्वात प्रिय क्षण देखील त्यांच्या कॅमेऱ्यात जतन करून ठेवलेले असायचे. आता मात्र, काळानुसार जसे जग बदलले आहे, तसेच लग्न देखील बदलले आहेत. म्हणून, आता कॅमेरे देखील बदलण्याची गरज आहे.

या नवीन जाहिरातीच्या माध्यमातून सोनी केवळ यंत्रणाच अपग्रेड करत नाही तर कलेला देखील एक नवीन दृष्टिकोन देते. सोनी सिनेमा लाईनमधील अगदी प्राथमिक मॉडेल एफएक्स३० देखील उत्कृष्ट सिनेमॅटिक अनुभव देते. आणि तेही जास्त किंमत न मोजता. कॉम्पॅक्ट, जबरदस्त रिझल्ट आणि व्यावसायिक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असा हा एफएक्स३० प्रत्येक स्थानिक स्टुडिओ आणि कॅमेरा असलेल्या प्रत्येकाच्या हातात जादू आणते.

लॉन्चिंगच्या वेळी, सोनी इंडियाचे इमेजिंग बिझनेस प्रमुख मुकेश श्रीवास्तव म्हणाले: लग्न म्हणजे केवळ एक समारंभ नाही. आयुष्यातील तो असा सोहोळा आहे, जो सिनेमाप्रमाणेच भव्यतेने आणि हटके स्वरुपात सांगितला गेला पाहिजे. गेल्या काही वर्षांत, भारतीय विवाह पूर्णपणे बदलून गेल्याचे आम्ही पाहिले आहे. आता हा जेवढा कौटुंबिक सोहळा असतो तेवढाच तो सामाजिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचा असतो. कारण, आज जोडप्यांना केवळ त्यांचे क्षण रेकॉर्ड करायचे नाहीत, तर ते पिढ्यानपिढ्या अनुभवता येतील अशा स्वरूपात जतन करून ठेवायचे असतात. 'अब कुछ सिनेमॅटिक करते हैं' सह, आम्ही अनेक दशकांपासून या आठवणी जतन करणाऱ्या जुन्या स्टुडिओंप्रती कृतज्ञता व्यक्त करतो. आणि त्यांना आताच्या बदलासह नवीन युगाचा स्वीकार करण्यास आमंत्रित करत आहोत. ही जाहिरात केवळ तंत्रज्ञानाची नाही; तर ती परंपरेचा आदर करण्यासोबतच बदल स्वीकारण्याबद्दलही आहे. आणि प्रत्येक प्रेमकथेला एक वेगळाच सिनेमॅटिक लूक देण्याबद्दल आहे.

## एसबीआय म्युच्युअल फंडचा गुंतवणूकदार शिक्षण व जागरूकता उपक्रम

**मुंबई, १७ सप्टेंबर :** बचतीमधून गुंतवणूक करण्याचे प्रमाण वाढल्याने भारतातील गुंतवणुकीच्या क्षेत्रात मोठे परिवर्तन झाले आहे. पारंपारिक गुंतवणुकीसह आधुनिक वित्तीय साधनांपर्यंत भांडवली बाजारात प्रवेश करत मालमत्ता निर्मिती करू इच्छिणाऱ्या गुंतवणूकदारांच्या वर्तनात आमूलाग्र बदल झाला आहे.

एकेकाळी मुदत ठेवींसारख्या पारंपारिक साधनांचे वर्चस्व असलेल्या या बाजारपेठेत म्युच्युअल फंड, आरईआयटी आणि ईटीएफ सारख्या आधुनिक वित्तीय उत्पादनांचा अवलंब होण्यास सुरुवात झाली आहे. सुरुवातीला म्युच्युअल फंडांचा अवलंब महानगर व प्रथम श्रेणीच्या शहरांमध्ये सर्वाधिक होता, पण अलीकडील ट्रेंडमध्ये लक्षणीय बदल दिसून येतो, जेथे द्वितीय व तृतीय श्रेणीची शहरे (बी३० किंवा बीयॉण्ड टॉप ३०' शहरे म्हणून वर्गीकृत) म्युच्युअल फंड उद्योगासाठी प्रबळ विकास स्रोत ठरत आहेत.

असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया (एएमएफआय) नुसार, जुलै २०२५ पर्यंत म्युच्युअल फंड उद्योगाच्या एकूण व्यवस्थापनाखालील मालमत्तेमध्ये (एयूएम) बी३० शहरांचा हिस्सा १८ टक्के होता. या प्रदेशांमधील एयूएम जून २०२५ मध्ये १३.८० लाख कोटी रूपयांवरून जुलै २०२५ मध्ये १४.२० लाख कोटी रूपयांपर्यंत पोहोचला, ज्यामध्ये मासिक ३ टक्के वाढ झाली, तुलनेत जुलै २०२४ मध्ये ११.७७ लाख कोटी रूपये होता, ज्यामध्ये वार्षिक २१ टक्के वाढ झाली. या वाढीमधून लहान शहरांमध्ये वाढते आर्थिक प्रमाण आणि गुंतवणूकदारांचा वाढता विश्वास दिसून येतो. (स्रोत: टी३० विरुद्ध बी३० अहवाल)

बाजारपेठेत अस्थिरता असताना देखील सिस्टमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन्स (एसआयपी)द्वारे मासिक गुंतवणूक प्रमाणात सातत्यपूर्ण वाढ दिसून आली आहे, यामधून गुंतवणूकदार बाजारपेठेतील स्थितीकडे दुर्लक्ष करून शिस्तबद्ध, दीर्घकालीन गुंतवणूक धोरणांना प्राधान्य देत असल्याचे निदर्शनास येते. या परिवर्तनामधून विविध व्यक्तींमध्ये वाढती आर्थिक परिपक्वता आणि सर्वसमावेशकता दिसून येते.

## ड्रामा आणि हंगामा सुरू राहणार!

**मुंबई, १७ सप्टेंबर :** या आठवड्यात एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन' आणि 'भाबीजी घर पर हैं' मध्ये अनेपक्षित ट्विस्ट्स कुटुंबांसाठी हास्य, गोंधळ आणि दुविधा आणणार आहेत. एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन'च्या आगामी एपिसोडबाबत गीतांजली मिश्रा ऊर्फ राजेश म्हणाल्या, ''राजेशच्या (गीतांजली मिश्रा) तिला अंधूक दिसत असल्याचे लक्षात येते आणि तपासणीनंतर समजते की तिला चष्म्याची गरज आहे. अवदेशिया (उर्मिला शर्मा) तिला इशारा देते की, हे बिलकसण समस्या आहे, तसेच ती दावा करते की पतीला चष्मा असलेल्या बायका कधीच आवडत नाहीत. हप्पू (योगेश त्रिपाठी) कबूल करत नाही की त्याला 'चश्मीश' महिला आवडत नाहीत तोपर्यंत राजेश अवदेशियाच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करते. कुटुंबापासून चष्मा लपवण्याचा निर्धार केलेली राजेश घरामध्ये विलक्षणपणे वागू लागते. तिचे विचित्र वर्तन, वस्तूंवर आदळणे आणि स्पष्ट पाहता येण्यासाठी डोळे मोठे करणे यामुळे कटोरी अम्माला (हिमानी शिवपुरी) वाटते की, तिला वेड लागले आहे. खोदी (शरद व्यास) तिच्या शंकांना हो ला हो देतो, ज्यामुळे कटोरी अम्मा आणि हप्पू दोघेही घाबरतात. एक कुटुंब मलायकाला (सोनल पनवर) विवाहाकरिता पाहण्यासाठी येते तेव्हा परिस्थिती आणखी बिकट होते आणि राजेशची अंधुक दृष्टी गोंधळ निर्माण करते. राजेश आणि अवदेशिया यांना वगळून कुटुंब राजेशला त्रास न देता परिस्थिती कशी हाताळायची यावर चर्चा करण्यासाठी गुपचूप बैठक आयोजित करते. त्यांना खरे काय कळेल का, की दरोगा हप्पू सिंगच्या घरात आणखी गोंधळाची परिस्थिती निर्माण होईल?''

## 'भाबीजी घर पर है' मध्ये नवरात्रीमधील तिवारी आणि विभुती यांचे महिला वेषांतर तुम्हाला अचंबित करेल!

**मुंबई, १७ सप्टेंबर :** सण आनंद, उत्साह व धमाल साजरीकरण घेऊन येतात, पण एण्ड टीव्हीवरील मालिका 'भाबीजी घर पर है' मध्ये ते हास्याचा अतिरिक्त डोस देखील घेऊन येतात. यंदा नवरात्रीला प्रेक्षकांना आनंददायी सरप्राइज मिळणार आहे, जेथे रोहिताश्व गौड (मनमोहन तिवारी) आणि आसिफ शेख (विभुती नारायण मिश्रा) महिला वेषांतर करतात, ज्यामुळे प्रत्येकजण अचंबित होईल. साड्या व लेहंगा परिधान करण्यापासून अवजड आभूषणे व आकर्षक मेकअप करण्यापर्यंत त्यांचे वेषांतर उत्तम कलाकृती दर्शवते. आगामी एपिसोडमध्ये हसवून-हसवून लोटपोट करणारा ट्विस्ट पाहायला मिळणार आहे, जेथे तिवारी व विभुतीची त्यांच्या आवडत्या भाबीजींसोबत दांडिया खेळण्याची इच्छा आहे. पण त्यामध्ये ट्विस्ट येते, अनिताला (विदिशा श्रीवास्तव) तिच्या ग्रुमिंग क्लासमधील विद्यार्थिनींकडून फक्त मुलींना प्रवेश असलेल्या दांडिया नाइटसाठी प्रायोजकत्व मिळते आणि ती अंगुरी (शुभांगी अत्रे) सोबत त्यामध्ये सहभाग घेण्याचे ठरवते. अस्वस्थ व निराश झालेले दोघे पुरुष महिलेच्या रूपात वेषांतर करत साजरीकरणामध्ये सहभागी होण्याची आणि त्यांच्या भाबीजींसोबत दांडिया खेळण्याची खोडकर योजना आखतात. त्यानंतर हसवून-हसवून लोटपोट करणारे क्षण, गोंधळ, कॉमेडी आणि उत्साहपूर्ण गरबाचे मनोरंजन मिळते.

आपला अनुभव सांगत रोहिताश्व गौड ऊर्फ मनमोहन तिवारी म्हणाले, गरबा एपिसोडसाठी महिला वेषांतर करताना खूप धमाल आली. मी यापूर्वी असे अवतार साकारले आहेत, पण हा लूक उत्सवी वातावरणामुळे अधिक खास आहे. लेहंगा-चोली, आकर्षक ज्वेलरी आणि लांब कुरळ्या केसांनी माझा लुक पूर्णपणे बदलला. मेकअप टीमने डोळ्यांच्या मेकअपपासून आभूषणांपर्यंत अद्वितीय कामगिरी केली आणि मी स्वतःला महिलेच्या रूपात आरशामध्ये पाहिले तेव्हा ते लुक पाहून भारावून गेलो. या लुकमध्ये गरबा खेळताना खूप धमाल आली, तितकाच आव्हानांचा सामना करावा लागला. पण मला हे परिवर्तन खूप आवडले, या लुकने माझ्या भूमिकेमध्ये नवीन उत्साहाची भर केली आहे आणि प्रेक्षकांना अधिक हास्यपूर्ण अनुभव मिळेल, याची खात्री आहे.''


## सॅमसंग गॅलेक्सी ए०६ ५जी १८९९ रूपयांपासून उपलब्ध



**मुंबई, १७ सप्टेंबर :** सॅमसंगने आज सणासुदीच्या काळापूर्वी गॅलेक्सी ए०६ ५जीच्या अभूतपूर्व किमतीची घोषणा केली. आजपासून गॅलेक्सी ए०६ ५जी लिमिटेड-पीरियड ऑफरचा भाग म्हणून फक्त ९८९९ रूपयांपासून उपलब्ध असेल. ही डील फिचर फोन किंवा ४जी स्मार्टफोनवरून गॅलेक्सी ए०६ ५जी मध्ये अपग्रेड करू पाहणाऱ्या ग्राहकांसाठी परिपूर्ण संधी देते, जो किफायतशीर दरामध्ये परिपूर्ण ५जी अनुभव देतो. तसेच, उत्सवी डिलचा भाग म्हणून गॅलेक्सी ए०६ ५जी खरेदी करणाऱ्या ग्राहकांना १३९९ रूपयांचा सॅमसंग २५ वॅट ट्रॅव्हल अॅडप्टर फक्त २९९ रूपयांना मिळेल. अधिक किफायतशीरपणाचा शोध घेत असलेले ग्राहक प्रतिमहिना फक्त ९०९ रूपयांमध्ये स्मार्टफोन खरेदी करू शकतात.

गॅलेक्सी ए०६ ५जी वरील उत्सवी डिलमधून डिजिटल तफावत दूर करण्याप्रती आणि लाखो ग्राहकांना परिपूर्ण ५जी अनुभवासह सक्षम करण्याप्रती सॅमसंगची कटिबद्धता दिसून येते. सर्वात किफायतशीर गॅलेक्सी ए सिरीज ५जी स्मार्टफोन गॅलेक्सी ए०६ ५जी ग्राहकांना विश्वसनीय कार्यक्षमता व दीर्घकाळापर्यंत टिकाऊपणासह अधिक मूल्य देण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. गॅलेक्सी ए०६ ५जी मध्ये सर्व टेलिकॉम ऑपरेटर्समध्ये सुधारित नेटवर्क कनेक्टीव्हिटी आणि जलद स्पीड्ससाठी सर्व नेटवर्कची कॉम्पॅटिबिलिटी, १२ ५जी बँड्स आणि फिचर्स कॅरिअर संयोजन आहे. मीडियाटेक डी६३०० प्रोसेसरची शक्ती असलेला गॅलेक्सी ए०६ ५जी शक्तिशाली कार्यक्षमतेची खात्री देतो, तसेच मल्टीटास्किंग, गेमिंग व स्ट्रिमिंगचा विनासायास आनंद देतो. या स्मार्टफोनमध्ये जवळपास १२ जीबी रॅमसह रॅम प्लस वैशिष्ट्य आहे.


## सीग्रामचा रॉयल स्टॅग चार नवीन प्रभावशाली आवाजांसह आपला सांस्कृतिक अनुनाद करतो आहे मजबूत, जे आहेत: सिद्धार्थ मल्होत्रा, बादशाह, नागा चैतन्य आणि पायल धारे

**गुरूग्राम, १७ सप्टेंबर :** सीग्रामच्या रॉयल स्टॅग या त्यांच्या श्रेणीतील लाईटहाऊस ब्रँडने सिद्धार्थ मल्होत्रा, बादशाह, नागा चैतन्य आणि पायल धारे या चार नवीन गतिमान व्यक्तिमत्त्वांना त्यांचे नवीन ब्रँड ॲम्बासीडर म्हणून सहभागी करून घेण्याची घोषणा केली. आता ते ब्रँडचा वारसा पुढे नेण्यात रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह आणि सूर्यकुमार यादव यांच्यासोबत सामील होतात. एकत्रितपणे, ते क्रिकेट, सिनेमा, संगीत, गेमिंग या भारतातील सर्वात प्रसिद्ध आवडींना मूर्त रूप देतात, तर रॉयल स्टॅगच्या लिव्ह इट लार्ज या तत्वाला सांगणारी धाडसी भावना, भितीविरहीत निवडी आणि निःसंकोच महत्त्वाकांक्षा दर्शवतात.

या बाबींसह ब्रँड त्याच्या प्रवासात एका आकर्षक नवीन अध्यायाला सुरुवात करतो. रॉयल स्टॅगने नेहमीच जोपासलेल्या त्याच उत्साहाचे आणि दृढनिश्चयाचे प्रतिनिधित्व हे आवाज करतात, मोठे स्वप्न पाहण्याची आणि प्रवासातील प्रत्येक महत्त्वपूर्ण टप्पा साजरा करण्याची भावना जोपसतात.


या भागीदारीबद्दल आपला उत्साह मांडतांना कलाकार सिद्धार्थ मल्होत्रा म्हणाले: मी ज्यावर विश्वास ठेवतो म्हणजेच नवीन गोष्टी करण्याचे धाडस आणि मोठेपणाने जगण्याची इच्छा म्हणजे रॉयल स्टॅग आहे. हा केवळ एक ब्रँड नसून, एक असा दृष्टिकोन आहे जो उत्कटता, महत्त्वाकांक्षा आणि स्वतःला पुढील स्तरावर नेण्याचे प्रयत्न साजरे करतो. लोकांना मोठे स्वप्न पाहण्याची आणि अधिक धाडसीपणे जगण्याची प्रेरणा देणाऱ्या प्रवासाचा मी सुद्धा एक भाग होण्यास उत्सुक आहे.

रॅपर बादशाहने म्हणाला: कोणत्याही परिस्थितीत, तुम्ही कोण आहात हे ओळखणे म्हणजे मोठे जीवन जगणे होय. तुम्ही कुठून सुरुवात करता हे महत्त्वाचे नाही – तुम्ही किती आत्मविश्वास आणि मेहनत किती करता हे महत्त्वाचे आहे. रॉयल स्टॅग त्याच विश्वासाचे प्रतीक आहे आणि म्हणूनच मी त्याच्यासोबत काम करण्यास उत्साहित आहे. एकत्रितपणे, आम्ही आमचे व्यक्तिमत्त्व सादर करण्यासाठी आणि लोकांना त्यांच्या प्रवासाचा, त्यांच्या मार्गाचा शोध घेण्यास प्रवृत्त करण्यासाठी येथे आलो आहोत.

अभिनेता नागा चैतन्य यांनी सहकार्याबद्दल आपले असे मत व्यक्त केले: रॉयल स्टॅग हा एक असा ब्रँड आहे जो संस्कृतीत रुजलेला आहे आणि सतत प्रगती करत असतो आणि म्हणूनच तो आज इतका संबंधित आहे. मी खरोखरच या तत्त्वाशी जोडलेला आहे आणि हे मूल्य प्रतिबिंबित करणाऱ्या आणि वर्तमान युवकांशी इतक्या अर्थपूर्णपणे जोडणाऱ्या ब्रँडचा भाग होण्यास मी उत्सुक आहे.

गेमर पायल धारे म्हणाली: रॉयल स्टॅगमध्ये प्रत्येक उत्साही स्वप्न पाहणाऱ्याला चालना देणाऱ्या निर्भय भावनेचे मूर्त स्वरूप आहे. माझ्यासाठी, माझी आवड आता माझा व्यवसाय बनली आहे. मी अडथळे पार केले आहेत, रूढींना आव्हान दिले आहे आणि माझ्या स्वतःच्या अटींवर यशाची पुनर्परिभाषा केली आहे. माझ्यासाठी, मोठे जगणे म्हणजे प्रत्येक संधीचा फायदा घेणे, प्रत्येक लहान किंवा मोठ्या टप्प्याचा आनंद घेणे होय. ही फक्त एका असाधारण गोष्टीची सुरुवात आहे.

## शब्दकोडे क्रमांक २२२०



**आडवे शब्द :-**

१) भारतात चार दिशांना चार मठ स्थापन करणारे पहिले हिंदू धर्मगुरु
६) जन्म-मृत्यू
९) युक्ती
१०) विद्यादान करणारा
११) बातमी
१३) टपाल
१४) मधमाशी
१७) खीर, दूध
२१) सगळीकडे
२३) फणसाचा एक प्रकार
२६) गव्हाची एक उत्कृष्ट जात
२७) नुकसान सोसावे लागणे (वा.प्र.)
३०) पदरावरती जरतारीचा ** नाचरा हवा, आई मला नेसव शालू नवा!
३१) माझा
३२) स्तुती करणारा
३४) करपलेला भाग
३६) राबता
३८) सिद्धता
४०) नस, धमनी
४२) सत्वांश
४४) उकल, स्पष्टीकरण
४५) अभंगातील जनाबाई
४६) चाणक्यनीती
४९) एक चतुर्थांशाचा पाढा
५०) छोटा
५२) प्रत्येक गावात
५४) तात्काळ
५६) अटीची भाषा
५८) चाकर
६०) टिकून राहणे
६१) फुरसत
६३) पार्वतीनंदन
६५) व्यापारी फायदा
६६) नदीचा काठ
६७) मृत्युदेवता
६८) सर्वात खालचे पाताळ

**उभे शब्द :-**

१) द्वेष
२) गौरी-हर
३) मडके
४) मीठ
५) सूत काढण्याची फिरकी, लोखंडी सळई
६) कथिल व शिसे यांच्या पासून बनलेला एक धातू
७) मऊ
८) साधारण
१०) फक्त, केवळ
१२) मक्षिका
१३) फिकीर
१५) श्रेष्ठ, अग्रभाग, जबाबदारी
१६) संथ चालणारा उभयचर प्राणी
१८) जेथे (सं)
१९) सूत, धागा तयार करण्याचे एक साधन
२०) मरणोन्मुख
२१) कारण
२२) जमिनीखाली येणारे फळ
२३) संकट
२४) व्यवस्थापक, कारभार पाहणारा
२५) उपकार
२७) उद्याच्या नंतरचा दिवस
२८) सीतापती
२९) पाण्याची लहर
३०) भुरळ घालणारी स्त्री
३३) रंग बदलणारा प्राणी
३५) रुधिर
३६) भावाची पत्नी
३७) टवटवीत
३९) चिखलाची भुसभुशीत जमीन
४१) सवाद्य मिरवणूक
४३) सदोदित
४४) आडवेच्या विरुद्ध
४६) सज्जन
४७) बेदाणे
४८) अश्रुंनी डोळे भरणे
५१) सोने
५२) गावठी
५३) वीरमरण
५५) कोलकाताचे विमानतळ
५७) आवड, द्रव
५९) अर्धा किलो
६२) उग्र
६३) हत्ती
६४) बाण

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## अलौकिक शक्तीसंदर्भातील विनोदी मालिका घरवाली पेडवाली'मध्ये रिचा सोनी रीटाच्या भूमिकेत!

**मुंबई, १७ सप्टेंबर :** एण्ड टीव्हीवरील आगामी नवीन मालिका घरवाली पेडवाली' हास्य, भयावह सरप्राइजेज आणि भावनांच्या धमाल रोलरकोस्टरचे मनोरंजन देण्यास सज्ज आहे. या नवीन संकल्पनेमध्ये मोहकतेची भर करत आहेत प्रतिभावान अभिनेत्री रिचा सोनी, ज्या सकारात्मक असलेली ग्लॅमरस, स्पष्टवादी व फॅशनप्रेमी महिला रीटाची भूमिका साकारणार आहेत. आधुनिक व उत्साही सासू रीटा मालिकेच्या कथानकामध्ये विनोद, उत्साह व ड्रामाचे अद्वितीय मिश्रण घेऊन येईल, ज्यामुळे ती या असामान्य लव्ह ट्रायंगलचा अद्वितीय भाग आहे.

या भूमिकेबाबत आनंद व्यक्त करत रिचा सोनी म्हणाल्या, रीटा उत्साही भूमिका आहे, मी यापूर्वी साकारलेल्या भूमिकांपेक्षा ही भूमिका अत्यंत वेगळी आहे. ती आधुनिक, स्टायलिश व स्पष्टवक्ता आहे, तसेच प्रेमळ असण्यासोबत तिच्या कुटुंबाची काळजी घेते. मला या भूमिकेबाबत आवडलेली बाब म्हणजे ती जीवनाकडे सकारात्मक दृष्टिने पाहते आणि तिच्या मोहकतेने अवतीभोवती असलेल्या व्यक्तींना प्रभावित करते. ती विशिष्ट शिस्तबद्ध सासू नाही, तर सहाय्यक, उत्साही असण्यासोबत तिच्यात खूप विलक्षणता सामावलेली आहे. मी देखील माझ्या कुटुंबाची खूप काळजी घेते. तिची भूमिका साकारताना उत्साहवर्धक वाटते, तसेच मला माझी विनोदी व ग्लॅमरस बाजू सादर करण्याची संधी मिळाली आहे, जी प्रेक्षकांनी कधीच पाहिलेली नाही.''

या मालिकेबाबत उत्सुक असलेल्या त्या पुढे म्हणाल्या, मालिका घरवाली पेडवाली'च्या संकल्पनेने माझे त्वरित लक्ष वेधून घेतले. मालिकेच्या शीर्षकामधूनच उत्सुकता जागृत होते आणि कथानकामध्ये सामावून गेल्यानंतर त्यामध्ये विनोद, अलौकिक शक्तीसंदर्भातील मनोरंजन व कौटुंबिक ड्रामाचा आनंद मिळेल. रीटाची भूमिका बारकाईने व धमाल रचण्यात आली आहे, ज्यामुळे मला हीच भूमिका साकारण्याची माझी इच्छा असल्यासारखे वाटले.''


## आज का अंदाज

गुरूवार १८ सप्टेंबर २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ९ | २ | ५ | ६ | ७ |
| ११० | ५९९ | ४४८ | ११७ | ५७० | ३३९ | २४० | १७९ |
| २०० | ४९० | ७९० | ५६८ | २५५ | १७७ | ३६७ | ३५१ |
| ३९० | ३०० | ३४९ | ३८८ | ३४५ | २४९ | ४६६ | २७८ |
| २४ | ३४ | ६१ | ९१ | २९ | ५१ | ६४ | ७४ |
| २७ | ३७ | ६८ | ९८ | २८ | ५९ | ६३ | ७३ |
| २० | ३० | ६५ | ९५ | २१ | ५८ | ६० | ७० |

**१८ सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | ४९ | ७३ | ८३ |
| १० | ४० | ७५ | ८५ |
| १२ | ४२ | ७६ | ८६ |
| २३६ | ३४७ | २६९ | १२५ |
| ४७० | २२० | ४५८ | २७९ |
| ३८० | १४९ | ३५९ | ४६८ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

० ८ ९ २ ६

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** कामाच्या जबाबदाजयांमध्ये वाढ होईल. जोडीदारासोबत काही प्रमाणात वाद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तुमच्या भावनांवर आणि रागावर नियंत्रण ठेवा. आपल्या आरोग्याची विशेष काळजी घ्या.

**वृषभ :** आर्थिक बाबतीत काही समस्यांचा सामना करावा लागू शकतो. नवीन आव्हानं समोर येतील. नवीन गुंतवणुकीसाठी चांगला काळ असला तरी कोणताही निर्णय घाईघाईने घेऊ नका.

**मिथुन :** घरगुती जीवन आनंददायी राहील. नोकरीत बढती मिळण्याची शक्यता आहे. तुम्ही नवीन वाहन खरेदी करू शकता. कुटुंबात काही शुभ कार्यक्रम घडतील. तुम्ही मित्रांसोबत संगीताचा आनंद घ्याल.

**कर्क :** भौतिक सुखांमध्ये वाढ होईल. तुमचा आत्मविश्वास वाढेल. अडकलेले पैसे परत मिळण्याची शक्यता आहे. पण अनियोजित खर्चही वाढतील. नोकरी आणि व्यवसायासाठी दिवस चांगला आहे.

**सिंह :** राजकीय पद आणि प्रतिष्ठा वाढण्याची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी वरिष्ठ अधिकाजयांकडून तुम्हाला सहकार्य मिळेल. जर तुम्हाला बँकेकडून कर्ज हवे असेल तर तुम्हाला यश मिळेल.

**कन्या :** सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपल्या ध्येयावर काम करत राहा. खर्चावर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे ठरेल. आईच्या आरोग्याची काळजी घ्या. कामाच्या ठिकाणी बदल होऊ शकतात.

**तुळ :** आज कामातील आव्हानांना आत्मविश्वासाने सामोरे जातील. तुमच्या जबाबदाजया काळजीपूर्वक पार पाडा. मोठ्या बदलांसाठी तयार राहा. व्यापाजयांसाठी आजचा दिवस फायदेशीर ठरेल.

**वृश्चिक :** आर्थिक स्थिती सामान्य राहील. व्यक्तींसाठी आजचा दिवस सामान्य राहील. कामावर लक्ष केंद्रित करा. ऑफिसमधील अनावश्यक वादांपासून दूर राहा. काहींना बढती मिळेल. जंक फूड टाळा

**धनु :** नवीन मालमत्ता खरेदी करण्यासाठी दिवस चांगला आहे. कामाच्या ठिकाणी तुम्हाला नवीन सहयोगी मिळतील. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आणि विज्ञान क्षेत्रात लोकांना यश आणि आदर मिळेल.

**मकर :** अपूर्ण काम पूर्ण केल्याने तुमचे धैर्य आणि मनोबल वाढेल. तुमच्या वडिलांच्या मदतीने व्यवसाय वाढेल. राजकारणातील विरोधक तुमच्याविरुद्ध कट रचू शकतात. तुमच्या कामाचे कौतुक होईल

**कुंभ :** अडकलेली कामं पूर्ण होतील. उच्च पदांवर असलेल्या लोकांशी तुमचे संपर्क प्रस्थापित होतील. तुमच्या सभ्य वागण्याने लोक प्रभावित होतील. आर्थिक प्रगतीचे नवीन मार्ग उघडतील.

**मीन :** स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळण्याची शक्यता आहे. व्यवसाय किंवा नोकरीमध्ये उत्पन्न वाढविण्यात तुम्ही यशस्वी व्हाल. शेअर, लॉटरी, दलाली, सट्टेबाजीच्या क्रियाकलापांपासून दूर राहा. पैसा गमवाल.

# बंजारा समाज आदिवासींमध्ये नको जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १७ :

बंजारा समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश नको, या मागणीसाठी आता विरोध दिवसेंदिवस वाढतच आहे. सकल आदिवासी एकता महासंघाने आक्रमक पवित्रा घेत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. बंजारा समाजाच्या अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणाच्या मागणीला विरोध केला. तसेच जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठवले. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करुन अनुसूचित जमातीचे एस टी चे आरक्षण देण्याची मागणी करीत गोरसेनेने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली होती. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयाला निवेदन सादर करण्यात आले होते. मराठा आरक्षणाबाबत शासन आदेश जारी झाल्यानंतर आता आरक्षणाची मागणी जोर धरत आहे. मात्र या मागणीला विरोध होत आहे. दरम्यान सकल आदिवासी महासंघाने जिल्हाधिकारी कार्यालयावर धाव घेत आपल्या मागण्या लावून धरल्या. यावेळी कार्याध्यक्ष संग्रामसिंह सोळंके, अध्यक्ष जानकिराम डाखोरे, सचिव विजय हळदे, राजू गोंधळेकर, आर. डी. सोळंके, धनंजय गोंधळेकर, महेंद्रसिंग राठोड, सुरेश सोळंके यांच्या यांच्यासह मोठ्या संख्येने आदिवासी बांधव सहभागी होते. संघटना व काही राजकीय नेत्यांकडून हैदराबाद गॅझेटचा आधार घेवून बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्याची मागणी केली जात आहे. ही मागणी असंवैधानिक असून महाराष्ट्रातील मूळ आदिवासी समाजाच्या ४५ जमातीबाबत गंभीर परिणाम करणारी आहे, असे सकल आदिवासी एकता महासंघाचे म्हणणे आहे. बंजारा समाजाची भाषा, संस्कृती, जीवनशैली ही आदिवासींच्या मूळ स्वरूपाशी भिन्न आहे. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यानंतरच्या आयोगांनी बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश केलेला नाही.



बंजारा समाजास अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करू नये. अन्यथा मूळ आदिवासी समाज हक्काचे रक्षणासाठी घटनात्मक तीव्र आंदोलन करतील, असा इशारा निवेदनातून दिला आहे. बंजारा समाजाचा दावा असा निजाम प्रांतातील १९०१ ते १९४८ पर्यंत हैदराबाद गॅझेटमध्ये गोरबंजारा, लंबाडा, लमाण जातीची नोंद जमात अशी असून त्यानुसार तेलंगणा आंध्र प्रदेशातील बंजारा, लंबाडा जातींना अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळालेले आहे. मात्र १९४८ नंतर राज्य पुनर्रचनेदरम्यान मराठवाड्यासह विदर्भ, खांदेशचा भाग महाराष्ट्राला जोडल्यामुळे मूळचे असलेले अनुसूचित जमातीचे आरक्षण संपुष्टात येवून विमुक्त जातीच्या संवर्गात रुपांतरीत करण्यात आले. त्यामुळे महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजावर एसटी आरक्षणाबाबत घोर अन्याय झाला आहे, अशी भावना समाज बांधवांकडून व्यक्त करण्यात आली होती. राज्यात गोरबंजारा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करुन अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याची मागणी गोरसेनेने केली होती.

# दहा तूर केंद्रे सुरु करण्याचा 'पणन'चा प्रस्ताव
## पुढील महिन्यात केंद्र होणार सुरु

■ महासागर प्रतिनिधी
**यवतमाळ, दि. १७ :** यंदा पाऊस सरासरीहून अधिक बरसला आहे. परिणामी, पिकांची अवस्था अतिशय बिकट आहे. खासगी बाजारात पिकांचे दर घसरण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी हमीभाव केंद्रावर अवलंबून राहू शकतो. त्या अनुषंगाने पणन महासंघाने यंदा दहा हमीभाव केंद्र प्रस्तावित केले आहे. लवकरच दहाही केंद्राच्या प्रस्तावाला मंजुरात मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे ऑक्टोबर महिन्यात प्रत्यक्ष केंद्रातून शेतकऱ्यांच्या नोंदणीला सुरवात होईल.
यंदा जुलै ते ऑगस्ट महिन्यात सरासरी पेक्षा अधिक पाऊस कोसळला. परिणामी, कापूस, सोयाबीन पिकाला प्रचंड फटका बसला आहे. उत्पादित मालाची पत सुद्धा घसरण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. याचाच फायदा खासगी बाजारात व्यापारी घेण्याची शक्यता आहे. शेतमाल काढणीनंतर शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ होऊ नये म्हणून पणन महासंघाने आतापासून पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.
यंदा पणन महासंघाने जिल्ह्याभरात दहा हमीभाव केंद्र सुरु करण्याचा प्रस्ताव शासन दरबारी पाठवला आहे. यामध्ये पुसद, आर्णी, महागाव, दारव्हा, दिग्रस, पांढरकवडा, पाटण, मोहदा, बाभूळगाव, नेर तालुक्याचा समावेश होता. या प्रस्तावाला लवकरच मंजुरात मिळण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. प्रत्यक्षात ऑक्टोबर महिन्यात केंद्र सुरु होणार असून

मागील वर्षी १४ हजार क्विंटल तूर खरेदी



त्यानंतर नोंदणीला सुद्धा सुरुवात होण्याची शक्यता आहे. मागिल वर्षी जिल्ह्यात दहा हमीभाव केंद्र सुरु करण्यात आले होते. तर तुरीला सात हजार ५५० रुपये हमीभाव होता. सुरुवातीला खासगी बाजारात आठ हजारांहून अधिक दर तुरीला मिळाले होते. त्यामुळे बहुतांश शेतकऱ्यांनी खासगी बाजारातच तूर विक्री केली. परंतु मध्यंतरी अचानक दर कोसळल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली होती. यंदा तुरीला आठ हजार रुपये हमीभाव देण्यात आला आहे.
मागील वर्षी पणन महासंघाने जिल्ह्यात दहा केंद्र कार्यान्वित केले होते. जिल्ह्यातील दहा केंद्रावर एकूण दोन हजार ६१ शेतकऱ्यांनी तूर विक्रीकरिता नोंदणी केली होती. शेवटच्या टप्प्यापर्यंत शेतकऱ्यांनी एकूण १४ हजार ५०० क्विंटल तूर हमीभाव केंद्रात विक्री केली होती. तर जिल्ह्यातील आठ हमीभाव केंद्रावर १२ हजार ६५४ शेतकऱ्यांनी एक लाख ९० हजार १३७ क्विंटल सोयाबीन विक्री केले होते.

# ऊर्जामंत्र्यांनी आश्वासन देवूनही विजेची समस्या कायम

■ महासागर प्रतिनिधी
मारेगाव, दि. १७ :

मारेगाव तालुका हा आदिवासी बहुल म्हणून विदर्भात ओळखला जात असला, तरी येथील लोकांसाठी मूलभूत सुविधा मिळवणे हे आजही मोठे आव्हान ठरले आहे. शिक्षण, शेती, व्यवसाय आणि दैनंदिन गरजांसाठी आवश्यक असलेल्या वीज पुरवठ्याच्या सततच्या अडचणींमुळे शहरासह ग्रामीण भागातील नागरिक हतबल झाले आहेत. ऊर्जामंत्र्यांनी आश्वासन देवूनही समस्या कायम असल्याने तत्काळ १३२ केव्ही उपकेंद्राची निर्मिती करावी, अशी मागणी होत आहे. पावसाळ्यात किंवा हवामान खराब झाले की, अनेक भागात दोन-दोनदिवस वीज पुरवठा बंद असतो. एकीकडे अंधार तर दुसरीकडे डासांच्या प्रादुर्भावाने



नागरिक त्रस्त झाले आहे. कधी पोल तुटतो, कधी तार खाली पडते तर कधी उपकरणांमध्ये बिघाड होतो. त्यामुळे सामान्य नागरिकांचे मोठा त्रास सहन करावा लागतो. शेतकऱ्यांची पिके, विद्यार्थ्यांचे शिक्षण विस्कळीत होते आणि व्यापारी क्षेत्रावरही त्याचा मोठा परिणाम होतो. सततच्या त्रासामुळे नागरिकांचा संयम सुटत असून प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना राबवण्याची मागणी जोर धरत आहे.
या विषयावर काही वर्षांपूर्वी दसऱ्याच्या दिवशी कॉंग्रेस पक्षाचे मारोती गौरकार, गौरीशंकर खुराना, आकाश बदकी, अंकुश माफूर यांनी पोलिस ठाण्यासमोर सलग तीन दिवस उपोषण करत प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले होते. तालुक्याच्या वीज समस्येकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी केली होती. तरीही या समस्येचे कायमस्वरूपी निराकरण झाले नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष वाढत चालला आहे. मारेगाव तालुक्याच्या वाढत्या गरजा लक्षात घेता १३२ केव्हीचा विद्युत उपकेंद्र तालुक्यात उभारण्याची तीव्र गरज आहे. ही गरज ओळखून तत्कालीन ऊर्जा मंत्र्याने यासाठी सकारात्मक आश्वासन दिले होते. मात्र त्यानंतरही ठोस अंमलबजावणी झाली नाही.

# आरक्षण वाचवण्यासाठी उपोषण सुरु

■ महासागर प्रतिनिधी
**अकोला, दि. १७ :** मराठवाड्यातील मराठा समाजासाठी हैद्राबाद गॅझेट लागू करून ओबीसी आरक्षण देण्याच्या निर्णयानंतर ओबीसी समाज आक्रमक झाला आहे. ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी सोमवारी ओबीसी समाजाकडून आमरण उपोषण करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पाच प्रतिनिधी उपोषणाला बसले. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावे, यासह अन्य मागण्यांसाठी मुंबई येथील आझाद मैदानावर मराठा समाजबांधवांनी आंदोलन सुरू केले होते. मनोज जरांगे यांनी उपोषण सुरू केले होते. हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा शासन निर्णय जारी झाल्यानंतर आंदोलन मागे घेण्याची घोषणा करण्यात आली. नंतर आता ओबीसी नेत्यांमधून प्रतिक्रिया उमटत आहेत. राज्यात सक्षम असलेल्या आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार मराठा समाज मागास नाही, असे ओबीसी समाजाचे म्हणणे आहे. त्यामुळे त्या समाजाला आरक्षण देणे योग्य नाही. आणि राज्यात मराठा



समाजाचे नेते मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर राज्य सरकारने हैद्राबाद गॅझेट लागू करून मराठा समाजाला आरक्षण दिले आहे आणि हा प्रकार ओबीसी समाजावर अन्याय करणारा आहे, असे म्हणत याला रोकथाम करण्यासाठी लोकशाही मार्गाने उत्तर देण्यासाठी ओबीसी समाजाच्या वतीने १५ सप्टेंबर रोजी उपोषण सुरु झाले. याबाबत सकल ओबीसी समाज समन्वयक अनिल शिंदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. ओबीसी समाजाकडून उपोषणाला जनार्दन हिरळकर, शंकर बापूराव पारेकर, पुष्पा गुलवाडे, राजेश माणिकराव ढोमणे, अॅड. भाऊसाहेब बिठ्ठलराव मेडशीकर, अतुल नवसे हे प्रातिनिधिकस्वरुपात आमरण उपोषणास बसले.

# खरीप शिवार फेरीतून मिळणार तंत्रज्ञाननिहाय माहिती
## डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाद्वारे फेरी



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १७ :

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषी विभाग इतर संलग्नित संस्थांकडून तीन दिवसीय खरीप शिवार फेरीचे आयोजन २० ते २२ सप्टेंबर दरम्यान प्रक्षेत्रावर करण्यात आले आहे. यंदाच्या शिवार फेरीत प्रगत कृषी तंत्रज्ञान विषयक माहिती तर मिळणार आहेच, शिवाय विद्यापीठाचे संपूर्ण संशोधन प्रक्षेत्र तीनही दिवस प्रत्यक्ष अवलोकनासाठी शेतकऱ्यांसाठी खुले राहणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेसह यांत्रिकीकरणाच्या या कालखंडात आता शेतकऱ्यांना व्यावसायिक शेतीचे तंत्रज्ञान शिकावेच लागणार असून त्याचा प्रत्यक्ष वापर केल्यानेच आर्थिक संपन्नता येत शाश्वत शेती व संपन्न शेतकरी ही संकल्पना कृतीत येणार आहे. पीकनिहाय-तंत्रज्ञान हिय संशोधक शास्त्रज्ञांकडून माहिती तर मिळणार आहेत सोबतच आपल्या मनातील शंकांचे समाधान देखील या ठिकाणी करण्यात येणार आहे. सकाळी नऊ वाजेपासून शिवार फेरीला सुरुवात होणार आहे. जागतिक हवामान बदलाच्या तथा व्यावसायिक स्पर्धेच्या या कालखंडात आमचा शेतकरी बांधव अत्याधुनिक शेती तंत्रज्ञान आणि पीक पद्धतीसह कृषीमाल प्रक्रिया आणि मार्केटिंगच्या क्षेत्रात अग्रेसर राहावा या हेतूने फेरीचे आयोजन करण्यात येणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेसह यांत्रिकीकरणाच्या या कालखंडात आता शेतकरी बंधू-भगिनींना व्यावसायिक शेतीचे तंत्रज्ञान शिकावेच लागणार असून त्याचा प्रत्यक्ष वापर केल्यानेच आर्थिक संपन्नता येत शाश्वत शेती व संपन्न शेतकरी ही संकल्पना कृतीत येणार आहे. यंदाच्या शिवार फेरीत अनेक पिकांचे अवलोकन करता येणार आहे. यात सूर्यफूल, भुईमूग, नागली पिके जसे कापूस, सोयाबीन, डाळवर्गीय पिके जसे तूर, मूग, उडीद, तृणधान्य पिके जसे ज्वारी, बाजरी, मका, भरड धान्ये जसे कुटकी, राळ, फळपिके जसे आंबा, संत्रा, मोसंबी, लिंबू, सीताफळ, ड्रॅगन फ्रुट, चिकू, जांभूळ, अंजीर, पेरू, भाजीपाला पिके जसे वांगी, कांदा, लसूण, हळद, मिरची, शोभिवंत फुलपिके जसे गुलाब, शेवंती, निशिगंधा, सेंद्रिय शेतीचे विविध पैलू, कृषी प्रक्रिया उद्योगातील विविध संधी, शेतीपयोगी यंत्र-अवजारे, जातिवंत गोवंशाचा संवर्धन प्रकल्प, अत्याधुनिक मोकळ्या पद्धतीचा गोठा, चारा पिके, व्यावसायिक शेळीपालन, कोंबडी पालन, गांडूळ खत निर्मिती प्रकल्प, एकात्मिक शेती तंत्रज्ञान प्रकल्प, रेशीम शेती, सुगंधी व औषधी वनस्पती उद्यान, व्यावसायिक उद्यानिकी नर्सरी, कोरडवाहू शेती तंत्रज्ञान, एकात्मिक शेती तंत्रज्ञान प्रकल्प आदीचे प्रत्यक्ष अवलोकन करता येणार आहे.

# पितृपक्षात भाज्यांचे दर भडकले
## बाजारात आवक कमी, मागणी अधिक

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १७ :**
अनंत चतुर्दशीनंतर पितृपक्ष सुरू झाल्याने भाज्यांची मागणी वाढली आहे. मात्र घाऊक बाजारात भाज्यांची आवक घटली आहे. त्यामुळे भाज्यांचे दर मागच्या महिन्याच्या तुलनेत दुप्पट झाले आहेत. प्रत्येक भाज्या १०० रुपये किलोच्या पुढे गेल्या आहेत. पितृपक्षात पितरांना जेवण घालण्याची पद्धत आहे. त्यामुळे बहुतांशी लोकांच्या घरात सध्या पितरांना जेवण घालणे सुरु झाले आहे. यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्या तयार केल्या जातात. त्यात प्रामुख्याने गवार आणि लाल भोपळ्याची, चवळीची, हिरव्या पालेभाज्या लागतात. यामुळे बाजारात भाज्यांच्या मागणीत वाढ झाली आहे. मात्र अकोल्यातील घाऊक व जनता बाजारात गणेशोत्सवानंतर भाजीपाल्याची आवक घटली आहे. त्यातच मागणीत वाढ असल्याने भाज्यांचे दर वाढलेले आहेत. मात्र पितरांच्या जेवणासाठी या महाग भाज्या खरेदी कराव्या लागत आहेत.
यावेळी गणेशोत्सवात भाजीपाल्याची मोठ्या प्रमाणात आवक झाली होती. त्यामुळे भाजीपाल्याचे दरही नियंत्रणात होते. मात्र गणेशोत्सव संपल्यानंतर पितृपक्ष सुरू झाल्याबद्दल भाजीपाल्याची आवक घटली आहे. गणेशोत्सवापर्यंत उर्वरित पान ४ भेंडी ८० रुपये, लाल भोपळा ३०-४०रुपये, चवळी शेंग ५०-६०रुपये,



फरसबी ५०-६०रुपये, फ्लॉवर ६०-८०रुपये, गवार ७०-८०रुपये, घेवडा ५०-६०रुपये, कारली ४०-६० रुपये, शेवगा शेंगा ६०-८०रुपये, वालवड ८० रुपये किलो दरात मिळत आहे. किरकोळ बाजारात भाज्या १०० ते १२० रुपये किलो झाल्या आहेत. हिरवी मटार घाऊक बाजारात १५० रुपये किलो आहे. त्यामुळे किरकोळ बाजारात तो २०० रुपये किलो दराने विकला जात आहे.

# ३७०० बहिणींचे अनुदान बंद
## अंगणवाडी सेविकांकडून ५२ हजार महिलांची तपासणी

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. १७ :

कुटुंबात दोन पेक्षा महिला व वयाच्या निकषात न बसणाऱ्या महिलांची पडताळणी अंगणवाडी सेविकांच्या मार्फत करण्यात आली होती. जिल्ह्यातील अशा तब्बल ५२ हजार ११० महिलांची तपासणी केली. यात निकषात न बसणाऱ्या तिन हजार ७०० लाडक्या बहिणींची ओवाळणी शासनाने बंद केली आहे. सरकारने विविध कारणांमुळे निकषात न बसणाऱ्या महिलांची कागदपत्रांची छाननीची मोहीम हाती घेतली होती. जिल्ह्यातील तब्बल ५२ हजार ११० महिलांची यादी जिल्हा प्रशासनाकडे सोपवली होती. यादांची पडताळणी करण्याचे काम अंगणवाडी सेविकांवर सोपवण्यात आले होते. ऑगस्ट महिन्यात अंगणवाडी सेविकांनी घरोघरी जाऊन अर्जांची पडताळणी केल्यानंतर एकाच कुटुंबात दोनपेक्षा अधिक लाभ घेणारे कुटूंब आढळून



आले. शिवाय, २१ पेक्षा कमी वय असणाऱ्या व ६५ पेक्षा अधिक वय असणाऱ्या महिला या योजनेचा लाभ घेत असल्याचे तपासणीत आढळून आले. कुटुंबात दोनपेक्षा अधिक लाभार्थी असणाऱ्या व वयाच्या निकषात न बसणाऱ्या तिन हजार ७०० महिलांची यादी महिला बालविकास विभागाकडे सोपवली. यादीची छानणी करून अपात्र महिलांची यादी शासनाकडे पाठवण्यात आलेली आहे.
त्यामुळे या महिलांना महिन्याकाठी मिळणारे दीड हजार रुपये आता बंद होणार. अंगणवाडी सेविकांनी केली पडताळणी जिल्ह्यातील दोन हजारावर अंगणवाडी सेविकांनी ५२ हजार ११० अर्जांची पडताळणी करण्यासाठी यादीत नाव असलेल्या महिलांच्या घरोघरी जाऊन पडताळणी केली आहे. अपात्र व पात्र यादी प्रशासनाकडे सादर केली. तपासणीवेळी काही महिला सापडल्या नाहीत. ॲप व पोर्टल अद्याप बंदच अवस्थेत; अर्जही उघडेना २१ वर्ष पूर्ण झालेल्या महिलांना नारीशक्ती दूत ॲप व मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना या पोर्टलवर अर्ज करण्याची सोय शासनाने केली होती. मात्र, हे ॲप व पोर्टल मागील आठ महिन्यापासून बंदच आहे. त्यामुळे २१ वर्ष पूर्ण झालेल्या महिलांना अर्जही करता येईना झाले आहेत.

# विद्यापीठात 'फिजिक्स क्लब २०२५२६' कार्यक्रमाचे आज आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. १७ :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाच्यावतीने दि. १८ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता 'फिजिक्स क्लब २०२५-२६' कार्यक्रमाचे आयोजन भौतिकशास्त्र विभागाच्या सभागृहात करण्यात आले आहे. उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे प्र-कुलगुरुडॉ. महेंद्र ढोरे भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून वरीष्ठ प्राध्यापक तथा भौतिकशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. श्रीनिवास ओमनवार यांचे शुभहस्ते उद्घाटन संपन्न होईल. कार्यक्रमाला रिसोर्स पर्सन म्हणून वरीष्ठ प्राध्यापक तथा इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे. दुपारी १ वाजता प्रश्नमंजुषा होणार असून त्यानंतर लगेचच मान्यवरांचे हस्ते बक्षीस वितरण




सोहळा संपन्न होईल. तरी भौतिकशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित 'फिजिक्स क्लब २०२५-२६'कार्यक्रमाला सर्वांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे व फिजिक्स क्लब २०२५-२६ चे अध्यक्ष आदित्य प्रधान यांनी केले आहे.

### नीळकंठ सूतगिरणीत २२ वर्षांनी पुन्हा रोजगार निर्मिती

**अकोला :** दी नीळकंठ सहकारी सूतगिरणीला खास बाब म्हणून अर्थसाह्य करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आल्याने रोजगार निर्मितीचा मार्ग मोकळा झाला आहे. अर्थसाहाय्याच्या ५:४५:५० या गुणोत्तरानुसार निवड झाली आहे. १९७३मध्ये प्रत्यक्षात उत्पादन सुरु झालेली सूतगिरणी २००३मध्ये बंद झाली होती. त्याकाळी सुमारे एक हजार कामगार- कर्मचाऱ्यांच्या हाताला काम मिळाले होते, असे कामगार नेत्यांचे म्हणणे आहे. कापूस उत्पादक पट्ट्यातील पश्चिम विदर्भामध्ये रोजगाराच्या अल्प संधी लक्षात घेता रोजगाराची संधी मिळण्यासाठी आणि शेतमाल उत्पादनाचे मूल्यवर्धन करून कष्टकरी शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती साधने या हेतूने माजी राज्यमंत्री स्व. नीळकंठ श्रीधर उपाख्य नानासाहेब सपकाळ यांनी सहकारी सूतगिरणीची मुहूर्तमेढ रोवली. १९७० मध्ये कोनशिला ठेवण्यात आली.


**PAPER PUBLICATION**

**IN THE COURT OF 2nd JT CIVIL JUDGE JR. DN. RAMTEK**
**M.J.C. No. 28/2025**
Process No. 2116
fixed for 10/10/2025

APPLICANTS : 1) Smt. Nilima Wd/o Yuwaraj Dekate, Age 62 years, Occ. : Household. 2) Mr. Nikhil Yuwaraj Dekate, Age 32 years, Occ. : Private 3) Ku. Nikita D/o Yuwaraj Dekate, Age 27 years, Occ. : Private All R/o Plot No. 1, Damayanti Deshmukh Nagar, Chorlya Layout, Ramtek, Teh. Ramtek, Dist Nagpur.
VERSUS
NON-APPLICANTS : NIL
Name of Deceased Late Yuwaraj S/o Shamrao Dekate, who expired on 21/04/2025 at Mides Hospital, Parsodi, Nagpur.
Plot No. 1, Damayanti Deshmukh Nagar Chorlya Layout, Ramtek, Teh. Ramtek, Dist Nagpur.
Whereas the above-named applicants have applied to this Hon'ble Court under Rule 2, Chapter I of Bombay Regulation VIII of 1827 for grant of Legal Heirship Certificate in respect of the heirs of the deceased Late Yuwaraj S/o Shamrao Dekate, recognizing them as lawful legal heirs.
This is to give public notice to all persons who may dispute the right of the said applicants to appear before the Hon'ble 2nd Jt. Civil Judge, Junior Division, Ramtek, on the 10 day of October 2025, at 11 a.m. to submit their objections if any.
It is hereby declared that if no sufficient objection is raised on or before the above-mentioned date, the Court shall proceed forthwith to receive proof of the applicants' claim and, if satisfied, shall grant them a Legal Heirship Certificate, provided they are entitled thereto under law.
Given under my hand and the seal of the Court, this 12/9/2025.

Supd.
Court of Civil Judge Sr. Dn. Ramtek



महसूल व वनविभाग
कोर्ट बिग्मान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड- ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com
[illegible]
- जाहीरनामा -
[illegible]
तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करिता



महसूल व वनविभाग
कोर्ट बिग्मान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com
[illegible]
- जाहीरनामा -
[illegible]
तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करिता



महसूल व वनविभाग
कोर्ट बिग्मान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com
[illegible]
- जाहीरनामा -
[illegible]
तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करिता



**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MOHAMMAD IKRAM MOHAMMAD SHAQUE**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD IKRAM MOHAMMAD ISHAQUE.**
**ADD** : NEAR BHOLASHAH DARGAH BANGALI PANJA NAGPUR 440002

MY OLD NAME WAS **AMOL KALE**. NOW MY NEW NAME IS **AMOL DNYANESHWAR KALE.**
**ADD** : 40, SADBHAVNA NAGAR, GORLE LAYOUT, ZINGABAI TAKLI, NAGPUR 440030

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **S8342442**. MY OLD NAME WAS **UJAMA KAUSAR**. NOW MY NEW NAME IS **UZMA KAUSAR.**
**ADD** : PLOT NO 38 GOREWADA RING ROAD SANGAM NAGAR 440013

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **J8889559**. MY OLD NAME WAS **SHABBIR AHMED MOHAMMED AZIZ**. NOW MY NEW NAME IS **SHABBIR AHMED MOHAMMAD AZIZ.**
**ADD** : MAHADEV MANDIR CHAUK SUBHASH WARD PUSAD YAVATMAL - 445204

MY OLD NAME WAS **FARZANA BEGUM**. NOW MY NEW NAME IS **FARJANA MORFIK SHEIKH.**
**ADD** : MHATMA GANDHI WAARD BHANDARA 441904

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **K6778125**. MY OLD NAME WAS **ILHAMUR RAHAMAN**. NOW MY NEW NAME IS **ILHAMUR RAHMAN KHAN.**
**ADD** : PLOT NO 872, BHANDARA ROAD QUETA COLONY NAGPUR 440008

MY OLD NAME WAS **CHI. SHAIKH / CHI. SHAIKH PASHA SHAIKH**. NOW MY NEW NAME IS **SHERU PASHA SHAIKH.**
**ADD** : Z.P SHIVAJI CHOWK, AT BADARPUR, DISTT.BEED M S 431517


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४७७७३५८५३

# भक्तिमार्ग

**मानवी आयुष्य सोहळ्यांच्या हिंदोळ्यांवर झुलत असतं. कृतज्ञता व्यक्त करण्याच्या सोहळ्याला भारतीय संस्कृतीने अग्रस्थान दिलं आहे. जीवजंतूंसोबतच मृतात्म्यांबाबतही कृतज्ञता व्यक्त करण्याची रीत संस्कृतीने घालून दिली आहे. स्मरण करणं, उपकारांमधून उतराई होण्याचा प्रयत्न करणं या हेतूने पितृपक्ष पंधरवडा पाळला जातो. लवकरच सुरू होत असलेल्या या प्रथेमध्ये कालानुरूप होत चाललेल्या बदलांचा हा मागोवा.**

## पितृऋणांतून उतराईचा काळ

निमित्त

उदय आणि अस्त हा सृष्टीचा नियम आहे. याच नियमानुसार ज्याचा जन्म झाला आहे त्याचा मृत्यू अटळ असतो. पुराणकथांमध्ये किंवा तत्वज्ञानामध्ये मृत्यूचा उल्लेख अंतिम सत्य असा केला जातो. ८४ लक्ष योनींमधून फिरून थकून-भागून आल्यानंतर व्यक्तीला मानवी जन्म मिळतो असं म्हणलं जातं. त्यामुळे ८४ लक्ष जन्मांनंतर मिळणाऱ्या जन्मावर माणसाचं अतीव प्रेम असतं. आयुष्याच्या या अतीव ओढीमुळेच त्याला मृत्यूची द्वेषयुक्त भीती असते. मृत्यूबाबत इतकं भय मानवाच्या मनात असण्याचं कारण म्हणजे मृत्यूनंतरच्या आयुष्याबाबतची संदिग्धता. मृत्यूनंतर आयुष्य कसं असेल, याबाबत आजपर्यंत फक्त कल्पनाच लढवल्या गेल्या आहेत. त्याला कोणताही पुरावा नाही. याच कारणामुळे व्यक्तीला मृत्यूपश्चात असणाऱ्या आयुष्याचं गूढ कुतुहल आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान या सर्व कथांना नाकारत असलं तरी मानवी कल्पनाशक्तीच्या जोरावर मानवाने मृत्यूपश्चात असलेल्या विश्वाची कल्पना केली आहे.

महत्प्रयासाने मिळालेलं आयुष्य निती-नियमांच्या रेषेवरून सुस्थितीत चालावं यासाठी पुर्वजांनी मानवी वर्तणुकीचे नियम लिखित स्वरूपात घालून दिले. यालाच उपनिषदं, वेद, पुराण अशा नावांनी संबोधलं गेलं. या रूपरेषेवरून चालणं हे काही काळासाठी शक्य असलं तरी स्वत:ला सदा सर्वकाळ या नियमांमध्ये बांधणं शक्य नसतं. अशा वेळी या नियमांचा गरजेपुरता संदर्भ घेतला जातो आणि कार्य पार पाडलं जातं.

स्वातंत्र्य आणि प्रलोभनं यांच्यामध्ये मानवी मन गुरफटत जातं आणि म्हणूनच अंतिम सत्याकडे डोळेझाक होऊ लागते. विषयवस्तूंच्या गराड्यात असलेला मानव बुद्धीसामर्थ्याच्या जोरावर उत्तम आरोग्य सुविधा निर्माण करतोच पण मृत्यूला जिंकण्याचेही मनसुबे रचतो. आयुष्यभरात जोडलेले आसपासचे नातेसंबंध त्याला अंतिम क्षणी मोहात पाडतात. आयुष्याच्या कातरवेळी तो गतकाळातील स्मृतींमध्ये रममाण होताना दिसतो. मृत्यूनंतर आपण सगे-सोयऱ्यांपासून लांब जाणार आहोतच, याशिवाय हा प्रवास आपल्याला एकट्याने करावा लागणार या जाणिवेने तो जास्त अस्वस्थ होत राहतो. डोळ्यासमोर घडलेला एखादा मृत्यूची दृश्यं त्याची पाठ सोडत नाहीत.

मानवी जीवनातल्या प्रत्येक महत्वाच्या घटनेचे सोहळे साजरे केले जातात. या सोहळ्यात मृत व्यक्तीच्या संदर्भात असलेल्या सोहळ्यांचाही समावेश असतो. दु:खाची किनार असणारा हा सोहळा प्रियजनांच्या मरणोत्तर शांतीसाठी जड अंत:करणाने का होईना, पार पाडला जातो. भारतीय संस्कृतीमध्ये जिवंत व्यक्तीबरोबरच मृतात्म्यांच्या भावनांचाही विचार केला जातो. पितरांनी त्यांच्या मृत्यूनंतरही आपल्यावर कृपा करत रहावी, गूढ संदेशांद्वारे अप्रत्यक्षरित्या का होईना, आपल्याला मार्गदर्शन करत रहावं, त्यांना सुग्रास भोजनाचा नैवेद्य दाखवून तृप्त करुन आशीर्वाद मिळवावेत आणि पुढची वाटचाल करावी या साध्या आणि सहज विचारसरणीतून पितृपक्षात घरातील मृत व्यक्तींसंबंधीची पितरकर्मं करण्याची प्रथा निर्माण केली गेली असावी.

भारतीय संस्कृतीत मृत्यूनंतरच्या प्रवासाची संकल्पना गृहित धरली आहे. या संकल्पनेमुळेच मृत व्यक्तीचं श्राद्ध करणं, त्यांना तर्पण करणं या प्रथा आढळतात. भाद्रपदातला कृष्णपक्ष हा श्राद्धपक्ष किंवा पितृपक्ष मानला जातो. या पंधरवड्यात आपल्या पूर्वजांचं, पितरांचं स्मरण करून ते ज्या योनीत असतील तिथं सुख-शांती मिळावी म्हणून प्रार्थना केली जाते. धार्मिक कृत्यांच्या प्रथेनुसार श्राद्धाच्या दिवशी पितृदान तर्पण केलं जातं. या कार्यानिमित्त घरातील सगळे एकत्र येतात, एकत्र बसून दोन घास खातात. यशाशक्ती दानकर्म पार पडतं. हयात



नसलेल्यांच्या आठवणी निघतात. एक प्रकारे हा पांगलेल्या कुटुंबाला एकत्र आणण्याचा उपचारही ठरतो. आता हयात नसलेल्या शरीरांनी पूर्वी या आप्तेष्टांमधील दुवा म्हणून काम केलेलं असतं. त्यांनी कुटुंबाची ही मोळी बांधून ठेवलेली असते, मोळी एकत्र टिकवून ठेवलेली असते पण गाठ सैल होताच मळीतली काष्ठं विखुरण्यास वेळ लागत नाही. कदाचित हीच अप्रिय बाब टाळण्यासाठी आणि घरातील सर्वांना आपल्या मूळ वृक्षाच्या सयीच्या सावलीत पुन्हा एकत्र आणण्यासाठी या कर्माचं प्रयोजन असावं. कारण अगदी आत्ता-आत्तापर्यंत लोक एक वेळ सणाला एकत्र येत नसत पण घरातील पितृकर्माला आवर्जून उपस्थित रहात असत. देवाच्या आशीर्वादाबरोबरच पितरांचा आशीर्वाद महत्त्वाचा अशी आजही अनेकांची प्रबळ धारणा आहे. ही धारणा काही देवो अथवा न देवो, घराला एकत्र बांधून ठेवते याबाबत मात्र शंका घेऊ नये.

या पंधरवड्याच्या कालावधीत अनेक धार्मिक बाबी पार पाडल्या जातात. त्यात बरेचदा अवास्तव कर्मकांडांची मिसळ केली गेल्याने मूळ हेतू बाजूला पडण्याची शक्यता असते. सध्याच्या वेगवान युगात प्रत्येकाचा या सर्व कृतींवर विश्वास असेलच किंवा त्यासाठी पुरेसा वेळ देणं शक्य होईलच असं नाही. ज्यांनी आपल्याला लहानाचं मोठं करण्यासाठी खस्ता खाल्या, मोहांना टाळून कसं पुढं जावं याचा आदर्श घालून दिला त्या आपल्या पूर्वजांबद्दल, पितरांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणं, त्यांना समाधान होईल असं आचरण करणं हा पितृपक्षाचा मूळ हेतू असतो. पितरांच्या उपकारांची उतराई होण्याचा सोहळा म्हणजे पितृपक्ष पंधरवडा होय. पितरांचं एखादं अपुरं ध्येय पुत्राने अगर कन्येने पूर्ण करण्याची जबाबदारी आनंदाने स्वीकारल्याने पिता अगर माता निश्चितपणे संतुष्ट होतील. हे करत असताना पुत्राला अगर कन्येलाही समाधान मिळेल. पितरांची आठवण करण्याचे हे दिवस पवित्र मानले पाहिजेत. आपल्यालाही पितरांप्रमाणे एक दिवस जायचं आहे, याचं भान याच दिवसात मनावर ठसलं जातं. या भूतलावर आपल्याला मिळणारा वेळ विधायक कामांसाठी वापरावा याचं भान येतं. या श्राद्धपक्षात सत्कृत्याचे पाथेय बांधण्याची मनाची जिद्द वाढते. एकदा सत्कृत्याचे पाथेय बांधण्याचा निश्चय केला की जीवन अधिकाधिक क्रियाशील बनतं. कदाचित हा धडा देण्यासाठी या पंधरवड्याचं प्रयोजन केलं असावं.

बरेचदा पितृ पंधरवड्याचा हा काळ अनिष्ट समजला जातो. या काळात नवी खरेदी, मंगल कार्याचा शुभारंभ केला जात नाही . समाजातला एक वर्ग अजूनही या काळाला नाकं मुरडतो. पण हळू-हळू समाजाच्या समजुतीत बदल घडू लागला आहे. समाज जुन्यासोबत नव्या विचारांची गुंफण करून नवी विचारधारा प्रवाहीत करत आहे. त्यामुळे या काळातही काही नवीन कामांचा श्रीगणेशा होतो. अगदी मोठी खरेदी होत नसली तरी बाजारातील कमी वर्दळ, मागणीअभावी कमी पातळीवरील भाव यांचा लाभ घेण्यासाठी पुढच्या उत्सवकाळातील खरेदी करण्यासाठी या पंधरवड्याचा काळ उचित समजला जातो. या कार्यक्रमांचा अधिक गाजावाजा न करता आवश्यक ते उपचार करुन दिनक्रम सुरू ठेवणं ही आजची गरजच आहे. त्यामुळे बऱ्याच घरांमधून कर्मकांडाचा अतिरेक न करता विशिष्ट तिथीला दानधर्म करणं, वृद्धाश्रमात अथवा अनाथालयात अन्नदान वा इतर वस्तूंचं दान करणं, गरजू विद्यार्थ्यांना मदत करणं ही स्त्युत्य कर्मं पार पाडली जातात. समजुतीने घेतलेलं हे चांगलं वळण आहे असं म्हणावं लागेल.

जैवसाखळीतील एक उपयुक्त जीव म्हणून या काळात कावळ्याचं महत्त्व न नाकारता अशा वेगळ्या पद्धतीने केलेलं दानही पितरांना संतुष्ट करत असेल याची खात्री वाटते. शेवटी माणूस महत्त्वाचा असतो. आपल्यातून गेलेल्या व्यक्तीचं मरणोत्तर जग आभासी आहे, आपल्या कल्पनेच्या पलीकडलं आहे. त्याला ओढून ताणून आपल्या जगात आणण्यापेक्षा या जगात, आपल्याबरोबर राहणाऱ्या पण जाणिवा मृतवत झालेल्या लोकांच्या आयुष्यात आशेचा एक किरण आणणं हे पितरकर्म नसेल कदाचित, पण मनुष्यकर्म नक्कीच आहे. या आयुष्यात मनुष्य म्हणून जगताना मनुष्यकर्म करणंही पुरेसं आहे. हे करत राहिलं तर आयुष्याच्या अखेरीस संध्याछाया दाटून आली तरी जीव कासावीस होणार नाही, काय केलं या सोन्यासारख्या आयुष्यात, असा व्यथित करणारा प्रश्न भेडसावणार नाही. संधी असूनही लोकांशी चांगलं वागू शकलो नाही ही खंत त्रास देणार नाही. उलटपक्षी, यमदूताच्या स्वागताला तनाबरोबर मनानंही आपण सिद्ध असू. मिळालेल्या आयुष्याबद्दल कृतार्थता आणि आत्तापर्यंत केवळ कथांमधून ऐकलेल्या स्वर्गनगरीच्या प्रवासाला सिद्ध असू. हे शक्य झालं तर आपल्या आत्म्याला संतुष्ट करण्यासाठी पुढच्या पिढीतील कोणालाच कर्मकांडाची मदत घ्यावी लागणार नाही.

## वंदन गुरूला...

गुरूवीण कोण दाखवेल वाट‍‍ असं म्हटलं जातं. सद्गुरू हा आपला मार्गदर्शक असतो. त्याच्या छायेत आपलं आयुष्य घडत असतं. गुरू आपल्या शिष्याला चांगल्या वाईटाची ओळख करून देतो. गुरू म्हणजे मायेची सावली, गुरू म्हणजे कृपेचा सागर. गुरूची साथ असेल तर शिष्य भवसागरही तरून जाऊ शकतो. तर अशा या सद्गुरूला वंदन करण्याचा दिवस म्हणजे गुरूपौर्णिमा. गुरूचं महत्त्व शब्दात वर्णन करण्याच्या पलीकडचं असलं तरी समर्थ रामदासांनी दासबोधातून गुरूमहिमा वर्णन केला आहे. दासबोधातल्या पहिल्या दशकातला चौथा समास गुरूस्तवनाचा आहे. या समासात समर्थ रामदास म्हणतात, आता सद्गुरू वर्णवेना।। जेथें माया स्पर्शो सकेना। तें स्वरूप मज अज्ञाना काये कळें।।१।। नकळे नकळे नेति नेति।। ऐसें बोलतसे श्रुती। तेथे मज मूर्खाची मती। पवाडेल कोठें।।२।।



प्रत्यक्ष रामदास स्वामी म्हणत आहेत की सद्गुरूंचं स्वरूप माझ्यासारख्या अज्ञानी जीवाला कसं कळणार? जेथे मायेचा स्पर्श होत नाही अशा सद्गुरूंचं वर्णन शब्दात करता येणार नाही. श्रुती ही तर साक्षात आत्मविद्येची जननी पण तिलाही सद्गुरूंचं स्वरूप कळलेलं नाही. तीही नेति नेति म्हणजे मला त्यांचं स्वरूप कळत नाही असं म्हणते आहे. श्रुतीलाही जे जमलेलं नाही ते करण्यासाठी माझ्यासारख्या मुर्खाची मती म्हणजे बुद्धी कशी काय समर्थ असेल, असा सवाल ते करत आहेत.

दासबोध

समर्थ पुढे म्हणतात की, मज नकळे हा विचारू। दुऱ्हुनी माझा नमस्कारू। गुरूदेवा पैलपारू पाववी मज।।३।। सद्गुरूंचं वर्णन कसं करावं हेच मला कळत नाही. त्यामुळे माझा नमस्कार दुरुनच स्वीकारून गुरुदेवा मला पैलतीरी न्या, अशी विनवणी रामदास करत आहेत. सद्गुरू स्तवनात ते पुढे म्हणतात, उपमे द्यावा सागर। तरी तो अत्यंतचि क्षार। अथवा म्हणों क्षीरसागर। तरी तो नासेल कल्पांतीं।।१७।। उपमे द्यावा जरी मेरू। तरी तो जड पाषाण कठोरू। तैसा नव्हे की सद्गुरू कोमळ दिनाचा।।१८।। सद्गुरूंना अनेक उपमा दिल्या जातात पण या कशा अयोग्य आहेत हे रामदास स्वामी पटवून देतात. ते म्हणतात, सद्गुरूंना सागराची उपमा देणं योग्य ठरणार नाही. याचं कारण सागराचं पाणी खारट असतं. त्यांना क्षीरसागराची उपमा द्यावी तर कल्पाचा अंत होताच तोही नष्ट होत असल्याने तेही योग्य ठरणार नाही. सद्गुरूंना मेरु पर्वताची उपमा द्यावी तर तो जड पाषाणाचा आणि कठोर असतो. तर सद्गुरू हे अत्यंत प्रेमळ आणि मनाने खूपच कोमल असतात. त्यामुळे ही उपमाही त्यांना योग्य ठरणार नाही. त्यामुळे सद्गुरूंचं वर्णन करता येत नाही, असं रामदास स्वामी म्हणतात. प्रत्यक्ष रामदास स्वामींनाही सद्गुरूंची महती, त्यांचं शिष्याच्या आयुष्यातलं स्थान यांचं महत्त्व पटलं होतं, हेच या सद्गुरूस्तवनातून दिसून येतं.

## स्मरण पितरांचं...

गणेशोत्सवानंतर पितृपक्षाची सुरूवात होते. पितृपक्षात आपल्या पूर्वजांचं, पितरांचं स्मरण करायचं असतं. पितृपक्ष हा पंधरा दिवसांचा असतो. म्हणून त्याला पितृपंधरवडा असंही म्हणतात. हिंदू धर्मात पितृपक्षाचं मोठं महत्त्व आहे. श्रद्धा यत कृतं श्राद्धम। असं एक वचन संस्कृतमध्ये आहे. याचा अर्थ असा की, आपल्या पितरांच्या आणि पूर्वजांच्या तृप्ती आणि समाधानासाठी श्रद्धेने केलेलं कर्म हेच श्राद्ध आहे. माणसाच्या मृत्यूनंतर त्याच्या आत्म्याला शांतता लाभावी यासाठी अनेक धार्मिक कार्यं केली जातात. श्राद्ध हे अशा धार्मिक कार्यांपैकीच एक. मृत्यूनंतर माणसाचा आत्मा बराच काळपर्यंत प्रेतलोकात भटकत असतो. त्याच्या पुत्रपौत्रांनी श्राद्धकर्म केल्यानंतर या आत्म्याला मुक्ती मिळते. हा आत्मा प्रेतलोकातून पितृलोकात प्रवेश करतो, असं पुराण तसंच इतर काही धर्मग्रंथांमध्ये नमूद करण्यात आलं आहे. पुनर्जन्म मिळेपर्यंत हा आत्मा पितृलोकातच राहतो. म्हणूनच पूर्वजांचं श्राद्धकर्म करावं, असं शास्त्रांमध्ये नमूद करण्यात आलं आहे.



मृत्यूतिथीनुसार पितृपक्षात श्राद्धकर्म करावं, असं शास्त्रांमध्ये नमूद करण्यात आलं आहे. पितरांचे आशीर्वाद अत्यंत लाभदायी मानले जातात. आपल्या मुलांना, नातवंडांना ते भरभरून आशीर्वाद देतात. नैवेद्याने तृप्त झालेले पितर सुख, समृद्धीचा आशीर्वाद मुलांना देतात. यानंतर पितर पुन्हा पितृलोकाकडे प्रस्थान करतात, असा उल्लेख धार्मिक ग्रंथांमध्ये आढळतो. अग्निपुराण, शुक्ल यजुर्वेदात याबाबत सविस्तर उल्लेख आढळतो. दुपारी बारा वाजल्यानंतर सूर्यास्तापर्यंत श्राद्धकर्म करता येतात. पिंडीला नैवेद्य दाखवल्यानंतर एक, तीन किंवा पाच ब्राम्हणांना भोजन देण्याबाबत सांगण्यात आलं आहे. ब्राम्हणांना पितरांप्रमाणे मानलं जात असल्याने भोजन दिल्याने अनेक लाभ होतात. पितरांच्या मृत्यूतिथीनुसार श्राद्ध करणं शक्य नसेल तर सर्वपित्री अमावस्येला श्राद्ध करता येतं. गया या ठिकाणी पिंडदान करणं पुण्यदायी मानलं जातं. गया या तीर्थस्थानी पिंडदान केल्यानंतर पितरांना स्वर्गाची प्राप्ती होते आणि पुत्रपौत्रांना दीर्घायुष्य आणि समृद्धी प्राप्त होते असं मानलं जातं.

परंपरा

## रोगनाशासाठी...

विविध कार्यं सिद्धीस जाण्यासाठी हिंदू धर्मात अनेक मंत्र सांगण्यात आले आहेत. या मंत्रांच्या जपाने विघ्नांचा नाश होतो तसंच इप्सित साध्य होतात. इच्छित फळासाठी मंत्रजागर करताना श्रद्धा आणि निष्ठा असणं गरजेचं असतं. मंत्रांचा जप श्रद्धापूर्वक आणि भक्तीभावाने केला तर मनोकामना पूर्ण होऊ शकतात. विविध विकारांचा नाश करणारे मंत्रही सांगण्यात आले आहेत. औषधोपचारांसोबतच या मंत्रांचा जप केला तर अंतर्गत शक्ती वाढीस लागते. विशिष्ट मंत्रांच्या नियमित जपाने औषधोपचार अधिक प्रभावी ठरू शकतात. असे मंत्र आपली मानसिक शक्ती वाढवतात. रोगनिवारण करणाऱ्या अशाच काही मंत्रांविषयी...

* कॅन्सर म्हणजे अत्यंत दुर्धर असा विकार.




अशा विकारात रूग्णासह त्याच्या नातेवाईकांनाही मानसिक आधाराची गरज असते. ओम नम: शिवाय, शंभवे कर्केशाय नमो नम: या मंत्राच्या उच्चारणासह शिवलिंगावर मधाने अभिषेक केला असता कॅन्सरच्या रूग्णांना दिलासा मिळू शकतो.

* मेंदूशी संबंधित किंवा मानसिक विकार असतील तर ओम उमा देवीभ्या नम: या मंत्राचा जाप करत पार्वतीदेवीला लाल फूल अर्पण केल्याने डोकेदुखी, स्मरणशक्तीशी संबंधित विकारांची तीव्रता कमी होऊ शकते.

मंत्रजागर

* डोळ्यांशी संबंधित विकारांचं प्रमाणही वाढत चाललं आहे. चष्मा लागणं, मोतीबिंदू, काचबिंदूसारखे विकार वाढत आहेत. अशा वेळी ओम शांखिनिभ्यां नम: या मंत्राचा जप २१ वेळा केल्याने लाभ होऊ शकतो.

* हृदयाशी संबंधित विकारांमध्ये ओम नम: शिवाय संभवे व्योमेशाय नम: या मंत्राचा जाप करता येईल. यावेळी दुधाने शिवलिंगाचा अभिषेक करता येईल.

## मंदिर श्रीरामाच्या बहिणीचं...

भगवान श्रीराम आणि त्याच्या भावंडांबद्दल सर्वच जाणतात. देशभरात राम-सीता-लक्ष्मणाची अनेक मंदिरं आहेत पण रामाला मोठी बहिणही होती. शांता असं तिचं नाव. हिमाचल प्रदेशमधल्या कुलू शहरापासून ५० किलोमीटर अंतरावर या शांतेचं मंदिर आहे. पती शृंग ऋषींसोबत तिची मूर्ती या ठिकाणी विराजमान आहे. या मंदिराबाबत आणि देवी शांताबाबत जाणून घेऊ या...

श्रृंग ऋषी हे ऋष्यश्रृंग विभंडकाचे पुत्र होते. दशरथाला पुत्रप्राप्ती व्हावी यासाठी ऋष्यश्रृंगानेच पुत्रकामेष्टी यज्ञ केला होता. अयोध्येपासून ३९ किलोमीटर अंतरावर या यज्ञाचं स्थान होतं. ऋष्यश्रृंगाचा आश्रम आजही या स्थानी अस्तित्त्वात आहे.

तीर्थक्षेत्र

राजा दशरथाने अंगदेशाचा राजा रोमपदाला मुलगी शांता दत्तक दिली होती. रोमपद आपल्या पत्नीसह अयोध्येला आला होता. तो निपुत्रिक असल्याचं कळल्यानंतर दशरथाने आपली मुलगी दत्तक देण्याचं ठरवलं. या मंदिरात श्रीरामाशी संबंधित सगळे उत्सव आनंदाने साजरे केले जातात. रामजन्म, दसऱ्याला इथे भाविकांची मोठी गर्दी झाल्याचं पहायला मिळतं. देवी शांता आणि तिच्या पतीची पूजा केल्याने भक्तांवर श्रीरामाची कृपा राहते, असं मानलं जातं. श्रीरामाच्या बहिणीचं हे मंदिर विशेष म्हटलं पाहिजे.



## बोल बृहस्पतींचे...

बृहस्पती हे देवांचे गुरू मानले जातात. त्यांच्या कृपेमुळे धन, समृद्धी आणि विद्येची प्राप्ती होते. बृहस्पतींनी आपल्या शिष्यांना मोलाचे सल्ले दिले आहेत. कठिण कामांमध्येही यश मिळवायचं असेल तर बृहस्पतींनी दिलेल्या या सल्ल्यांचं पालन करता येईल.



* त्यज दुर्जनसंसर्ग, भज साधुसमागमम। कुरू पुण्यमहोरात्रं, स्मर नित्यम नित्यताम।

याचा अर्थ असा की वाईट विचारांच्या लोकांचा आणि दुर्जनांचा संग करू नये. त्यांच्यापासून चार पावलं लांब रहायला हवं. बुद्धीमान आणि सज्जनांचा संग करायला हवा. चांगल्या लोकांच्या संगतीने माणूस धर्माचरण करू लागतो. तसंच त्याच्या हातून पुण्यकर्मंही घडतात.


* तैस्तच्छरीरमुत्सृष्टं धर्म एकोनुग्छति। तस्ताद्धर्म:। सहायचश्र सेवितव्य: सदा नृभि:।। म्हणजे सोबतची कोणतीही व्यक्ती आपली साथ सोडू शकते पण धर्म कधीही माणसाची साथ सोडत नाही. इतर माणसांनी साथ सोडली की धर्माचरण आणि पुण्यकर्मच आपली साथ देतात. चांगली वागणूक आपली कायम साथ देते.

स्वमदत

* सकृदुच्चरितं येन हरिरित्य क्षरद्वयम। बद्ध: परिकरस्तेन मोक्षाय गमनं प्रति।। म्हणजे माणसाने कायम परमेश्वराचं स्मरण करायला हवं. भगवंताचं स्मरण करूनच यश मिळवता येतं. परमेश्वराचं नित्यस्मरण करणाऱ्याला सगळ्या सुखांची प्राप्ती होते आणि मोक्षमार्गाचा लाभ होतो.

## अपयशातून यशाकडे...

नाथानिएल हॉथोर्न इंग्रजीतले मोठे लेखक होते. ते कस्टम हाउसमध्ये नोकरी करत होते. एके दिवशी त्यांना नोकरीवरून काढून टाकण्यात आलं. यानंतर ते घरी आले. आपल्याला नोकरीवरून काढून टाकण्यात आल्याचं त्यांनी पत्नीला सांगितलं. हे ऐकून त्याची पत्नी सोफिया नाराज झाली, थोडी निराशही झाली पण काही क्षणातच तिने स्वत:ला सावरलं. ती म्हणाली, अपयशातही धैर्य टिकवून ठेवायला हवं. पतीला ती म्हणाली, तुम्ही गुणवंत, मेहनती आणि प्रतिभावान आहात. तुमच्यासाठी एक रस्ता बंद झाला तर



दुसरा रस्ता खुला होईलच. या रस्त्यावरून गेल्यावर तुम्हाला नक्कीच यश आणि प्रसिद्धी मिळेल. त्यावेळी नाथानिएल गोंधळून गेले. माझी नोकरी गेल्याने काय चांगलं होणार आहे, असा सवाल त्यांनी केला. त्यावर त्यांची पत्नी म्हणाली, तुम्ही खूप चांगलं लिहिता. तुमच्या लेखनाची शैली आणि भाषा वेगळी आहे. नोकरीमुळे तुम्ही लेखनासाठी पुरेसा वेळ देऊ शकत नाही. आता काळच तुमचं भविष्य घडवेल. तुम्ही लेखन करा. तुम्हाला नक्कीच यश मिळेल पण तोपर्यंत घराचा खर्च कसा भागवायचा, असा प्रश्न नाथानिएल यांनी केला. तेव्हा पत्नी म्हणाली, तोपर्यंत मी घरखर्च चालवेन. त्यानंतर नाथानिएल यांनी लेखनाला सुरूवात केली आणि सोफियाने घर सांभाळायला सुरूवात केली. दिवस असेच पुढे जात राहिले आणि त्यांनी ‍द स्कारलेट लेटर‍ ही कादंबरी लिहून पूर्ण केली. या कादंबरीने त्यांना प्रसिद्धी मिळवून दिली. आपल्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता असते. ही गुणवत्ता ओळखून पुढे जायचं ठरवलं की यश मिळतं, हा धडा यावरून घेता येईल. तसंच अपयश आलं तरी दुसरा मार्ग आपल्यासाठी खुला होतो, हे यावरून शिकता येईल.

भक्ती बोध

# पीएम मोदींच्या वाढदिवशी काँग्रेसचे अनोखे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या दिवशी भाजपने देशभरात सेवा पखवाडा आणि जनकल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करत जल्लोष साजरा केला, तर काँग्रेसने या दिवसाला विरोधाचा रंग दिला. काँग्रेसने विविध पातळ्यांवर अनोख्या पद्धतीने आंदोलन करत मोदी सरकारवर टीका केली.



काँग्रेसने कुठे व्होट चोर गद्दी छोड, रस्त्यांवरील खड्ड्यांविरोधात आंदोलन, कुठे काळा दिवस, तर कुठे बेरोजगारीवरून आंदोलन केले. तर समाजमाध्यमांवर एआय व्यंगचित्रांचा वापर करून विरोध करण्यात आला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय असलेल्या महाल परिसरापासून अगदी काही अंतरावर असलेल्या गणेशपेठ येथे व्होट चोर गद्दी छोड आंदोलन करण्यात आले. काँग्रेसने सोशल मीडियावर एक एआय-निर्मित व्हिडिओ शेअर केला आहे.

या अनोख्या आंदोलनांमधून काँग्रेसने मोदी सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत वाढदिवसाच्या दिवशीच राजकीय वातावरण तापवले. एकीकडे शुभेच्छांचा वर्षाव, तर दुसरीकडे तीव्र विरोध मोदींच्या वाढदिवशी देशात दोन टोकांचे सूर अनुभवायला मिळाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस देशभरात भारतीय जनता पक्षाकडून मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक म्हणून कार्यरत राहिलेले मोदी यांचा हा दिवस भाजपने सेवा पखवाडाच्या रूपात जनतेच्या सेवेसाठी समर्पित केला आहे.

१७ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या या उपक्रमात रक्तदान शिबिरे, स्वच्छता मोहिमा, आरोग्य तपासणी शिबिरे आणि विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. संघाच्या गडात भाजपचा उत्साह अधिकच दिसून आला.

संघ मुख्यालयाजवळील परिसरात भाजप कार्यकर्त्यांनी सेवा उपक्रमांद्वारे मोदींच्या वाढदिवसाचे औचित्य साधले. मात्र, याच दिवशी काँग्रेसने नागपूरच्या गणेशपेठ भागात, जो संघ मुख्यालयापासून काही अंतरावर आहे, व्होट चोर गद्दी छोड आंदोलनाचे आयोजन करून केंद्र सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. तसेच रस्त्यांवरील खड्डे, चिखल याकडे लक्ष वेधण्यात आले.

नागपूर खड्डेपूर झाले आहे, अशी टीका करण्यात आली. काँग्रेस कार्यकर्त्यांनी हातात फलक, बॅनर आणि घोषणांनी मोदी सरकारविरोधात आवाज उठवला. व्होट चोर गद्दी छोड, अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

देशात अघोषित आणीबाणी सुरू आहे, मतांची चोरी होत आहे, विरोधकांचा आवाज दाबला जात आहे, शेतकरी हिताकडे सरकारचे लक्ष नाही, मदत करण्यास सरकार तयार नाही, असे काँग्रेसने म्हटले.

**लक्षवेधी आंदोलन**

अमरावतीमध्ये युवक काँग्रेसने मोदींचा वाढदिवस बेरोजगार दिवस म्हणून साजरा केला. गाडगे नगर परिसरात त्यांनी भजी तळून विक्री करत बेरोजगारीचा मुद्दा अधोरेखित केला. भाजप सरकारच्या रोजगार धोरणांवर टीका करत त्यांनी जनतेच्या समस्या मांडल्या.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनासाठी विशेष सुरक्षा व्यवस्था



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :

येत्या २ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर लाखो बौद्ध अनुयायी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी येणार आहेत.

या पार्श्वभूमीवर नागपूर महानगरपालिकेद्वारे ३० सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर या कालावधीत अनुयायांसाठी आवश्यक त्या सर्व नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याची तयारी जोरात सुरू आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी नागरी सुविधा आणि आरोग्याच्या दृष्टीने संपूर्ण दीक्षाभूमी परिसरात स्वच्छतेसह सुविधा पुरवण्याला प्राधान्य देण्याचे निर्देश दिले.

सुरक्षेच्या दृष्टीने दीक्षाभूमी परिसरात ४० स्थायी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त, परिसराबाहेर गर्दीच्या ठिकाणी ८ अस्थायी कॅमेरे आणि १० जनरेटरची व्यवस्था करण्यात आली आहे, जेणेकरून वीजपुरवठा खंडित झाल्यास पर्यायी व्यवस्था उपलब्ध राहील. मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी आणि जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी या उपाययोजनांचा आढावा घेतला.

लाखोंच्या संख्येत येणाऱ्या बौद्ध अनुयायांना आरोग्यपूर्ण सुविधा मिळाव्यात यासाठी संपूर्ण दीक्षाभूमी परिसरामध्ये स्वच्छतेला विशेष प्राधान्य देण्याचे निर्देश आयुक्तांनी प्रशासनाला दिले. तसेच, नासुप्रद्वारे दीक्षाभूमी परिसरात सुरू असलेल्या कामांना गती देऊन मैदान लवकरात लवकर मोकळे करण्याचे निर्देशही नासुप्रच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले.

अनुयायांसाठी तात्पुरत्या शौचालयांची व्यवस्था डॉ. आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च येथील इमारतीच्या मागील बाजूस, माता कचेरी परिसर आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आयटीआय), सामाजिक न्याय भवन परिसरातील पार्किंगच्या जागेवर करण्यात आली आहे. दीक्षाभूमी स्तूप, सर्व मार्ग आणि शौचालयांच्या ठिकाणी निरंतर वीजपुरवठा सुरू राहील याची खात्री करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रसाधनगृहांमध्ये वीजपुरवठ्यासोबतच निरंतर पाणीपुरवठा आणि स्वच्छतेसाठी हँडवॉशची व्यवस्था करण्याचेही आयुक्तांनी सांगितले.

पिण्याच्या पाण्याची व्यवस्था म्हणून दीक्षाभूमी परिसरालगतच्या रस्त्यावर १२० नळ बसवण्यात आले आहेत. सामाजिक संस्थांद्वारे देण्यात येणाऱ्या भोजनदानाच्या ठिकाणी ७ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जाईल, तसेच विविध ठिकाणी ५ सिंटेक्स टँक ठेवून पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. दीक्षाभूमी लगतच्या परिसरातील सर्व रस्ते स्वच्छ राखण्यासाठी तीन पाळीत एकूण ६५० सफाई कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

# अखेर कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप सुरू

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते बीडमध्ये ५ मराठा बांधवांना मिळाले प्रमाणपत्र

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :

सरकारने आज मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या मुहूर्तावर मराठा बांधवांना कुणबी प्रमाणपत्र जारी करण्यास सुरूवात केली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज ५ मराठा बांधवांना हे प्रमाणपत्र दिले गेले. त्यामुळे या प्रमाणपत्रासाठी बलिदान देणाऱ्या अनेकांना न्याय मिळाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

मनोज जरांगे यांच्या गतवर्षीच्या आंदोलनानंतर राज्यातील अनेकांना कुणबी प्रमाणपत्र मिळाले होते. पण मध्येच ही प्रक्रिया मंदावली होती. त्यानंतर जरांगेंनी पुन्हा मुंबईतील आझाद मैदानावर ठाण मांडले. तसेच सरकारला हैदराबाद गॅझेट लागू करून त्यातील नोंदींच्या आधारावर मराठा बांधवांना कुणबीच्या माध्यमातून ओबीसी आरक्षण देण्यास भाग पाडले. त्यानंतर राज्यातील विविध जिल्ह्यांतील मराठा बांधवांना पुरावे सादर केल्यानंतर हे प्रमाणपत्र जारी करण्यात आले. त्यानंतर आता बीड जिल्ह्यातही हे प्रमाणपत्र वाटप करण्यास सुरूवात झाली आहे.



उपविभागीय अधिकाऱ्यांनी जारी केलेले हे प्रमाणपत्र हैदराबाद गॅझेटमधील नोंदींच्या आधारावर जारी करण्यात आले आहे. अजित पवार यांच्या हस्ते मराठा आंदोलनात बलिदान देणाऱ्या कवडे नामक व्यक्तीच्या कुटुंबियांनाही यावेळी १० लाखांची मदत देण्यात आली. यावेळी धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, नारायण गडाचे प्रमुख शिवाजी महाराज व्यासपीठावर उपस्थित होते.

दुसरीकडे, मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधत धाराशिव व हिंगोली जिल्ह्यातही कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. धाराशिवमध्ये पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते ४ जणांना कुणबी प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. हिंगोलीतही ५० उमेदवारांना हे प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. पालकमंत्री नरहरी झिरवळ यांच्या हस्ते हे प्रमाणपत्र दिले गेले.

## आज जारी झालेली कुणबी प्रमाणपत्रं योग्य आहेत का?

छगन भुजबळ यांची शंका



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :

राज्य सरकारने आज मराठा उमेदवारांना कुणबी प्रमाणपत्राचे वाटप केले. पण छगन भुजबळ यांनी या प्रमाणपत्रांवर शंका व्यक्त केली आहे. आज देण्यात आलेली कुणबी प्रमाणपत्र योग्य आहेत का? या प्रमाणपत्रांच्या नोंदी २ सप्टेंबरपूर्वी शोधल्या होत्या का? असे विविध प्रश्न त्यांनी उपस्थित केलेत.

भुजबळ याविषयी म्हणाले, मराठा समाजाला आज देण्यात आलेली कुणबी प्रमाणपत्रे आधीच शोधून ठेवली होती का? हे पहावे लागेल. बावनकुळे यांनी काल सांगितले होते की, चुकीच्या पद्धतीने प्रमाणपत्र जारी केले तर त्यावर कारवाई होईल. त्याचा आम्हाला कोर्टात फायदा होईल.

सदर प्रमाणपत्र चेक करून दिले असतील तर हरकत नाही. पण खोटी माहिती देऊन, चुकीच्या मार्गाने दिली असतील तर माझा विरोध आहे. माझा कोणत्याही समाजाला विरोध नाही. ही शासनाची समिती आहे. सर्वांनी याविषयी आपली भूमिका मांडली आहे, असे भुजबळ म्हणाले.

# भटक्या विमुक्तांसाठीची राजा हरिश्चंद्र संस्था

लोकजागर



राजा हरिश्चंद्र बहुउद्देशीय सेवाभावी संस्था ही श्रीगोंदा सामाजिक संस्था आहे नोंदणी अधिनियम 1860 व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम 1950 च्या कायद्या अंतर्गत नोंदणी झालेली आहे.

ही संस्था प्रमुख्याने महाराष्ट्रातील भटकी विमुक्त शेती मजुरी आदिवासी जाती जमाती अनाथ मुलांविषयी ऊस तोडी कामगारांना प्रश्नावर काम करत आहे. ही संस्थेचे श्रीगोंदा येथील सावंत नगर भागात काम सुरू आहे तसेच अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा व कर्जत जामखेड पाथर्डी शेवगाव व पुणे जिल्ह्यातील तसेच पिंपरी चिंचवड पुणे शहरातील विविध भागात संस्थेच्या माध्यमातून सामाजिक शैक्षणिक आरोग्य रोजगारी विषयावर उपक्रम सुरू आहेत. संस्था प्रमुख यांनी पीडित निराधारित, अपंग, रस्त्यावरील मुलं, लैंगिक शोषित मुली, आत्महत्याग्रस्त मुले, कोविडमुळे अनाथ झालेले मुले, गंभीर शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची मुले, वेश्यांची मुले अशा व बेघर तसेच शिक्षणापासून वंचित घटकांसाठी काम करत असते.

संस्थेच्या माध्यमातून नागरिकत्व पुरवणे, राशन कार्ड, जातीचे दाखले, मतदानाचे ओळखपत्र तसेच शासनाच्या निराधारित श्रावण बाळ, वृद्ध अपंग व विविध विकासात्मक आणि कल्याणकारी योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी सहाय्य व पाठपुरवठा केला जातो.

संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलाचे बचत गट स्थापन करून महिलांना स्वयंरोजगार गृह उद्योग लोह उद्योग निर्माण करण्यासाठी सहाय्य व प्रशिक्षण दिले जाते त्याचबरोबर ग्रामीण आणि शहरी भागातील युवकांना रोजगार विषयी माहिती व मार्गदर्शन करण्याचे तसेच कला व कौशल्य बुद्धीगत करून नोकरीच्या विषयी रोजगार राज्य विविध संधी उपलब्ध करून दिल्या जातात.

भटक्या विमुक्त समाजातील भिक्षा करून पारंपारिक खेळ व मनोरंजन करणाऱ्या जमातीला मनोबल वाढवण्यासाठी सामाजिक शैक्षणिक आर्थिक सांस्कृतिक स्तरावर उंचवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात . त्याचबरोबर या समुदयातील लहान मुला मुलीसाठी राहत असलेल्या पाल तांडा व वस्तीवर पालावरची शाळा असे शैक्षणिक उपक्रम राबवले जातात.

वंचित, पीडित, अनाथ,, भटकी विमुक्त आदिवासी समाजातील संविधानिक मार्गाने मानव हक्क आणि अधिकार मिळवून देणे त्याचबरोबर जमीन घरकुल योजनेचा लाभ व बीज भांडवल उपलब्ध करून देणे समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रमुख मी काम केले जाते. ग्रामीण व शहरी भागातील शेतमजूर आणि बेरोजगार युवकांना संघटित करून त्यांची स्पर्धा परीक्षा, शेतकरी विषय व आधुनिक प्रशिक्षण देण्यासाठी विविध चर्चासत्र व शिबिराचे आयोजन केले जाते. बालविवाह, हुंडाबळी, आत्महत्याग्रस्त महिला, जातपंचायतीने बहिष्कार केलेल्या पीडित व्यक्तींना न्याय देण्यासाठी सहाय्य व कायदेशीर मदत मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात.

ऊस तोडी करीता दरवर्षी दिवाळी, दसरा सणाच्या दरम्यान श्रीगोंदा, शेवगाव, पाथर्डी, जामखेड तालुक्यातील साखर कारखाने सुरू होतात व कामगारांना मुकादम कारखान्याकडून तोडणे पूर्व उच्चल घेऊन देतात. व्यवसाय पिढ्या-पिढ्या चालत आलेला आहे. संस्था अशा कुटुंबातील मुलांना अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आदि सोयी पुरवून शैक्षणिक उपक्रम सुरू करणार आहे. यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी अन्नधान्य, शैक्षणिक साहित्य, जीवनावश्यक वस्तू तसेच आर्थिक सहाय्य करून संस्थेला मदत करण्याचे आवाहन केले आहे.

■ ■ ■

## यशोगाथा ऑरा ब्रांडची आणि पद्मजाची

आपका वॉलेट ओरिजिनल लेदर का है या बनावट है, कैसे पहचानेंगे, मै आप को बताती हूं...! लोकल ट्रेनमधल्या त्या आवाजाकडे सगळ्याच पुरुषांचं लक्ष जायचं. प्रत्येक पुरुषाकडे पाकीट असतंच. त्यामुळे त्या आवाजाकडे सगळेचजण काळजीपूर्वक लक्ष देत.





आवाजाच्या दिशेने पाहिले की सगळेच चाट पडायचे. सुटाबुटातली एक सुशिक्षित तरुणी, दिसायला मॉडर्न, चांगल्या घरातली. मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व. पण, ती अशी लोकल ट्रेनमध्ये पाकिटं का विकतेय, हा प्रश्न प्रत्येकाच्याच मनात असे.

खरंतर ती मुलगी त्या पाकीट तयार करणाऱ्या कंपनीची मालकीण होती. सोशल मीडियाचा बोलबाला नसलेल्या त्या काळात लोकांचे आपल्या उत्पादनाविषयीचे विचार समजून घेण्यासाठी सेल्सगर्लची भूमिका ती निभावत होती. हा तिच्या व्यावसायिक व्यूहनीतीचा एक भाग होता. अशातच एका प्रवाशाने तिला स्वतःचा ब्रॅण्ड बनविण्याची सूचना केली. तिने ऑरा नावाचा चामड्याच्या वस्तूंचा ब्रॅण्ड बनविला. केपी इंडस्ट्रीजच्या अंतर्गत हा ब्रॅण्ड लोकांपर्यंत पोहोचत आहे. या अनोख्या ब्रॅण्डची आणि तिच्या मालकिणीची ही कहाणी... कहाणी के. पी. इंडस्ट्रीजच्या पद्मजा राजगुरु यांची...

मराठवाड्यातील परभणी जिल्हा. या जिल्ह्यात शिवराम राजगुरु हे शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत होते, तर त्यांची पत्नी विमल या जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षिका होत्या. या राजगुरु दाम्पत्यांना एकूण तीन मुले. दोन मुली आणि एक मुलगा. यातली पद्मजा वेगळंच रसायन होतं.

परभणीच्या गांधी विद्यालयातून तिचं शालेय शिक्षण पूर्ण झालं, तर नांदेडच्या एमजीएम महाविद्यालयातून विज्ञान शाखेची पदवी तर सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग या विषयातून तिने पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. महाविद्यालयीन शिक्षण संपलं आणि पद्मजाचा विवाह कपिलदेव मेश्राम या उच्चशिक्षित, सुसंस्कृत, हुशार तरुणासोबत पार पडला.

ग्रामीण भागातील मुलांना मुंबईचं आकर्षण असतं. लग्नानंतर ती मुंबईपासून जवळच असलेल्या डोंबिवलीमध्ये स्थायिक झाली. लग्न झाल्यानंतर मुलाचा, अवनीशचा जन्म झाला..तीन वर्षे ती घरीच होती. मोठ्या कष्टाने तिला एका कंपनीत रिसेप्शनिस्टची नोकरी मिळाली. याच कालावधीत तिने बार्टी या संस्थेतून डिजिटल मार्केटिंगचा विनामूल्य असलेला सहा महिन्यांचा अभ्यासक्रम पूर्ण केला. या अभ्यासक्रमामुळे तिला एका आयटी कंपनीत नोकरी मिळाली. पगार होता १५ हजार रुपये. ॲक्सेंचर ही माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी आणि प्रख्यात कंपनी आहे. ॲक्सेंचरमध्ये तिला नोकरी मिळाली. आयुष्यातलं तिचं दुसरं स्वप्न पूर्ण झालं.

पद्मजा एका कार्यक्रमाला गेलेली. तिथे कॅप्टन अमोल यादव वक्ते होते. मध्यमवर्गीय कुटुंबातील तरुण विमान बनवतो ही कल्पनाच अशक्यप्राय होती. पण, त्यांनी ती सत्यात उतरवली होती. त्याच कार्यक्रमात प्रमुख पाहुणे असणारे आयएएस अधिकारी डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या नोकरी मागणारे न बनता नोकरी देणारे बना हे वाक्य पद्मजाच्या डोक्यात रुंजी घालू लागले. दुसऱ्या दिवशी ती ऑफिसला गेली आणि चक्क राजीनामाच देऊन आली. तिच्या या निर्णयाने तिचे कुटुंब, मित्रपरिवार सारे अचंबित होते. एकच व्यक्ती या निर्णयामागे ठाम होती ते म्हणजे तिचे पती, कपिल. त्यांनी पद्मजाला पूर्ण स्वातंत्र्य दिलं होतं. आपल्या पतीच्या विश्वासाच्या जोरावर उद्योजकीय विश्वात गगनभरारी घेण्यास ती सिद्ध झाली.

सॉफ्टवेअर कंपनी सुरु करण्याचा तिने पहिला विचार केला. आपणच आपला हा कौशल्याधारित व्यवसाय पुढे न्यायचा, हे मनोमन त्यांनी पक्कं केलं. यासाठी त्यांनी एका नावाजलेल्या संस्थेत बॅग्ज मेकिंगसाठी प्रवेश घेतला. व्यवस्थापनाशी बोलून त्यांनी हा अभ्यासक्रम सहा महिन्यांत पूर्ण केला. शिकत असतानाच त्यांनी धारावी येथील एका बॅग तयार करणाऱ्या लघु कारखानदाराशी संपर्क साधला. तिथे पुरुषांची पाकिटं, महिलांच्या बॅग्ज बनवण्यात त्या पारंगत झाल्या. मार्केटिंग स्ट्रॅटेजी म्हणून त्या चक्क ट्रेनमध्ये पाकिटांचं मार्केटिंग करु लागल्या.

लोकांना अस्सल चामड्याच्या वस्तू कशा ओळखाव्या हेदेखील सांगू लागल्या. लोकांना त्यांच्याप्रति विश्वास वाटू लागला आणि ऑरा हा पद्मजा यांचा ब्रॅण्ड अस्तित्वात आला. निव्वळ दोन वर्षांत ही कंपनी काही लाखांची उलाढाल करु लागली. पुरवलेली आहेत. आज त्या यशस्वी उद्योजिका आहेत.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# राष्ट्रवादी काँग्रेसचे उद्या चिंतन शिबीर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :

राष्ट्रीय राजकारणात विद्यमान काळात अतिशय प्रभावशाली असलेल्या नागपूर शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार) राष्ट्रीय चिंतन शिबीर आयोजित करण्यात येत आहे. राज्यात भाजपच्या महायुती सरकारमध्ये सहभागी असलेल्या या पक्षाच्या शिबिराकडे लक्ष लागले आहे.

हे शिबीर १९ सप्टेंबरला एम्प्रेस पॅलेस, वर्धा रोड येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराला राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ आणि यांच्यासह प्रमुख नेते, सर्व मंत्री, खासदार, आमदार, जिल्हाप्रमुख, सेल अध्यक्ष आणि राष्ट्रीय पदाधिकारी असे सुमारे पाचशेहून अधिक पदाधिकारी सहभागी होणार आहे.

या शिबिरामध्ये आगामी निवडणुका आणि पक्षाची भविष्यातील दिशा, पक्षाच्या विस्तारासाठीची रणनीती, युवा आणि महिला केंद्रित धोरणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी बूथ रचना यांसारख्या महत्त्वाच्या मुद्यांवर विचारमंथन केले जाणार आहे.

पक्षाची आजवरची आणि भविष्यातील वाटचाल, तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व त्यातील यश यावर सखोल चर्चा होणार आहे. सकाळी १० वाजता शिबिराची सुरुवात होईल आणि सायंकाळी ५ वाजता त्याचा समारोप होईल, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अनिल अहिरकर यांनी कळवले आहे.

या चिंतन शिबिरात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारीचा आढावा घेण्यात येईल. नागपूरसह संपूर्ण विदर्भात आगामी निवडणुकांमध्ये यश कसे मिळवायचे, यावर लक्ष केंद्रित केले जाईल.

तसेच स्थानिक पातळीवर महायुती करण्याबाबत पदाधिका?्यांचे मत जाणून घेतले जाईल आणि त्यावर आवश्यक उपाययोजना सुचवल्या जातील. या चिंतन शिबिराची सुरुवात नागपूरमधून होत असून, यानंतर प्रत्येक विभागात अशाच बैठकांचे आयोजन केले जाणार आहे.

या शिबिराला यशस्वी करण्यासाठी जिल्ह्याचे निरीक्षक राजेंद्र जैन, कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणकर, ग्रामीण अध्यक्ष बाबा गुजर, प्रशांत पवार, तानाजी वणवे, विशाल खांडेकर, जानबा मस्के आणि नागपूर शहर व ग्रामीणचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

**प्रमुख मुद्दे**

युवकांचे बदलते आकांक्षा आणि जीवनशैली, समाजातील विविध घटकांच्या अपेक्षा, तंत्रज्ञान आणि समाज यांचा परस्पर संबंध, शिक्षण, रोजगार, महिला सुरक्षा, आत्मनिर्भरता, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि कामगार वर्गाचे हित, पक्षाची विचारसरणी गावागावात पोहोचवण्याचे धोरण, या शिबिरात पक्षाचे वरिष्ठ नेते, मंत्री, आजी-माजी आमदार व खासदार, सर्व सेलचे प्रदेशाध्यक्ष, जिल्हाध्यक्ष आणि राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य सहभागी होणार आहेत. हे शिबीर शिव-शाहू-फुले-आंबेडकर आणि यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांवर आधारित प्रगत महाराष्ट्र घडवण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आले आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेसने म्हटले आहे.

## महानगर मुंबई आता ग्लोबल ड्युअल एअरपोर्ट

३० सप्टेंबरला उद्घाटनाचा मुहूर्त



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :

दोन दशकांच्या प्रतीक्षेनंतर, अखेर मुंबईचं दुसरं प्रवेशद्वार नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उद्घाटनासाठी सज्ज झालं आहे. ३० सप्टेंबर रोजी या भव्य प्रकल्पाचं औपचारिक उद्घाटन होणार असून, या विमानतळामुळे मुंबईची ओळख ड्युअल-एअरपोर्ट शहर म्हणून होईल, ज्यामुळे प्रवाशांची सोय आणि शहराच्या विकासाला नवी गती मिळेल.

२००७ साली केंद्र सरकारने मंजूर केलेल्या या ग्रीनफिल्ड प्रकल्पाचा प्रवास सोपा नव्हता. खाड्या, खारफुटीची जंगलं आणि स्थानिक गावं यांसारख्या जटिल भौगोलिक आव्हानांवर मात करत, सिडकोला हजारो कुटुंबांचं यशस्वी पुनर्वसन करावं लागलं. सुमारे १६,७०० कोटींचा खर्च असलेला हा प्रकल्प देशातील सर्वात महागड्या सार्वजनिक-खासगी भागीदारी प्रकल्पांपैकी एक ठरला. २०२१ मध्ये आदाणी समूहाने या प्रकल्पाची सूत्रं हाती घेतल्यानंतर कामाला मोठा वेग आला.

डोंगर कापून सपाटीकरण करण्यात आलं आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून टर्मिनल, रनवे आणि टॅक्सी-वेचं काम वेगाने पूर्ण करण्यात आलं. लंडनच्या प्रसिद्ध आर्किटेक्ट्सनी कमळाच्या फुलाच्या आकाराप्रमाणे तयार केलेलं या विमानतळाचं टर्मिनल हे आधुनिक आणि सांस्कृतिक संयोगाचं उत्कृष्ट उदाहरण आहे.

# घट स्थापना २२ सप्टेंबर तर लक्ष्मीपूजन २१ ऑक्टोबरला

## अकोला पुरोहित संघाच्या सभेत काढण्यात आले मुहूर्त

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १७ :

शारदीय नवरात्र सोमवार २२ सप्टेंबर पासून आरंभ होत आहे, नवरात्र संबंधित शुभ मुहूर्त निर्धारण शास्त्र आज्ञा अनुसार करण्यासाठी अकोला पुरोहित संघ यांची सभा तुकाराम चौक जानोरकर मंगल कार्यालय येथे घेण्यात आली सभेत आश्विन नवरात्रीचे मुहूर्त असे ठरविण्यात आले,

राहू काल -ः नवरात्र मध्ये प्रभावहिन असते.
अमृत -ः सकाळी ६:०४ ते ०७:३४
शुभ -ः सकाळी ०९:०५ ते १०:३६
चंचल -ः दुपारी ०१:३७ ते ०३:०७
लाभ -ः दुपारी ०३:०७ ते ०४:३८
अमृत -ः दुपारी ०४:38 ते ०६:०९
अभिजीत मुहूर्त सकाळी -ः ११:४२ ते १२:३०

यंदा दीपावलीचा सण दोन दिवस येणार आहे, निर्णय सिंधू धर्मसिंधू महाराष्ट्रीयन पंचांग सम्राट पंचांग यांच्या सखोल शास्त्रोक्त निर्णयानुसार मंगळवार २१ ऑक्टोबर रोजी लक्ष्मीपूजन दीपावली साजरी करावी.



ज्या ज्या ठिकाणी अमावस्या तिथी सूर्यास्त नंतर नाही त्या त्या ठिकाणी दीपावली लक्ष्मीपूजन २० ऑक्टोबरला होऊ शकते. २० तारखेला दीपावली साजरी केली तर अशुभ काहीच नाही, परंतु २१ तारीख शुद्ध शास्त्रोक्त असल्याचे सांगण्यात आले.

. सभेत पंडित आचार्य नीरज शुक्ला, श्याम झा, श्याम सुंदर अवस्थी, शौकी मिश्रा, तुलसी मिश्रा, संजय तिवारी, राजकुमार, अनुराग तिवारी, प्रमोद तिवारी, हरी शर्मा, ब्रिजमोहन शर्मा, कृष्णा तिवारी, महेश जोशी, रतन तिवारी, लाला तिवारी, धीरज तिवारी, लोकेश तिवारी, हरीश उपाध्याय, दिलीप दुबे, अनिल तिवारी, बबलू दुबे, मनोज शर्मा, रजनीकांत जाडा एवं पंडित रवी कुमार शर्मा उपस्थित होते.

महासागर नागपूर

वृत्तसागर

■ गुरुवार, दि. १८, सप्टेंबर २०२५ ■

# २ मित्रांना ठार मारण्याचा प्रयत्न

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :** जुगारावरून झालेल्या वादात आरोपी भावंडांनी दोन मित्रांवर चाकूने हल्ला करून त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केला. दोघांवरही मेडिकल रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. रोहित दिगंबर शेंडे (२३) आणि करण दुर्गाप्रसाद हिंगे (२३) अशी जखमींची नावे आहेत. पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपी भावंडांना अटक केली आहे. शुभम सातपैसे (३०) आणि दिलीप सातपैसे (२८) रा. भांडे प्लॉट अशी अटकेतील आरोपींची नावे असून दोघेही कुख्यात गुंड आहेत. मंगळवारी दुपारी दोघांनाही न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडी सुनावली आहे.

रोहित शेंडे हा ऑटोचालक आहे. करण हा त्याचा मित्र आहे. मिळालेल्या माहितीनुसार, करणचा मित्र तुषार खांडरकर आणि आरोपी शुभममध्ये जुगाराच्या पैशांवरून सोमवारी रात्री श्यामबाग परिसरातील पीएफ कार्यालयाच्या मागच्या गेटजवळ भांडण झाले होते. वाद चिघळत चालल्याचे पाहून तेथे उपस्थित करण आणि रोहितने मध्यस्थी करीत त्यांच्यातील वाद सोडवण्याचा प्रयत्न केला. यामुळे चिडलेल्या शुभमने भाऊ दिलीप याच्यासोबत मिळून फनस कापण्याच्या चाकूने रोहितच्या गळ्यावर वार केला. मात्र रोहित वेळीच खाली वाकल्याने तो वार त्याच्या कपाळावर लागला. रक्ताची धार लागून तो गंभीर जखमी झाला. करण त्याच्या मदतीला धावला असता आरोपींनी त्याच्याही गाल व डोक्यावर वार करून गंभीर जखमी केले. रोहितने घटनेची माहिती त्याचा भाऊ शुभम याला दिली.

# आवश्यक सुविधा समन्वयातून पूर्ण करा

## महसूलमंत्री बावनकुळे यांचे निर्देश : धम्मचक्र प्रवर्तन दिन आणि कोराडी येथील नवरात्रोत्सवाचा आढावा




■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १७ :** धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमी आणि कामठी येथील ड्रॅगन पॅलेस येथे तसेच कोराडी येथे नवरात्रोत्सवाची सर्व व्यवस्था संबंधित विभागांनी परस्पर समन्वयातून पूर्ण करण्याची गरज आहे. पिण्याचे पाणी, साफसफाई, प्रकाश व्यवस्था, बसेसची व्यवस्था, पोलीस व्यवस्था, अग्निशामक उपाययोजना, आकस्मिक पाऊस आल्यास निवास व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे, आपत्ती व्यवस्थापन, आरोग्य व्यवस्था, बाहेर पडण्यासाठीचे मार्ग, वाहतूक, पार्किंग व्यवस्था तत्काळ पूर्णत्वास नेण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे दिले.

सदर येथील जिल्हा नियोजन भवन येथे आज धम्मचक्र प्रवर्तन दिन आणि कोराडी येथील नवरात्री उत्सवाच्या तयारीचा आढावा त्यांनी घेतला. यावेळी आमदार नितीन राऊत, आमदार चरणसिंह ठाकूर, माजी मंत्री ॲड. सुलेखाताई कुंभारे, पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल, महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, सह पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे पदाधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले की, दीक्षाभूमी व ड्रॅगन पॅलेस येथे येणाऱ्या अनुयायांना उत्तम आरोग्य सेवा मिळावी, सर्व सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत राहावेत तसेच आकस्मिक रुग्णसेवेसाठी डॉक्टरांची नियुक्ती करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. पूरक व्यवस्थेची तयारी झाल्यानंतर सर्व जबाबदार अधिकाऱ्यांनी परस्परांशी समन्वय ठेवून पाहणी करावी असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. महानगरपालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांची विपुल उपलब्धता, निवास व्यवस्था, पुरेशे टॉयलेट याची खातरजमा अधिकाऱ्यांनी करावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

नागपूर महानगरपालिकेतर्फे धम्मचक्र प्रवर्तनदिनानिमित्त दीक्षाभूमी येथे येणाऱ्या अनुयायांसाठी पुरविण्यात येणाऱ्या मुलभूत सुविधांच्या व्यवस्थापनाची माहिती देण्यात आली. यात दिशादर्शक नकाशा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, साफसफाई, शौचालयाची व्यवस्था, दिवाबत्तीची व्यवस्था, परिवहन व्यवस्था, आपत्ती व्यवस्थापन, वैद्यकीय आरोग्य व्यवस्था आदींची माहिती बैठकीत देण्यात आली.

दीक्षाभूमी परिसरालगतच्या सर्व रस्ते व सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी २४ तास तास घन कचरा व्यवस्थापन विभागाची यंत्रणा कार्यरत असणार आहे. आरोग्य विभाग, नागपूर महानगरपालिकेकडून आरोग्य व्यवस्थेकरीता २४ तास पाच ठिकाणी तात्पुरते आरोग्य केंद्र ॲम्बुलन्ससह कार्यरत असणार आहे. संबंधित वरिष्ठ पोलिस अधिका-यांकडून सादरीकरणाद्वारे दीक्षाभूमी आणि ड्रॅगन पॅलेस, कोराडी देवी नवरात्रोत्सवाच्या तयारीचा आढावा व माहिती सादरीकरणाद्वारे देण्यात आली.

धम्मचक्र प्रवर्तनदिनानिमित्त ड्रॅगन पॅलेस येथे येणाऱ्या अनुयायांच्या सोईसाठी प्रवेश आणि निर्गमनाचे स्वतंत्र मार्ग, होमगार्डसची नियुक्ती, मोबाईल टॉयलेट, पुरेशी बसेसच्या व्यवस्थेची सूचना यावेळी करण्यात आली.

# खड्ड्यात पडून युवकाचा मृत्यू

## मृतदेह असलेली रुग्णवाहिका अडवण्याचा प्रयत्न



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १७ :** मंगळवारी रात्री पाणी भरलेल्या खड्ड्यात पडून दुचाकीस्वार युवकाचा मृत्यू झाल्याने परिसरातील नागरिक संतापले आहेत. दुसऱ्या दिवशी बुधवारी नागरिकांनी अपघातस्थळी आंदोलन केले. युवकाचा मृतदेह घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकेला थांबवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे तेथे तणाव निर्माण झाला आहे. पोलीस घटनास्थळी हजर झाले असून स्थितीवर नियंत्रण ठेवून आहे.

मंगळवारी शहरात सकाळपासून पावसाचा धुमाकूळ सुरू होता. सायंकाळी सहाच्या सुमारास झालेल्या मुसळधार पावसामुळे भुयारी मार्गावर साचलेल्या पाण्यामुळे खड्डा न दिसल्याने दुचाकीवरून निघालेल्या तरुणाचा खड्ड्यात पडून मृत्यू झाला होता. डिप्टी सिग्नल भागातल्या भुयारी मार्गावर ही घटना घडली होती. महेंद्र फटिंग (१९) असे खड्ड्यात पडून दगावलेल्या तरुणाचे नाव आहे.

महेंद्र हा डिप्टी सिग्नल भागातील भुयारी मार्गावर दुचाकीने जात होता. त्याच वेळी मुसळधार पाऊस सुरू असल्याने भुयारी मार्गावर पाणी साचले होते. तरीही त्याने गाडी चालवण्याचे धाडस केले. मात्र, साचलेल्या पाण्यात खड्डा न दिसल्याने त्याच्या दुचाकीला अपघात झाला होता. दुसऱ्या दिवशी बुधवारी या घटनेचे संतप्त पडसाद अपघातस्थळी उमटले. ज्या ठिकाणी हा अपघात झाला ते स्थळ बघण्यासाठी सकाळपासूनच नागरिकांनी गर्दी करणे सुरू केले होते.

रस्त्यावरील खड्ड्यांमुळे तरुणाचे प्राण गेल्याने सर्वजण हळहळ व्यक्त करतानाच प्रशासनाच्या विरोधात संताप व्यक्त करीत होते. दरम्यान दुपारी चारच्या सुमारास युवकाचा मृतदेह घेऊन येणाऱ्या रुग्णवाहिकेला थांबवण्याचा प्रयत्न संतप्त जमावाने केला. त्यासोबत तेथे आलेले पोलिसाचे वाहनही अडवण्याचा प्रयत्न संतप्त जमावाने केले. नागरिकांना रोखण्यासाठी सुरक्षा कठडे लावण्यात आले होते ते सुद्धा जमावाने फेकले होते. त्यामुळे तेथे प्रचंड तणाव निर्माण झाला आहे.

# शाळकरी मुलाचे अपहरण करून खून

## पोलिसांच्या शोधमोहिमेची माहिती मिळताच मृतदेह झाडीत फेकला, तिघे अटकेत

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १७ :** सोमवार १५ सप्टेंबर रोजी अपहरण केलेल्या शाळकरी मुलाचा मृतदेह झाडीत आढळल्याने खळबळ माजली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. जित युगराज सोनेकर (वय ११) असे अपहरण करून खून केलेल्या मुलाचे नाव आहे.

तीनही आरोपींनी १५ सप्टेंबरला भानेगाव बसस्टॉप येथून अरूण भारती याच्या एम. एच. ४०, ए-७९९७ क्रमाकांच्या कारमध्ये जितचे अपहरण करून सिल्लेवाडा परिसरात नेले. तिथे गळा दाबून हत्या केली. आरोपींनी जितचा मृतदेह चनकापूर कॉलनीमध्ये एका क्वॉर्टरमध्ये लपवून ठेवला. पोलिसांची तपास पथके वारंवार जितचा शोध घेत असल्याचे माहिती झाल्याने १७ सप्टेंबरच्या मध्यरात्री ३ वाजताच्या सुमारास मृतदेह चनकापूर कॉलनी शिवारात झाडी झुडुपात फेकुन दिला.

अपहत मुलाची आई नीलीमा युगराज सोनेकर (वय ३५, चनकापुर कॉलनी, ता. सावनेर) यांनी त्यांचा मुलगा जित युगराज सोनेकर (वय ११) हा शाळेतून घरी परत आला नाही अशी तोंडी तक्रार खापरखेडा पोलिस ठाण्यात केली होती. जित युगराज सोनेकर (वय ११) हा शंकरराव चव्हान इंग्लीश मीडीयम शाळा, प्रकाशनगर, खापरखेडा येथे सहाव्या वर्गात शिकतो. १५ रोजी जित शाळा सुटल्यावर सायंकाळी नेहमी प्रमाणे घरी आला नाही. त्याची आई नीलीमा सोनेकर हीने शाळेत जावुन चौकशी केली तसेच आजुबाजूच्या परीसरात मुलाचा शोध घेतला असता तो आढळला नाही.

अपहरण झालेल्या युगचा सीसीटीव्ही, ओळखीचे नातेवाईक, मित्र, शाळेतील शिक्षक यांचा माध्यमातून शोध घेणे सुरू होते. १७ रोजी चनकापूर कॉलनी शिवारातील झुडुपात एका मुलाचा मृतदेह आढळल्याची माहिती खापरखेडा पोलिसांना मिळाली.

पोलिसांनी घटनास्थळ गाठुन चौकशी केली असता तो जित सोनेकर असल्याची ओळख पटली. या प्रकरणी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपी राहुल गौरीलाल पाल (वय २५), अरूण बैचु भारती (वय २५) व यश गिरीश वर्मा (वय २१) असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली.

# १९३ मालमत्तावर होणार जप्ती कारवाई

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १७ :** नागपूर महानगरपालिकेच्या लकडगंज झोन अंतर्गत स्थावर मालमत्ता कर थकवणाऱ्यांवर आता कठोर कारवाई सुरू झाली आहे. झोनमधील १९३ स्थावर मालमत्तांवर सुमारे ६३ लाख ६३ हजार ६४५ रुपये मालमत्ता कर थकल्यामुळे त्या जप्त करण्यात आली आहे. यामध्ये मौजा पुनापूर, मौजा भरतवाडा येथील मालमत्तांचा समावेश आहे. येत्या ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत मालमत्तेचा थकीत कराचा भरणा करीत लिलाव टाळावा. अशी माहिती लकडगंज झोनचे सहायक आयुक्त विजय थुल यांनी दिली.

३० सप्टेंबर २०२५ पर्यंत मालमत्तेचा थकीत कराचा भरणा न करणाऱ्यांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या अनुसुची ड प्रकरण 8 च्या नियम 45 पोटनियम (1) अन्वये जाहीर लिलाव (नमुना अ) कार्यवाही लिलाव करुन बकाया कर वसुल करण्यात येईल

# तिसऱ्या माळ्यावरून पडल्याने मजुराचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :** निमार्णाधिन इमारतीच्या तिसऱ्या माळ्यावरून खाली पडल्याने एका मजुराचा मृत्यू झाला. ही घटना प्रतापनगर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. योगेश भागवत खंडाळकर (३१) असे मृताचे नाव आहे. योगेश हा मुळचा गोंदियाच्या हौसेटोला येथील रहिवासी होता. तो सेंट्रिंगचे काम करायचा. कामासाठी तो मोठा भाऊ सावलराम याच्यासोबत नागपुरात आला होता. जीवनशाळानगर परिसरात हल्दीराममागे डॉ. पंकज शारदा यांच्या इमारतीचे बांधकाम सुरू आहे. या बांधकामावर दोघेही भाऊ काम करीत होते आणि तेथेच एका झोपडीमध्ये राहात होते. मंगळवारी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास योगेश तिसऱ्या माळ्यावर सेंट्रिंगचे काम करीत होता. या दरम्यान अचानक तोल गेल्याने तो थेट खाली जमिनीवर पडला.गंभीर जखमी अवस्थेत योगेशला उपचारार्थ जवळच्या खासगी रुग्णालयात नेले असता तपासून मृत घोषित केले.

# रोकड नेली चोरून

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :** रात्रीच्या वेळी खरेदी करण्यासाठी बाहेर जाणे एका कुटुंबाला चांगलेच महागात पडले. अज्ञात आरोपीने केवळ तासाभरात घरफोडी करून रोख २ लाख आणि सोन्याचे लॉकिट असा एकूण २ लाख ६ हजार रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना जरीपटका पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी कमलेश राजू बोरकर (३३) रा. विश्वभारती लेआऊट, समतानगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. सोमवारी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास कमलेश हे घराला कुलूप लावून कुटुंबासह कपिलनगर परिसरात खरेदीसाठी गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटात ठेवलेली दोन लाखांची रोकड आणि ६ हजार रुपये किंमतीचा सोन्याचा लॉकिट चोरून नेला.

# जिल्हास्तरीय महसूल सेवा पंधरवाड्याला सुरुवात

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाअंतर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन 17 सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दिनांक 2 ऑक्टोबर या कालावधीत संपूर्ण राज्यभर महसूल सेवा पंधरवडा साजरा केला जात आहे. विहीरगाव येथून जिल्हास्तरीय महसूल सेवा पंधरवाड्याची सुरुवात आज करण्यात आली.

याप्रसंगी संपूर्ण गावात स्वच्छता ही सेवा अभियान राबविण्यात आले. गावात वृक्षदिंडी काढून वृक्ष संवर्धनाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले तसेच गावात पाणंद रस्त्यावर मान्यवरांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आले. गावात फिरते सेतू केंद्र लोकार्पण करण्यात आले तसेच नेत्र तपासणी शिबिराचे सुद्धा लोकार्पण करण्यात आले . याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते, तहसीलदार कल्याण कुमार दहाट, नायब तहसीलदार दिनेश हटवार, सचिन शिंदे, सर्व संबंधित विभागाचे अधिकारी, पदाधिकारी ग्रामपंचायत सदस्य, महिला सदस्य, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, आरोग्य पथक, पोलीस पाटील व गावातील सर्व समस्त गावकरी व ग्रामपंचायत कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते.

# नॅनो प्लास्टिक व मायक्रो प्लास्टिक मेंदूच्या वाढत्या आजारांना कारणीभूत : डॉ. चंद्रशेखर मेश्राम



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :** प्लास्टिक प्रदूषणात अग्रेसर असलेल्या जगातील 30 शहरांमध्ये अर्धे अधिक शहरे ही भारतातील असून प्लास्टिकच्या अति वापरामुळे पाणी, हवा आणि जमिनीच्या माध्यमातून नॅनोप्लास्टिक व मायक्रो प्लास्टिक शरीरात प्रवेश करतात. हृदयातून तीस टक्के रक्त हे मेंदूमध्ये प्रवाहित होत असल्यामुळे किडनी आणि लिव्हरच्या तुलनेत हे प्लास्टिक मेंदूच्या रक्तवाहिन्यांत जमा होऊन अल्झायमर, डिमेंशिया, पार्कीनसन, यासारखे मेंदूचे आजार होतात. त्यामुळे प्लास्टिकच्या वापरावर जनजागृती करण्याची आणि वैचारिक चळवळ समाजात निर्माण करण्याची गरज आहे असे मार्गदर्शन जागतिक न्यूरोलॉजी महासंघाचे विश्वस्त व ज्येष्ठ न्यूरोलॉजीस्ट पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांनी केले.

वनराई फाउंडेशन, इंडियन कॅन्सर सोसायटी आणि प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्य क्षेत्रातील प्लास्टिक, एक उदयोन्मुख संकट या विषयावर मार्गदर्शन करताना प्रमुख वक्ता म्हणून ते बोलत होते. बाबुराव धनवटे सभागृहात आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्ष इंडियन कॅन्सर सोसायटीचे कार्याध्यक्ष कुमार काळे तर प्रमुख अतिथी म्हणून वनराई फाऊंडेशनचे अध्यक्ष गिरीश गांधी उपस्थित होते. यावेळी मंचावर जयप्रकाश गुप्ता, वाय.एस. देशपांडे, निलेश खांडेकर उपस्थित होते.

यावेळी चंद्रशेखर मेश्राम आपले मार्गदर्शनात पुढे म्हणाले की आजच्या वाढत्या प्लास्टिकच्या युगात प्लास्टिकचा सर्वात जास्त वापर ई-कॉमर्स, सुपर मार्केट, फार्मा इंडस्ट्रीज मध्ये होत आहे. फार्मा इंडस्ट्रीमध्ये 30 लाख टन प्लास्टिकच्या वापरापैकी पन्नास टक्के प्लास्टिकचा पुनर्वापर होत नाही. अमेरिकेच्या संशोधनानुसार 2016 मध्ये मृत पावलेल्या व्यक्तींचे मेंदू व 2024 मध्ये मृत पावलेल्या व्यक्तींचे मेंदू यांचे सर्वेक्षण केले असता 2024 मध्ये मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या मेंदूमध्ये पन्नास टक्के अधिक प्लास्टिक आढळून आला. मेंदूच्या आजारांना कारणीभूत असलेल्या घटकांमध्ये 30 टक्के घटक प्लास्टिकचे आहे. याशिवाय कॅन्सरला कारणीभूत असलेले घटकांचे वाहक हे नॅनो प्लास्टिक व मायक्रो प्लास्टिक आहे. भाजीपाला, फळे, मासे, कासव याशिवाय आपण वापरतो ते कपडे, पावडर , क्रीम्स, पाणी बॉटल्स चहाचे कप यातून मोठ्या प्रमाणात मायक्रो प्लास्टिक आपल्या शरीराला जात असते.

# उत्तरप्रदेशातील आरोपींना लुटीची सुपारी



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १७ :** कडबी चौकाजवळील बेझनबाग रोडवर व्यवसायी राजीव रुपचंद दिपानी (४७) याच्यावर गोळीबार करून ५० लाखांची रोकड लुटण्यात आली होती. या प्रकरणात पोलिसांना मोठे यश मिळाले असून लुटीचा कट रचणाऱ्या ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. मात्र गोळीबार करून लुटपाट करणारे ६ आरोपी अद्याप फरार आहेत. सिमरजितसिंग संधू (४०) रा. पंजाब, शेख हुसेन उर्फ जावेद शेख बशीर सवारे (३७) रा. वाठोडा, अब्दुल नावेद अब्दुल जावेद (३३) रा. बजेरीया आणि सय्यद जिशान सय्यद रहेमान (३२) रा. जाफरनगर, अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडी सुनावली आहे. व्यवसायिकाकडे मोठ्याप्रमाणात हवालाचा पैसा येत असल्याची माहिती एका आरोपीला होती. त्याने त्याच्या मित्रांना याबाबत माहिती देऊन लुटपाट करण्याची योजना बनवली. त्यासाठी उत्तरप्रदेशातील आरोपींना सुपारी देऊन बोलावण्यात आले, अशी माहिती पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

सिंगल यांनी सांगितले की, गत १० सप्टेंबरच्या रात्री राजीव दीपानी यांच्यावर गोळीबार करून ५० लाखांची रोकड लुटण्यात आली. पोलिस सतत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज आणि मोबाईलचा डम्प डाटा शोधत होते. सहआयुक्त नवीनचंद्र रेड्डी, डीआयजी वसंत परदेशी, डीसीपी निकेतन कदम आणि राहुल माकणीकर स्वतः संपूर्ण प्रकरणावर नजर ठेवून होते. फुटेजच्या तपासणीत, घटनेनंतर आरोपी स्थानिक वाहनांनी शहराबाहेर पळाले असल्याचे पुढे आले. त्यामुळे ७ वेगवेगळी पथके तयार करून आरोपींच्या शोधार्थ रवाना करण्यात आली. वाहन आणि फोन नंबरच्या आधारावर पोलिसांना माहिती मिळाली की, काही आरोपी नागपूरला परत येत आहेत. या आधारावर वरील ४ आरोपींना अटक करण्यात आली.

दीपानीचे दहा नंबर पूल येथे स्वरुप ॲग्रो ट्रेडर्स या नावाने कार्यालय आहे. या कार्यालयातून तो हवालाचा पैसा इकडे-तिकडे करतो. आरोपी जावेद शेख हा एका ट्रान्सपोर्टमध्ये काम करतो. त्याच्या मालकाच्या नावे अमरावतीहून काही रक्कम राजीवच्या कार्यालयात आली. ती रक्कम घेण्यासाठी जावेद राजीवच्या कार्यालयात दोन महिन्यांपूर्वी गेला होता. तेव्हा त्याला राजीवच्या कार्यालयात मोठ्याप्रमाणात हवालाची रक्कम येत असल्याचे समजले.

# जीवघेणा हल्ला करणारे गुंड अद्यापही फरारच

## अवैध सावकारीवरही अंकुश लावा : गंभीर जखमीच्या बहिणीची मागणी



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १७ :** श्री गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान खामला वस्तीतील गुंडांनी दोघांवर जीवघेणा हल्ला केला. यात कुठलाही दोष नसलेल्या अजय लधाराम पंजवानी या युवकासह अन्य एका युवकाला जीवानिशी मारण्याचा प्रयत्न केला. यातील अजय पंजवानी दहा दिवसांपासून मृत्यूशी झुंज देत आहे. घटनेतील तीन आरोपींना पोलिसांनी अटक केली. मात्र, अन्य पाच आरोपी अद्यापही फरार असून पोलिसांवर कोणाचा दबाव आहे, असा सवाल गंभीर जखमी असलेल्या अजय यांची बहीण मोना पंजवानी यांनी उपस्थित केला आहे.

थोडक्यात घटना अशी की, खामला परिसरात 7 सप्टेंबरला गणेश विसर्जन मिरवणूक निघाली होती. या मिरवणुकीत खामला वस्तीतील काही गुंड लाठ्या, काठ्या आणि शस्त्र घेऊन होते. रात्री 11 ते 12 च्या दरम्यान अजय पंजवानी (37) हे लालवानी कॅम्प खामला कडून प्रताप नगर चौकाकडे आपल्या दुचाकीने जात होते. याच वेळी मिरवणुकीत सहभागी झालेले आरोपी रोहीत परते, सागर समुद्रे, राहुल समुद्रे, संदीप उर्फ गपू समुद्रे (सर्व रा. शिवनगर कॉलनी, खामला), भरत कश्यप (रा. व्यंकटेश कॉलनी, खामला) यांच्यासह समुद्रे गँगमधील इतर काही गुंडांनी अजय यांना रस्त्यात अडविले. तू सिंधी है क्या असे विचारले. होकारार्थी उत्तर येताच त्याला लाठ्या, काठ्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. अजय यांचा कुणासोबतही कुठलाही आर्थिक व्यवहार नसताना विनाकारण त्यांना मारहाण करण्यात आली. यात अजय बेशुद्ध पडले. याच दरम्यान तेथे आलेल्या अन्य एका सिंधी युवकालाही जीवानिशी मारण्याचे आदेश समुद्रे गँगमधील एकाने दिले. त्याच्यावर तलवार चालविली गेली. मात्र, यात ते किरकोळ जखमी झाले.

गंभीर जखमी अजय पंजवानी यांना प्रारंभी खामला येथील लाईफ केअर रुग्णालयात आणि नंतर सी.ए. मार्गावरील राहाटे हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले. 7 सप्टेंबरपासून ते आय.सी.यू. मध्ये असून मृत्यूशी झुंज देत आहे.

या प्रकरणात झालेल्या दोन वेगवेगळ्या तक्रारींच्या आधारे राणा प्रतापनगर पोलिसांनी गुन्हे दाखल केले. आरोपींपैकी तिघांना अटक केली. मात्र अन्य पाच आरोपी अद्यापही फरार असून त्यांना अटक का केल्या जात नाही, असा सवाल अजय पंजवानी यांच्या बहीण मोना यांनी उपस्थित करत तातडीने त्यांना अटक करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# हिंगण्यात महाविकास आघाडीचे वोट चोर गद्दी छोड आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. १७ :

निवडणुकीत आश्वासन देऊन ते पूर्ण करायची नाही. शेतकरी,विद्यार्थी, युवक, बेरोजगार, महिला, कामगार आधी समाज घटकांचा विश्वासघात करणार सरकार सध्या केंद्रात व राज्यात आहे, विकास कामांमध्ये टक्केवारीच्या भस्मासुराने हे सरकार पूर्णपणे भ्रष्टाचारी झाली आहे. जनसुरक्षा विधेयकाच्या नावाखाली सर्वसामान्य माणसांचे स्वातंत्र्य हीरावण्याचा या सरकारचा मानस आहे. यांना जनतेशी काही घेणेदेणे नाही कारण ही निवडणूक जनतेच्या मतांवर निवडून येत नाही तर मतदार याद्यांमध्ये बोगस नावे टाकून आणि बेईमानी करून निवडून आलेले आहेत असे हिंगणा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे व महाविकास आघाडीच्या घटक पक्षांच्या वतीने आयोजित होट चोर गद्दी छोड या आंदोलना बोलताना राज्याचे माजी मंत्री रमेशचंद्र बंग म्हणाले.



हिंगणा महाविकास आघाडी तर्फे लोकशाहीला घातक असलेले जनसुरक्षा विधेयक ज्यामुळे नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर व वैयक्तिक गोपनीयतेवर आघात होईल. तेव्हा तो कायदा परत घ्यावा.तसेच देशाचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील निवडणुकांवर व एकूणच देशातील निवडणुकांबाबत होट चोरीचे केलेले आरोप हे गंभीर बाब असून हिंगणा विधानसभा क्षेत्रात सुद्धा एक लाखापेक्षा जास्त बोगस मतदार असल्याचे आढळून येत आहे.

ते तात्काळ कमी करावे. विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी भाजप व त्यांच्या मित्रपक्षाने शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्जमाफीची दिलेले आश्वासन पूर्ण करून शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा. निवडणुकीच्या तोंडावर आणलेल्या लाडकी बहीण योजनेत सुरुवातीला अर्ज करणाऱ्या महिलांना सर्वांना सरसकट लाभ दिला परंतु आता निकषांच्या नावाखाली लाखो महिलांचे अर्ज बाद केल्या जात आहेत ते बाद करू नये व निवडणुकीत आश्वासन दिल्याप्रमाणे लाडकी बहीण योजनेचे पंधराशे वरून एकवीसशे रुपये करावे. मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना या योजनेत प्रशिक्षण घेणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना स्थायी स्वरूपाच्या नोकरी द्याव्या या मागण्यांकरिता महाविकास आघाडीतर्फे आंदोलन करण्यात आले. व हिंगणाचे तहसीलदार सचिन कुमावत यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

यावेळी राज्याचे माजी अन्न व नागरी पुरवठा मंत्री रमेशचंद्र बंग, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष बाबा आष्टणकर, जिल्हा परिषदेतील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे माजी गटनेते दिनेश बंग, राष्ट्रवादी कॉंग्रेस (श प) पक्षाचे योगेश सातपुते, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष विनोद उमरेडकर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख विष्णू कोल्हे, माझी जि प सदस्य मारोती हजारे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख रवी जोडांगळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती बबनराव आव्हाळे, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष राजेंद्र गोतमारे, प्रकाश कोकाटे, बी एन सिंग, उमेश राजपूत, सुनील बोंडाडे, दीपक नासरे, दादाराव इटनकर, मेघा भगत, ज्योती पारस्कर, हनुमान दुधबळे, विलास वाघ, प्रभुदयाल बिसेन, राजू दुधबळे, विलास भगवत, विजय मेश्राम, योगीराज पराते, तारूस बांद्रे, प्रफुल्ल काकडे, दुर्योधन ढोणे, युवराज काकडे, चंदन वर्मा, हंसराज पाटील, प्रभाकर लेकुरवाळे, धनराज चिचाणे, संजय लोखंडे, गुणवंता भोडगे, गुरुदास जिले, गुरुदास चिचाने, मुरलीधर जीवनकर, सुरेश शेंडे, लक्ष्मण बोदलवंडे, बेबीताई चिवाने, आदींसह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# रामटेक येथे सेवा पंधरवाडा कार्यक्रमाचा शुभारंभ



■ महासागर प्रतिनिधी रामटेक, दि. १७ :

शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन दि.१७ सप्टेंबर २०२५ ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दि. २ ऑक्टोबर २०२५ पर्यंतच्या कालावधीमध्ये "सेवा पंधरवाडा " राज्यभर राबविण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने रामटेक तालुक्यात दि.१७ सप्टेंबर ला "सेवा पंधरवाडा " कार्यक्रमाचा शुभारंभ शांती मंगल कार्यालय, रामटेक येथील सभागृहात आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन, तहसीलदार रमेश कोळपे यांच्या मार्गदर्शनात सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडले. सदर "सेवा पंधरवाडा" कार्यक्रमाला नागपूर उपजिल्हाधिकारी (राजशिष्टाचार) इंदीरा चौधरी यांची प्रमुख उपस्थिती. यावेळी देवलापारच्या अपर तहसीलदार पुनम कदम,पंचायत समितीचे गटविकास अधिकारी जयसिंग जाधव, रामटेक नगर परिषदच्या मुख्याधिकारी पल्लवी राऊत, भूमिअभिलेख उपअधिक्षक बोबडे, रामटेक सा.बां. उपविभागीय अभियंता किरण पोकळे व नायब तहसीलदार भोजराज बडवाईक, नायब तहसीलदार अमित निंबाळकर, नायक तहसीलदार मुकुंदा भुरे, तहसीलदार महेश कुलदीवार, पुरवठा निरीक्षण अधिकारी संदेश हलमारे व सर्व मंडळ अधिकारी, ग्राम महसुल अधिकारी कार्यालयीन कर्मचारी व ईतर विभागातील अधिकारी व कर्मचारी या कार्यक्रमाकरीता उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमामध्ये माजी जिल्हा परीषद सदस्य दुधराम सव्वालाखे, माजी नगरसेविका वनमाला चौरागडे,भगिनीमंडळच्या ज्योती कोल्हेपारा,समाजसेवक गोपी कोल्हेपारा तसेच इतर पदाधिकारी व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# झंकार महिला मंडळाकडून ड्रग्ज विरोधी मोहीम



■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १७ :

झंकार महिला मंडळाच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात या मालिकेत, झंकार महिला मंडळाने १३ सप्टेंबर २०२५ रोजी नागपूर येथे झालेल्या मिस नेशन २०२५ मध्ये केवळ सामाजिक भागीदार म्हणून भाग घेतला नाही तर या कार्यक्रमाद्वारे ड्रग्ज विरोधी मोहिमेतही भाग घेतला.

या व्यासपीठावरून, झंकार महिला मंडळाकडून 'से नो टू ड्रग्ज' हा संदेश देण्यात आला.हा संदेश वेकोली नागपूर परिसरातील मेघा महिला मंडळाच्या महिला कलाकारांनी स्किट/नृत्यातून उपस्थित तरुण प्रेक्षकांना सादर केला, ज्याला सर्व श्रोत्यांनी खूप कौतुकास्पद मानले. या प्रयत्नातून, झंकार महिला मंडळाने तरुणांमध्ये ड्रग्ज विरोधात जनजागृती करण्यासाठी एक प्रभावी पुढाकार घेतला आहे.

आभा द्विवेदी यांच्या अध्यक्षतेखाली झंकार महिला मंडळाकडून वर्षभर अनेक सामाजिक कामे केली जातात. त्यांचे प्रयत्न वृद्ध, महिला आणि मुलांना मदत करण्यापासून ते समाजातील वंचित घटकांना आवश्यक वस्तू पुरवण्यापर्यंत आहेत. विशेष दिव्यांग मुलांचे संगीत बँड तयार करणे आणि त्यांना प्रशिक्षण देणे, मुलींच्या वसतिगृहात पाणी शुद्धीकरण यंत्रे पुरवणे, अपंग विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहात प्रिंटर/स्कॅनर, मुलींसाठी गणवेश, जेवणाची व्यवस्था, पुस्तके वाटप, लेखन साहित्य इत्यादी उपक्रमांचा समावेश आहे.

# अतिवृष्टीमुळे उभी पिके धोक्यात तर ॲलो मोजॉकमुळे सोयाबीन पीक नष्ट

## राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाच्यावतीने निवेदन

■ महासागर प्रतिनिधी भिवापूर, दि. १७ :

भिवापूर तालुक्यात काही दिवसापासून दररोज पाऊस पडत असून उभी असलेली सोयाबीन, कापूस, मिरचीचे पिके अतिवृष्टीमुळे धोक्यात आली असून यात सोयाबीन पिकावर मोठया येलो मोर्जाक नावाच्या प्रादुभार्वामुळे ही पिके नष्ट झाली असून याबाबत भिवापूर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार वतीने तालुकाध्यक्ष सुधीर मोहोड यांच्या पुढाकारात निवेदन देण्यात येवून नुकसान भरपाईची मागणी तहसिलदार टेडे च्या मार्फत कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

अतिवृष्टीमुळे सोयाबीन, मिरची, कापूस ही पिके धोक्यात आली असून सोयाबीन ची पिके ॲलो मोजाक मुळे नष्ट झाली असून बळीराजा चांगलाच आर्थीक अडचणीत सापडला आहे. या पिकाचे सर्वे तातडीने करून नुकसान भरपाईची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांच्या वतिने करण्यात आली आहे. यावेळी निवेदन देतेवेळी संजय गजभिये, अमोल इंगळे, सत्यवान ढोक, विठ्ठल ढोके, रमेश भोयर, चंद्रशेखर मेश्राम, रेखचंद शेंडे, पंकज डोये, संदीप मांढरे, विशाल राऊत उपस्थित होते.

# दहावे स्नेहमिलन व रक्तदान शिबीर यशस्वीरित्या संपन्न

■ महासागर प्रतिनिधी मौदा, दि. १७ :

परमात्मा एक मानवधर्म परिवार युवा सेवकांचा समूह तर्फे आयोजित दहावे स्नेहमीलन व रक्तदान शिबिर, आरोग्य चिकित्सा शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न झाले. सेवाभावी वातावरणात एकूण ९१ रक्तदात्यांनी, डागा हॉस्पिटल शासकीय मेट्रो रक्तपेढी, नागपूर, यांच्याकडे कार्यक्रम स्थळी रक्तदान करून समाजसेवेचे महान उदाहरण घालून दिले.



या कार्यक्रमात मानवधर्म परिचय परीक्षा घेण्यात आली. परीक्षेत सेवक-सेविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विजेत्यांमध्ये प्रथम क्रमांक :. राजू हटवार, द्वितीय क्रमांक : आकाश निशाणे, तृतीय क्रमांक :. धनराज जीभकाटे कार्यक्रमादरम्यान सेवक-सेविकांचे स्नेहमीलन, रक्तदानाचे महत्व, तसेच मानवधमार्चे विचार यावर मार्गदर्शन झाले.

या उपक्रमामुळे रक्ताच्या थेंबातून नात्याची वीण घट्ट होत समाजात ऐक्य आणि मानवतेचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी श्री.राजुजी मदनकर आहेब माजी अध्यक्ष प.पू.परमात्मा एक सेवक मंडळ नागपूर, कार्यक्रमाचे उद्घाटन, मोरेश्वरजी गभणे माजी सहसचिव प.पू.परमात्मा एक सेवक मंडळ नागपूर, रश्मी ताई बर्वे माजी अध्यक्ष जिल्हा परिषद नागपूर, कार्यक्रमाचे संचालन मंगेश संग्रामे यांनी केले, प्रास्ताविक महेंद्र चाचेरे, व आभार राजेश उदापुरे यांनी मानले

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित मा.श्री.तापेश्वरजी वैद्य संचालक प.पू.परमात्मा एक सेवक मंडळ नागपूर, युवराजजी वैद्य, मनोहरजी देशमुख, टीकारामजी भेंडारकर संजय बाघमारे बाळकृष्णाजी भोंडे , बंडूजी वैरागडे पत्रकार, महेंद्र दादा चकोले, शिवानी ढोबळे, रत्नमाला वैद्य, मदनजी पंचबुद्धे, रामूजी शेंडे, सूर्यभानजी निखाडे, दिपकजी व्यंकटकर, गणेशजी सरोदे, बाबुरावजी वाणी, रवीजी कारेमोरे , प्रमिला मानकर, विनायकजी रोकडे, चंदुजी सेलवटकर , घनश्यामजी चकोले. मंडळी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन जीवन पाटील, जितेंद्र अहिरवार, मंगेश संग्रामे, पवन रोकडे, डॉ.जितेंद्र मानकर, किसना सपाटे, उमाकांत मानकर, राजेश उदयपुरे, राजश्री महाजन, कु. बाली बंजारी व परमात्मा एक मानव धर्म परिवार युवा सेवकांच्या समूहातील सर्व सदस्यांनी केले.

## रूपालीताई चाकणकर यांच्या मार्गदर्शनात

# महिला पदाधिकाऱ्यांची पक्ष प्रवेश



■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १७ :

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर शहरातील सर्व महिला पदाधिकाऱ्यांची मीटिंग व पक्ष प्रवेश सोहळा, १५ सप्टेंबर रोजी पक्ष कार्यालय गणेशपेठ येथे आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी नागपुर चे निरीक्षक माजी आमदार राजेंद्र जैन, नागपुर शहर अध्यक्ष अनिल अहिरकर यांचे मार्गदर्शनात प्रदेश संघटन सचिव नूतन रेवतकर यांचे नेतृत्वात राकापा (श.प.) गट व कॉंग्रेसमधील महिला पदाधिकारी मंजूषा सोनोले, शशिकला भोंगाडे, वर्षा पाटील, नीता सोमकुवर, बबिता मांडवकर, मनीषा तांडी यांनी महिला आयोग अध्यक्षा व राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर यांचे हस्ते अजित पवार गटात प्रवेश घेतला. प्रदेश महासचिव व प्रवक्ते प्रशांत पवार, प्रदेश महासचिव तानाजी वनवे, प्रदेश महिला सचिव लक्ष्मी सावरकर तसेच शहरातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# उपायुक्त मंगेश वानखडे यांच्या उपस्थितीत जात पडताळणी कार्यशाळा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी रामटेक, दि. १७ :

स्व. घनश्यामदास किंमतकर सभागृह, रामटेक येथे उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जात पडताळणी समिती यांच्यावतीने रामटेक मौदा व कामठी तालुक्याकरिता जात पडताळणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम महामानवांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. महाराष्ट्र राज्यगीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी जिल्हा जात पडताळणी समितीचे सदस्य तथा उपायुक्त डॉ.मंगेश वानखडे यांनी उपस्थित प्राचार्य, प्राध्यापक, नोडल अधिकारी,लिपीक व विद्यार्थी यांना जात वैधता प्रमाणपत्र बाबत शैक्षणिक कागदपत्रे व महसूल



कागदपत्रे बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. वर्ग १२ वी विज्ञान करिता १ सप्टेंबर २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ व ११ वी विज्ञान करिता १ फेब्रुवारी २०२६ पासून अर्ज स्वीकारण्यात येतील अशी माहिती सदर कार्यशाळेत देण्यात आली. कार्यशाळेला समर्थ विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, रामटेक. समर्थ कॉन्व्हेंट ज्युनिअर कॉलेज, रामटेक. श्रीराम विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, रामटेक. राष्ट्रीय आदर्श विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, रामटेक तसेच जनप्रभा विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, रामटेक येथील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी स्व. इंदिरा गांधी विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, नगरधन येथील प्राचार्या निशा बाकडे होत्या. कार्यक्रमाचे संचालन मौदा तालुका समतादुत ओमप्रकाश डोले यांनी केले. आभार दुर्योधन बगमारे यांनी मानले. कार्यक्रमाचे आयोजन रामटेक तालुका समतादुत राजेश राठोड यांनी केले. कार्यक्रमाला कामठी तालुका समतादूत सुनीता गेडाम उपस्थित होत्या. याप्रसंगी उपस्थितांच्या शंकांचे प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून निरसन व समाधान करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समर्थ शिक्षण संस्थेचे सचिव ऋषिकेश भाऊ किंमतकर, प्राचार्या ममता लोखंडे, प्राचार्य रेणुका घोष, प्राचार्य राष्ट्रपाल शिंदीमेश्राम, प्राचार्य राहुल गवई, प्राचार्य रवींद्र चन्ने इत्यादींनी सहकार्य केले.कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## संस्कृत बालनाट्य स्पर्धेत

# सावनेरच्या कान्हा धवडने मारली बाजी



■ महासागर प्रतिनिधी सावनेर, दि. १७ :

स्थानिक रहिवासी कान्हा चंद्रशेखर धवद या बाल कलाकाराने खासदार सांस्कृतिक महोत्सवातील संस्कृत बाल नाट्य स्पर्धेमध्ये उत्कृष्ट ॲक्टरचा मान पटकाविला. ही स्पर्धा नागपूर येथील कविवर्य सुरेश भट ओडीटोरियल सभागृह नागपूर येथे पार पडली. यात जिल्ह्यातील 55 शाळांनी भाग घेतला होता. कान्हा हा पोतदार इंटरनॅशनल स्कूल काटोल रोड नागपूर या शाळेमध्ये चौथ्या वर्गामध्ये शिकत आहे. जयप्रकाश गुप्ता भारत सरकार वस्त्र उद्योग अध्यक्ष यांच्या हस्ते हे पारितोषिक कान्हाला देण्यात आले.

यावेळी प्राचार्य कृष्णकुमार पांडे, आभाताई मेघे व इतर मान्यवर उपस्थित होते. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल क्षेत्राचे आमदार आशीष देशमुख,माजी क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार, समाजसेवक प्रकाश बालपांडे,मनोज बसवार,शफिक सय्यद, एडवोकेट चंद्रकांत पिसे, वरिष्ठ पत्रकार किशोर ढूंढेले, एडवोकेट आनंद गुप्ता,एडवोकेट भेजराज सोनकुसरे, डॉ योगेश पाटील, रामभाऊ घाटोडे, रमेश घटे, डॉ. रोशन निनावे, राजेंद्र बडवाईक, प्रवीण रासेकर व पिंटू अंतुरकर यांनी शुभेच्छा दिल्या.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवशी राष्ट्रीय आदर्श शाळेत विविध उपक्रम



■ महासागर प्रतिनिधी रामटेक, दि. १७ :

दि. १७ सप्टेंबर २०२५ रोज बुधवार राष्ट्रीय आदर्श विद्यालय प्राथमिक विभाग रामटेक येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या जन्मदिवसाच्या औचित्य साधून प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये प्रत्येक वर्गातून दोन अनुक्रमे मुले निवडून त्यांचे डाळिंब, पेरू, अननस, अंगूर, केळ, आंबा, फणस, चिकू असे गट करण्यात आले. प्रत्येक गटातून वर्ग १ ते ४ विदयार्थ्यांनी सहभाग नोंदीवीला सहभागी सर्व स्पर्धकांना प्रोत्साहन पर पारितोषिक देण्यात आले.

तर प्रश्नमंजुषा स्पर्धेत तृतीय क्रमांक वर्ग दुसरी मध्ये शिकणाऱ्या आर्या वाडीभस्मे व उन्नती भोंगाळे, तर द्वितीय क्रमांक तांशिका सोनकुसरे व आरुष गिरडकर, तर प्रथम पारितोषिक गर्ग टोंगसे व जयेश मोटघरे यांनी पटकावला सर्व अनुक्रमे येणाऱ्या स्पर्धकांना रोख पारितोषिक देण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे पर्यवेक्षक श्रीयुत परमार तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे मुख्याध्यापक निलेश टोंगसे होते. प्रश्नमंजुष्याचे संचालन सवांडे आणि कुमारी देशमुख यांनी केले. तर प्रश्नमंजुष्याचे गुणदान शिक्षक जांभुळे आणि महाजन यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार आनंदराव देशमुख, सचिव मयंक देशमुख यांनी सहकार्य दिले.

# नागपूर विभागात स्वच्छता ही सेवा अभियान

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १७ :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात 17 सप्टेंबर 2025 रोजी संपूर्ण नेटवर्कवर उत्साहपूर्ण सहभागासह स्वच्छता ही सेवा - 2025 अभियानाला सुरुवात झाली. अभियानाच्या पहिल्या दिवशी स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करून जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

अभियानाची सुरुवात विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयात स्वच्छता शपथ घेऊन करण्यात आली. या प्रसंगी विभागीय रेल्वे व्यवस्थापक विनायक गर्ग यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना शपथ दिली. अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (प्रशासन) अमोल कुमार पिंगळे, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (तांत्रिक) अरुण कुमार सिंह, शाखाधिकारी, पर्यवेक्षक व मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थित होते. ही शपथ एकाच वेळी विभागातील सर्व स्टेशन, डेपो, शेड, यार्ड व रेल्वे वसाहतींमध्ये घेण्यात आली. 1,700 हून अधिक कर्मचाऱ्यांनी यात सहभागी होऊन स्वच्छता राखण्याचा व स्वच्छ रेल्वे वातावरण निर्मितीचा संकल्प पुन्हा दृढ केला. महत्त्वाच्या गाड्यांच्या डब्यांमध्ये विशेष जनजागृती स्टिकर्स लावण्यात आले तर स्टेशन, डेपो व वसाहतींमध्ये स्वच्छता ही सेवा - 2025 चे बॅनर्स प्रमुख ठिकाणी लावण्यात आले. याशिवाय प्रमुख स्वयंसेवी संस्था, नागरी समाज संस्था, व्यापारी संघटना व औद्योगिक प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. गौशाला समिती, गायत्री परिवार, श्रीकृष्ण लीला फाऊंडेशन, लायन्स क्लब व व्यापारी संघ यांसारख्या संस्थांनी सक्रिय सहभाग व सहकार्याचें आश्वासन दिले.

# उत्कृष्ट शिक्षकांचा केला गौरव

## विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य हीच शिक्षकांच्या कार्याची पोचपावती : ना.जयस्वाल

■ महासागर प्रतिनिधी रामटेक, दि. १७ :

दि.१४ सप्टेंबर रोजी युवासेना गोंदिया जिल्हा व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटना, सालेकसा तर्फे शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या शिक्षकांचा सत्कार सोहळा राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या रामटेक येथील जनसंपर्क कार्यालयात पार पडला.

यावेळी गोंदिया जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी झटणाऱ्या शिक्षकांचा राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते शाल, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन मुख्याध्यापक शीतल अंबादे, महेश बिसेन,शिक्षक नितेश मच्छिर-के, सुनिल वाघमारे, डी. एस. शिवणकर, सुनंदा भुरे, सुरेंद्र बिसेन, भारती चक्रधर, सुरेश चव्हाण, गजानन तरोने, विजयकुमार मेंढे, हिरनकांता बनसोड यांचा सत्कार करण्यात आला.



"एक उत्तम विद्यार्थी घडविणे हे शिक्षकांचे काम आहे. त्यांचे उज्वल भविष्य हीच शिक्षकांच्या कायार्ची पोचपावती आहे.

पुरस्काराचा विचार न करता विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी शिक्षकांनी प्रयत्नशील राहावे. मुलांचे शिक्षक याच भावनेतून मुलांना शिकवीत असल्याने त्यांचे कार्य खरोखरच कौतुकास्पद असल्याचे मत राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी यावेळी मांडले".

या कार्यक्रमाला युवासेना गोंदिया जिल्हाप्रमुख व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, सालेकसा अध्यक्ष अर्जुनसिंह बैस, विजय मानकर, शिवसेना सालेकसा तालुका प्रमुख विजय नागपुरे, गणेश भदाडे, शिवसेना विधानसभा संघटक ओमप्रकाश ठाकरे, युवासेना सालेकसा तालुका प्रमुख मायकल मेश्राम, युवासेना सडकअर्जुनी तालुका प्रमुख तुळसीदास शिवणकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

# नागपूर जिल्ह्यातील सर्व सीबीएसई शाळांना दिवाळी व ख्रिसमसच्या सुट्ट्यांचा लाभ

## शिक्षण अधिकारी (माध्यमिक) यांचे परिपत्रक सिस्वा संघटनेच्या मागण्यांना यश



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १७ :

नागपूर जिल्ह्यातील सर्व सीबीएसई शाळांना आता दिवाळी व ख्रिसमसच्या वाढीव सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या आहेत. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) गौतम गेडाम यांनी सोमवार १५ सप्टेंबर रोजी काढलेल्या परिपत्रकाद्वारे या संदर्भात स्पष्ट निर्देश दिले आहेत.

सीबीएसई स्कूल स्टाफ वेल्फेअर असोसिएशन (सिस्वा)च्या अध्यक्षा दिपाली महेश डबली यांनी १० सप्टेंबर रोजी शिक्षण अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाचा संदर्भ घेत या मागणीला मान्यता देण्यात आली. जिल्ह्यातील इतर सर्व शाळांप्रमाणेच सीबीएसई शाळांनाही समान सुट्ट्या मिळाव्यात, ही सिस्वा संघटनेची महत्त्वपूर्ण व न्याय्य मागणी होती. त्यानुसार आता जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनांच्या अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, महानगरपालिका, अल्पसंख्यांक व सीबीएसई शाळांना पुढीलप्रमाणे सुट्ट्या लागू राहतील

दिवाळी सुट्टी : १८ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२५ ख्रिसमस सुट्टी : २२, २३, २४ व २५ डिसेंबर २०२५ शिक्षण अधिकाऱ्यांनी परिपत्रकात स्पष्ट केले आहे की, या सुट्ट्यांचे काटेकोर पालन सर्व शाळांनी करणे अनिवार्य राहील. नियमांचे पालन न करणाऱ्या शाळांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्याचेही निर्देश परिपत्रकात नमूद आहेत.

सिस्वा संघटनेच्या पहिल्या जनआंदोलनाचा हा मोठा विजय मानला जात आहे.

१२ फेब्रुवारी २०२० रोजी सीबीएसईच्या डेप्युटी सेक्रेटरी ॲफिलिएशन यांनी नागपूर जिल्हा शिक्षण कार्यालयाला पाठवलेल्या पत्रात गव्हर्मेंट ऑफ इंडिया व राज्य शिक्षण विभागाचे नियम सर्व प्रकारच्या शाळांना लागू आहेत हा मुद्दा अधोरेखित करण्यात आला होता. यामुळे नागपूर जिल्ह्यातील सर्वच सीबीएसई शाळांमध्ये आता दिवाळी व ख्रिसमसच्या सुट्ट्या अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आल्या असून, शिक्षक व कर्मचाऱ्यांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

**प्रतिक्रिया :**

दिवाळी व ख्रिसमसच्या सुट्ट्या इतर शाळांप्रमाणे आम्हालाही मिळणार हे ऐकून आनंद झाला. आता आम्हालाही घरगुती व सांस्कृतिक उपक्रमांना वेळ देता येईल.

**आकृत भालेराव, विद्यार्थी**

आधी सीबीएसई शाळांना कमी सुट्ट्या मिळत असल्याने मुलांना ताण यायचा. या निर्णयामुळे सर्व शाळांना समान नियम लागू होत असल्याने पालकही समाधानी आहेत.

**वर्षा तराळेकर, पालक**

शिक्षकवर्गाच्या न्याय्य मागण्यांना यश मिळाले आहे. या सुट्ट्यांमुळे शिक्षकांनाही कुटुंबासोबत वेळ घालवण्याची संधी मिळेल.

**तेजराज राजुरकर, सेवानिवृत्त शिक्षक**

शासनाच्या परिपत्रकानुसार सुट्ट्या जाहीर करणे बंधनकारक आहे. त्यामुळे सर्व शाळा एकाच वेळपत्रकानुसार चालणार असून, यामुळे शैक्षणिक नियोजन सोपे होईल.

**प्रमोद रेवतकर, अध्यक्ष, खाजगी प्राथमिक शिक्षक संघ**

# सेंटर पॉईंट स्कूलचे ध्रुव मोर व आहान डोरा यशस्वी




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस तर्फे नागपूर विभागात आयोजित केलेल्या टीसीएस इन्क्विझिटिव्ह या वार्षिक प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये अमरावती रोड, सेंटर पॉईंट स्कूलचे विद्यार्थी ध्रुव मोर आणि आहान डोरा यांनी उत्तम गुणांसह विजेतेपद पटकावले. रायपूरच्या कृष्णा पब्लिक स्कूलचे मनन सेठिया आणि ओम निर्मळकर उपविजेते ठरले. इयत्ता ८ वी ते १२ वीतील विद्यार्थ्यांसाठी खुली असलेली ही स्पर्धा कवीवर्य सुरेश भट सभागृहात नुकतीच पार पडली. १२ शहरांमध्ये घेण्यात येणाऱ्या या राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमाच्या नागपूर आवृत्तीत ४७ शाळांमधील तब्बल ३८५ पेक्षा जास्त संघ सहभागी झाले होते.

नागपुरातील रामदेवबाबा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजेश एस. पांडे यांच्या हस्ते विजेत्या संघाला आणि उपविजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. यावेळी टीसीएस नागपूरचे डिलिव्हरी सेंटर प्रमुख अरविंद कुमार उपस्थित होते. विजेते संघ आता देशातील उर्वरित ११ शहरांतील विजेत्यांशी झुंज देत राष्ट्रीय अंतिम फेरीत नागपूरचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

डॉ. राजेश एस. पांडे या प्रसंगी म्हणाले, टीसीएस इन्क्विझिटिव्ह हे तरुण मनांना नावीन्याच्या दिशेने प्रेरित करणारे उत्तम व्यासपीठ आहे. पुस्तकांच्या पलीकडील शिक्षणाला हा उपक्रम आनंददायी पद्धतीने प्रोत्साहन देतो. यातून सहकार्यभावना वृद्धिंगत होते, समस्या सोडविण्याची क्षमता वाढते, बहुविद्याशाखीय दृष्टीकोन निर्माण होतो आणि स्व-अभ्यासाची जिज्ञासा जागृत होते.

# गायत्री पार्क २ येथे ग्रीन जिमसाठी महिलांचे सरपंचांना निवेदन



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १७ :

वाघधरा येथील रॉयल गायत्री पार्क 2 मधील महिलांनी 17 सप्टेंबर रोजी ग्रामपंचायत ईसासनी येथे भेट देऊन सरपंच अरविंद ढोणे यांची भेट घेतली आणि सोसायटीमध्ये ग्रीन जिम बसविण्याचा अर्ज दिला. सरपंच अरविंद ढोणे यांनी महिलांना आश्वासन दिले की, "मी आपल्या सोसायटीमध्ये लवकरात लवकर ग्रीन जिम बसविण्याचा प्रयत्न करीन आणि आपला अर्ज ग्रामपंचायतीमार्फत लवकरच वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविला जाईल."

या प्रसंगी प्रमुख उपस्थितांमध्ये शिल्पा वानखेडे, स्मृतीरेखा जेना, सविता नंदगौडी, ज्योती पाटणकर, मीना यादव, विजय गौरखेडे यांचा समावेश होता.

# जीवन विकास विद्यालय व वनिता विद्यालयाच्या खेळाडूंचा जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत विजय



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १७ :

शालेय क्रीडा आणि युवा सेवा संचालनालय पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर तर्फे तनिष्क नर्सिंग कॉलेज, राजीव नगर येथे जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत जीवन विकास विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय व जीवन विकास वनिता विद्यालयाच्या मुलाझमुलींनी विविध वजनगटात चमकदार कामगिरी करून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला.

१७ वर्षाखालील मुले ६० किलो खालील : रोहित राजकुमार मांढरे - प्रथम क्रमांक ७१ किलो खालील : तन्मय दिलीप शेळके - प्रथम क्रमांक ७९ किलो. खालील : दर्शन राजेश चकोले - प्रथम क्रमांक, ९८ किलो खालील : रेवाशंकर जग्गू शाहू - प्रथम क्रमांक, १७ वर्षाखालील मुली ४४ किलो खालील : विशाखा रवींद्र नागपुरे - प्रथम, तन्वी यशवंत भांनारकर - द्वितीय, ४८ किलो खालील : तनुश्री विनोद देवळीकर - द्वितीय, ५८ किलो खालील : श्रावणी किशोर गवरी - तृतीय, ६३ किलो खालील : कल्याणी यशवंत सोनकुसरे - प्रथम ७७ किलो वरील : गुंजन नरेंद्र गिरी - प्रथम, १९ वर्षाखालील मुले ६० किलो खालील : ओमकुमार नाशिकेत दिघोरे - प्रथम, ६५ किलो खालील : सोहेल मशरूद्दीन रजवी - प्रथम, ७१ किलो खालील : अरमान किरण समुद्रे - प्रथम, आर्यन वासुदेव वाकुडकर - द्वितीय, ९८ किलो खालील : कार्तिक सचिन अड्याळवाले - प्रथम, १९ वर्षाखालील मुली, ४८ किलो खालील : प्रांजल विलास तुरणकर - प्रथम, सरगम सुरेंद्र बेंडे - द्वितीय, ५३ किलो खालील : सलोनी प्रकाश आंबुलकर - प्रथम, जानवी गंगाधर नान्हे - द्वितीय, ५८ किलो खालील : माही राजू मेश्राम - प्रथम या सर्व खेळाडूंनी आता १९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या शालेय विभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे.

# नागपूर विभागात 'स्वच्छता ही सेवा पंधरवाडा' साजरा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

भारतीय रेल्वेच्या राष्ट्रीय मोहिमेअंतर्गत स्वच्छ रेल्वे - स्वच्छ भारत आग्नेय मध्य रेल्वे, नागपूर विभागात "स्वच्छता ही सेवा आहे" हा पंधरवडा १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत साजरा केला जात आहे. हा पंधरवडा सुरू होतो आज १७ सप्टेंबर २०२५ रोजी विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली एक भव्य शपथविधी समारंभ पार पडला. समारंभापासून सुरुवात झाली. यावेळी उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेची सामूहिक प्रतिज्ञा घेतली, ज्यामध्ये महात्मा गांधीजींचे स्वप्न आठवले ज्यामध्ये त्यांना केवळ राजकीय स्वातंत्र्यच नाही तर एक स्वच्छ आणि विकसित देश देखील दिसला. भारताची कल्पना होती. "मी स्वच्छतेबद्दल जागरूक राहीन आणि त्यासाठी वेळ देईन.", "दरवर्षी १०० तास, याचा अर्थ असा की मी आठवड्यातून किमान २ तास श्रमदान करून स्वच्छतेला माझ्या जीवनाचा एक भाग बनवीन.", "मी स्वतः कोणताही गोंधळ निर्माण करणार नाही." "मी दुसऱ्या कोणालाही ते करू देणार नाही.", "मी माझ्या घरापासून, कुटुंबापासून, परिसरापासून, गावापासून आणि कामाच्या ठिकाणी स्वच्छतेची सुरुवात करेन." "मी ते करेन.", "मी इतर १०० लोकांना स्वच्छता राखण्यासाठी प्रेरित करेन आणि या दिशेने सतत प्रयत्न करेन." प्रतिज्ञा असेही म्हटले गेले की ज्याप्रमाणे जगातील अनेक देशांमध्ये स्वच्छता राखली जाते कारण तेथील नागरिक घाणेरडे असतात, आपण ते करत नाही आणि होऊ देत नाही, त्याच विचारसरणीने आपल्याला प्रत्येक गावात आणि प्रत्येक गल्लीत स्वच्छ भारत अभियानाचा प्रचार करायचा आहे. या प्रसंगी विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांनी आपल्या प्रेरक भाषणात सांगितले की, स्वच्छता ही काही ही एक दिवसाची किंवा पंधरवड्यांची मोहीम नसून आपल्या जीवनशैलीचा कायमचा भाग असावी. रेल्वे स्टेशन देश जेव्हा प्रवासी येथील स्वच्छ वातावरण पाहतात तेव्हा संपूर्ण देशाची प्रतिमा उजळते. आपल्याला हे सुनिश्चित करावे लागेल मी प्रत्येक प्रवाशाला या स्वच्छ भारत मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन करतो. मी सर्व कर्मचारी, प्रवासी आणि नागरिकांना आवाहन करतो. मी त्यांना विनंती करतो की त्यांनी दरवर्षी किमान १०० तास स्वयंसेवा करण्याची प्रतिज्ञा करावी आणि या दिशेने इतर १०० लोकांना प्रेरित करावे. ते करा. हा जनसहभाग स्वच्छ भारताचा आधार आहे." याशिवाय, विभागातील सर्व स्थानके, कार्यशाळा आणि रेल्वे संग्रहालये मोती बाग कर्मचाऱ्यांनी शपथविधी सोहळा आयोजित केला होता.

# संताजी स्मृति मंदिर गरोबा मैदान येथे शैक्षणिक शिबीर संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

श्री संत जगनाडे महाराज शिक्षण संस्था नागपूर व श्री क्षेत्र रामटेक तेली समाज धर्मशाळा यांचे संयुक्त विद्यमाने 2025-26 या सत्राचे पहिले शैक्षणिक शिबिर श्री संताजी स्मृति मंदिर गरोबा मैदान नागपूर येथे संपन्न झाले.

शिबिरात खुशालराव पाहुणे, श्री क्षेत्र रामटेक तेली समाज धर्मशाळा रामटेक अध्यक्ष म्हणून लाभले. शिबिरात विद्यार्थी व पालक यांनी शिक्षण घेताना घ्यावयाची काळजी, असामाजिक तत्त्वापासून दूर राहणे, मुलींनी स्वतःचे संरक्षण करणे, पोलीस दलाची मदत कशाप्रकारे घ्यावी यावर सुधीर खुबाळकर सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पोलीस ठाणे सक्करदरा नागपूर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. जगदीश वांदिले यांनी वेळेचे व्यवस्थापन या विषयावर सखोल असे उदाहरणासह मार्गदर्शन केले.

शिबिराचे प्रास्ताविक किशोर वरंभे, अध्यक्ष श्री संत जगनाडे महाराज बहुउद्देशीय शिक्षण संस्था गंजी पेठ नागपूर यांनी केले. रवी उराडे, सचिव, श्री क्षेत्र रामटेक तेली समाज धर्मशाळा अंबाळा रामटेक यांनी संचालन केले, तर दिलीप तुपकर सचिव श्री संत जगनाडे महाराज शिक्षण संस्था नागपूर यांनी आभार मानले शिबिरास 200 पेक्षा जास्त विद्यार्थी व पालक नागरिक हजर होते. शिबिर यशस्वी करण्याकरिता श्री संत जगनाडे महाराज बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष सुनील पंचभाई, उपाध्यक्ष शेखरजी महाजन, सहसचिव प्रमोद वरम्भे, सदस्य लीलाधर गिरडकर, मंगेश सराटकर, लक्ष्मीकांत साठवणे, अंबादास तकितकर, अरूण धान्डे, गोपालदादा ईटनकर यांनी परिश्रम घेतले.

# ३ रा महाराष्ट्र क्वान की डो मार्शल आर्टस ट्रेनिंग सेमिनार व ब्लॅक बेल्ट पदवी प्रदान समारंभ




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

क्वान की डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या वतीने आयोजित ३ रा महाराष्ट्र क्वान की डो मार्शल आर्टस ट्रेनिंग सेमिनार व ब्लॅक बेल्ट पदवी प्रदान समारंभ नुकताच मौलाना अब्दुल कलाम आझाद ज्युनिअर कॉलेज, गांधीबाग, नागपूर येथे अत्यंत यशस्वीरित्या पार पडला.या सेमिनारसाठी नागपूर शहर, नागपूर ग्रामीण, बुलढाणा, वर्धा, गोंदिया, गडचिरोली, जालना, पिंपरी चिंचवड, पुणे शहर व ग्रामीण, यवतमाळ, लातूर अशा विविध जिल्ह्यांमधून एकूण ७८ खेळाडू व जिल्हा प्रतिनिधी उपस्थित होते. यामधून १० खेळाडूंनी ब्लॅक बेल्ट पदवी प्राप्त केली.

ट्रेनिंग सेमिनार व ब्लॅक बेल्ट परीक्षेसाठी क्वान की डो फेडरेशन ऑफ इंडिया कडून इंटरनॅशनल कोच मास्टर विश्वजीत बारी यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी आपल्या अनुभवातून खेळाडूंना उच्च दर्जाचे प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणाचा फायदा राज्यातील खेळाडूंना आगामी युनिव्हर्सिटी गेम्स व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये होणार आहे.या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पीयूष आंबुलकर (सामाजिक कार्यकर्ते), क्योशी हरीश चौबे, रेन्शी प्रमोद जांभूळकर, सेन्साई किरण यादव, तसेच क्वान की डो असोसिएशनचे चेअरमन आणि अब्दुल कलाम आझाद स्कूलचे क्रीडा मार्गदर्शक जावेद राणा उपस्थित होते. त्यांनी उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन व शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे आयोजन क्वान की डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष शेख जाबिर यांनी केले होते, तर सूत्रसंचालन अध्यक्षीय सचिव इकबाल शेख यांनी केले.

या प्रसंगी भारत बिसेन, जनार्धन कुसाराम, मुझामिल अहमद, वाहिद हसन, निलेश मिश्रा, महिमा सिंग, सुरज नगराळे, एम. डी. याकुब, राहुल यादव, विनोद डहारे, वसावे अंकित मलसिंग या खेळाडूंना ब्लॅक बेल्ट प्रमाणपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले.हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात पार पडला. महाराष्ट्रातील क्वान की डो खेळाच्या विकासासाठी आणि युवकांना नवचैतन्य देण्यासाठी हा सेमिनार एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

# प्रधानमंत्री मोदींचा वाढदिवस विविध कार्यक्रमांनी साजरा

■ महासागर प्रतिनिधी, कामठी, दि. १७ :

पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या वाढदिवसानिमित्त, आज एकलव्य फाउंडेशनच्या सर्व सदस्यांच्या वतीने, कर्णिका ( कन्हान) नदीच्या किनाऱ्यावरील महादेव घाट येथे सकाळी संपूर्ण महादेव घाट परिसर स्वच्छ करण्यात आला आणि किनाऱ्यावरील श्री गणेश मंदिरात विराजमान गणेश आणि श्री कर्णिकेश्वर महादेव यांचे जलाभिषेक, पूजा आणि आरती केल्यानंतर, मोदीजींच्या वाढदिवसानिमित्त ि पूजा अर्चा करण्यात आली आणि देवाकडून त्यांच्या आशीवार्दासाठी प्रार्थना करण्यात आली. देव त्यांना भारताला शक्तिशाली बनवण्याची शक्ती देवो...

याप्रसंगी, एकलव्य फाउंडेशनचे अध्यक्ष श्राजेश देशमुख, रमेश कुल्लरकर, भैय्याजी यादव, अशोक पाटील, प्रेम शर्मा, मुकुंद यादव, प्रकाश पाहुणे, विवेक वाडीभस्मे, बिल्लू यादव, विकास बसे, नंदू चिखले, अनिल भाले, शिवदायक देशमुख यांनी एकलव्य फाउंडेशनच्या वतीने सांगितले की, एकलव्य फाउंडेशन स्वच्छता अभियान आणि पर्यावरण संरक्षणासाठी सतत कार्यरत राहील. कामठी शहर, कामठी ग्रामीण भागात स्वच्छता आणि पर्यावरणाचे रक्षण. एकलव्य फाउंडेशनने या प्रसंगी घोषणा केली की ते पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि ते निरोगी करण्यासाठी एक प्रमुख योजना राबवून आजूबाजूचा परिसर स्वच्छ आणि सुंदर बनवेल. या कार्यक्रमात सर्व सदस्यांची प्रमुख उपस्थिती होती.

# शेतकरी कर्जमाफीसाठी व नुकसान भरपाईसाठी आम आदमी पार्टीचे मुख्यमंत्र्यांना निवेदन



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १७ :

आम आदमी पक्षाच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी व शेतकऱ्यांना कर्जमाफी व दुष्काळामुळे झालेल्या नुकसान भरपाईसाठी महाराष्ट्र राज्याचे सचिव सुनील वडस्कर यांच्या उपस्थितीमध्ये जिल्हाध्यक्ष वृषभ वानखेडे यांच्या नेतृत्वात उपविभागीय अधिकारी यांचे मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले.

सध्या स्थितीमध्ये अनियमित पावसामुळे खरीप हंगामातील पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. सोयाबीन पिकावर मोठ्या प्रमाणात रोग गेल्यामुळे सर्व शेतकऱ्यांचे सोयाबीनचे पूर्णपणे नुकसान झालेले आहे. त्याचप्रमाणे अनियमित वातावरणामुळे शेतकऱ्यांच्या संत्रा पिकाला मृगबहार न फुटल्यामुळे व मोसंबी या पिकाची गळ चालू असल्यामुळे शेतकऱ्यांचे पूर्णपणे नुकसान झाले आहे.

तसेच वादळी पावसामुळे कापूस पिकाचे फुल व फळ गळून उभे पिक जमीनदोस्त झाले आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल होऊन वाढत्या कर्जबाजारीपणामुळे आत्महत्येकडे प्रवृत्त होत आहे. याच बाबीचा संदर्भ घेऊन तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी, खरीप हंगाम २०२५ मधील दुष्काळामुळे झालेले पीक नुकसान तात्काळ सर्वेक्षण करून योग्य नुकसान भरपाई देण्यात यावी, संत्रा मोसंबी पिकासाठी प्रति हेक्टर १ लाख नुकसान भरपाई देण्यात यावी, कापूस पिकाला १५ हजार प्रतिक्विंटल हमीभाव जाहीर करावा, सोयाबीन पिकाला १० हजार रुपये प्रति क्विंटल हमीभाव जाहीर करावा, शेतकऱ्यांच्या विज बिल व इतर थकबाकी माफ करून शेतकऱ्यांना दिलासा देण्यात यावा, पिक विमा योजनेतील प्रलंबित रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ जमा करण्यात यावी त्याचप्रमाणे अमेरिकेने भारतातील कापसावर लावलेल्या टेरिफ विरोधात भारत सरकारने अमेरिकन मालावर प्रती टेरिफ लावून भारतीय कापूस उत्पादन शेतकऱ्याचे नुकसान टाळावे इत्यादी मागण्या यावेळेस करण्यात आल्या.

याप्रसंगी नागपूर जिल्हा उपाध्यक्ष शैलेश गजभिये, पुरुषोत्तम हगवणे, रोशनी बाजनघाटे, प्रकाश बोंद्रे, गुलाबराव राऊत, मोतीबाबा पाटोळे, दिलीप वैद्य, नारायण इंगोले, किरण निशाने, कृष्णा डफरे, प्रवीण फिस्के, केतन वानखेडे, गजानन वानखेडे, पुरुषोत्तम गजभिये, अमोल गौरखेडे, ललित हिवसे, निलेश पेठे, धनराज तुमडाम, अरबाज शेख, अभिनय सातपुते, दिनेश दुपारे, आकाश रंगारी, भीमराव मनोहर, सुनील गायकवाड, वसीम शेख, गिरीश शेंडे, कृष्णा ठाकरे, भोजराज मोहरीया, डॉ. गजभिये, आनंद बंड, रवींद्र आहाके, समशेर मलाधारी, रामदास वानखेडे, नामदेव तागडे, ज्ञानेश्वर मुंदाफळे, महेश राऊत, बन्सी राजपूत, स्वप्निल तागडे, राजेंद्र ठाकरे, शुभम गेडाम, यांच्यासह शेकडोच्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# भगवान विश्वकर्मा आणि प्रबोधनकार ठाकरे यांना महावितरणचे अभिवादन




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

प्राणीसृष्टीचे जनक, देवतांचे दिव्य शिल्पकार, आणि वास्तुविशारद भगवान विश्वकर्मा आणि जेष्ठ साहित्यीक, पत्रकार थोर समाजसुधारक, वक्ते आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील प्रभावी नेतृत्व श्री केशव सीताराम ठाकरे उर्फ. प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त महावितरणतर्फे. या दोन्ही विभुतींना अभिवादन केले.

महावितरणच्या काटोल मार्गावरील विद्युत भवन या नागपूर परिमंडल मुख्यालयात मूख्य अभियंता दिलीप दोडके आणि अधीक्षक अभियंता संजय वाकडे यांनी भगवान विश्वकर्मा आणि केशव सीताराम ठाकरे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन केले, यावेळी महानिर्मितीचे उपमुख्य अभियंता अंकुर जोशी, महावितरणचे सहायक महाव्यवस्थाप्क (मानव संसाधन) महेश जाधव, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, प्रणाली विश्लेषक प्रविण काटोले, उप व्यवस्थापक (वित्त व लेखा) नेहा पोकळे, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर यांच्यासह महावितरण आणि महानिर्मितीचे अधिकारी व अभियंते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानाचा मनपाद्वारे शुभारंभ

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :**

केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या स्वस्थ नारी, सशक्त परिवार या विशेष राष्ट्रीय अभियानाचा बुधवारी (ता.१७) नागपूर शहरात नागपूर महानगरपालिकेच्या नंदनवन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामधून शुभारंभ झाला. इंदौर, मध्य प्रदेश येथे मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते या अभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ झाला. त्याचे थेट प्रक्षेपण आरोग्य केंद्रामध्ये करण्यात आले.



मनपाच्या नंदनवन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये याप्रसंगी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, मनपाचे माजी विरोधी पक्षनेते तानाजी वनवे, माजी उपमहापौर मनीषा कोठे, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. सरला लाड, साथरोग अधिकारी डॉ. गोवर्धन नवखरे, नेहरूनगर झोनचे झोनल वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन पवाने, नंदनवन आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रेयस खेमुका, माधव नेत्रालयाचे संचालक सुधाकर गोखले, किशोर कुंभार,राजेंद्र भोयर आदी उपस्थित होते.

स्वस्थ नारी, सशक्त परिवार या अभियानाचा मुख्य उद्देश देशभरातील ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये महिला आणि मुलांसाठी तपासणी व विशेषज्ञ आरोग्य शिबिरे आयोजित करणे आहे. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान संपूर्ण देशभर राबविण्यात येत असलेल्या या अभियाना अंतर्गत मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात मनपाच्या १६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये महिलांसाठी विशेष आरोग्य शिबीर आयोजित करण्यात येत आहेत. या शिबिरांसाठी मनपाला एम्स नागपूर, आयएमए, भारतीय प्रसूती आणि स्त्रीरोग संस्था महासंघ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, माधव नेत्रालय, एचसीजी कॅन्सर इन्स्टिट्यूट यासह इतर हॉस्पिटल्स आणि वैद्यकीय संस्थांचे सहकार्य आहे. नंदनवन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामधील शिबिरामध्ये २५५ महिलांनी नोंदणी केली. मनपाच्या आरोग्य चमुसह मनपा दंत रुग्णालय सदर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल)चे मानसोपचार तज्ज्ञ व त्वचा रोग तज्ज्ञ, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालयाचे तज्ज्ञ, माधव नेत्रालयचे तज्ज्ञांनी संबधित रुग्णांची तपसणी केली. याशिवाय कुष्ठरोग विभाग, बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय नागपूर शहर पूर्व द्वारे पोषण याबाबत जनजागृती करण्यात आली. शिबिरामध्ये भाऊसाहेब मुळक नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थिनींनी पथनाट्य सादर केले. मनपाच्या आशा सेविकांद्वारे ९५ महिलांचे प्रधानमंत्री आयुष्यमान भारत जनआरोग्य योजना कार्ड तयार करण्यात आले. शिबिरात ५ जणांनी रक्तदान केले. क्षयरोग विभागाद्वारे ३० महिलांचे एक्स रे काढण्यात आले. १०७ महिलांची नेत्र तर ५९ महिलांची दंत तपसणी करण्यात आली.

या शिबिरांमध्ये विविध आरोग्य सेवा पुरवल्या जात आहेत. यामध्ये महिलांचे उच्च रक्तदाब आणि मधुमेहाच्या निदानासाठी तपासणी, तोंडाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या निदानासाठीची तपासणी केली जाते. जोखीम असलेल्या महिलांसाठी क्षयरोग तपासणी, किशोरवयीन मुली आणि महिलांसाठी ॲनिमिया (रक्तक्षय) तपासणी आणि समुपदेशन करण्यात येते. गर्भवती महिलांसाठी प्रसूतिपूर्व काळजी तपासणी व समुपदेशन, हिमोग्लोबिन तपासणी, तसेच पोषण आणि काळजी यावर समुपदेशन आणि बालकांचे आवश्यकतेनुसार लसीकरण केले जाते. आयुष सेवा च्या अंतर्गत आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, युनानी, सिध्द व नॅचरोपॅथी इत्यादी पर्यायी उपचार पध्दतींची सेवा गरजू रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे. किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळीची स्वच्छता आणि पोषणाविषयी जागृती सत्र घेण्यात येतात.

क्षयरुग्णांना दत्तक घेऊन त्यांना पोषक आहार उपलब्ध करुन देण्यासाठी आणि क्षयरोगाविरुध्द जन आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी दानशुर व्यक्ती, संस्था आणि संघटनांना निक्षय मित्र बनवून सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते निक्षय मित्रांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात असंसर्गजन्य आजार व अवयव दान बाबत शपथ देखील घेण्यात आली.

# तनाएराचे नवे फेस्टिव्ह कलेक्शन 'मियारा'

## सणासुदीत विशेष ऑफर्स आणि अनोखी स्वप्नपूर्तीचा आनंद




■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :**

महिलांचा एथनिक वेयर ब्रँड आणि टाटा परिवारातील एक सदस्य, तनाएराने प्रस्तुत केले आहे. नवे फेस्टिव्ह कलेक्शन 'मियारा' हाताने विणलेले आणि शुद्धतेमध्ये रुजलेले हे कलेक्शन आधुनिक महिलांसाठी तयार केले आहे.

आधुनिक डिझाईन आणि पारंपरिक कला यांच्या अप्रतिम विणीतून एक आगळीवेगळी डिझाईन भाषा तयार होते. जी या कलेक्शनला इतरपेक्षा वेगळे स्थान प्रदान करते. विविध प्रकारचे रेशीम आणि सूत, विविध विणकाम परंपरा 'मियारा' मध्ये पाहायला मिळतात.

तनाएराने आपले नवे कॅम्पेन देखील तयार केले आहे, 'द गिफ्ट ऑफ प्युअर लव्ह', सणासुदीच्या काळात साडी म्हणजे कालातीत प्रेमाचे प्रतीक असा साडीचा सन्मान या कॅम्पेनमध्ये करण्यात आला आहे.

खरेदीवर ब्रँडने विशेष फेस्टिव्ह ऑफर्स सुरु केल्या आहेत, यामध्ये गिफ्ट व्हाउचर्स आणि गोल्ड कॉईन्स आहेत. १०,००० रुपयांच्या प्रत्येक खरेदीसोबत ग्राहकांना मिळेल १,००० रुपयांचे व्हाउचर जे पुढील खरेदीच्या वेळी रिडीम करता येईल. ५०,००० किंवा त्यापेक्षा जास्तीची रुपयांची खरेदी केल्यावर ०.२ ग्रामचे तनिष्क गोल्ड कॉईन भेट म्हणून मिळेल. मर्यादित कालावधीच्या या ऑफरचा लाभ २० ऑक्टोबर २०२५ पर्यंत घेता येईल.

तनाएचे रिटेल प्रमुख, अनिर्बन बॅनर्जी म्हणाले, "यंदाच्या सीझनसाठी आम्ही प्रस्तुत केलेले मियारा कलेक्शन हे कल्पनेचे आणि वैविध्यपूर्ण विणकामातून प्रदर्शित होणाऱ्या वारशाचे प्रतिबिंब आहे.

# हिंगणा एमआयडीसी महिंद्रा अँड महिंद्रा उद्योगात

## औद्योगिक रासायनिक आपत्तीवरील ऑफसाईट आपत्कालीन मॉक ड्रिल

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १७ :**

गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्या अधिपत्याखालील महासंचालक तसेच जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या निर्देशानुसार, लेवल-3 ऑफसाईट आपत्कालीन मॉकड्रिल महिंद्रा अँड महिंद्रा लि., एमआयडीसी हिंगणा, नागपूर येथे यशस्वीरीत्या पार पाडण्यात आली. या सरावाचा मुख्य उद्देश म्हणजे औद्योगिक रासायनिक आपत्तीच्या प्रसंगी आपत्कालीन तयारी व समन्वयित प्रतिसाद यंत्रणा कितपत प्रभावी आहेत, याचे मूल्यांकन करणे होय.




या सरावामध्ये, महिंद्रा अँड महिंद्रा लि.च्या गेट क्रमांक 3 जवळील 30 मेट्रिक टन क्षमतेच्या (दोन माऊंडेड बुलेट्स) प्रोपेन यार्ड मध्ये प्रोपेन गॅस गळती व त्यानंतर लागलेली आग असा प्रसंग निर्माण करण्यात आला. परिस्थिती वेगाने बिघडत गेली आणि कारखाना परिसरात 7 जण जखमी झाले. तसेच शेजारील व्यावसायिक व निवासी क्षेत्रात धोकादायक परिणाम दिसू लागले. या परिस्थितीत जिल्हा प्रशासनाचा हस्तक्षेप व ऑफसाईट आपत्कालीन योजना सक्रिय करणे आवश्यक झाले.

या मॉक ड्रिलमध्ये विविध आपत्कालीन व सहाय्यक यंत्रणांचा उत्साही सहभाग होता. त्यामध्ये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी अंकुश गावंडे, एनडीआरएफचे कृपाल मुळे व 26 सदस्यांची टीम, एसडीआरएफचे 10 सदस्य, स्थानिक पोलीस विभागाचे 7 सदस्य, नागपूर महानगरपालिका, अग्निशमन वाहनासह 5 सदस्यांची टीम, एमआयडीसी अग्निशमन दलाचे अग्निशमन वाहनासह 6 सदस्यांची टीम, आरोग्य विभागाचे सदस्य व 2 रुग्णवाहिका, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे अधिकारी, महिंद्रा अँड महिंद्रा आपत्कालीन प्रतिसाद पथकाचे अग्निशमन वाहन व रुग्णवाहिका यांचा सहभाग होता.

हा सराव उत्साह, समन्वय आणि बांधिलकीने पार पडला. पथकांनी वेळेवर संपर्क, अग्निशमन, बचाव कार्य व वैद्यकीय मदत केली. जिल्हा व औद्योगिक आपत्कालीन यंत्रणा प्रभावीपणे सक्रिय झाल्या होत्या.

या सरावास डीआयएसएचचे अतिरिक्त संचालक (प्रभारी) जयंत मोहोरकर, उपसंचालक माधव रत्नपारखी, अभिजित पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी अंकुश गावंडे, महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीचे संयंत्र प्रमुख नितीन वैद्य या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व देखरेख लाभली. या लेवल-3 ऑफसाईट आपत्कालीन मॉक ड्रिलद्वारे ठरवलेली उद्दिष्टे यशस्वीरीत्या साध्य झाली असून, नागपूर विभागातील औद्योगिक रासायनिक आपत्ती व्यवस्थापनासाठीची आपत्कालीन तयारी अधिक मजबूत झाली आहे.

# २ ट्रकमध्ये धडक, एक चालक ठार

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १७ :**

आऊटर रिंगरोडवर वेळाहरी परीसरात दोन ट्रकांमध्ये जबर धडक होऊन एका ट्रकच्या चालकाचा मृत्यू झाला. आरिफ सुब्बी खान (३८) रा. डिग, राजस्थान असे मृताचे नाव आहे. आरिफ आयटीएस कंपनीत कामाला होता. बिलासपूर येथून ट्रक क्र. एचआर-५५/एएक्स-२२३७ मध्ये माल भरून बंगळुरूला जात होता. आऊटर रिंगरोडवर वेळाहरी परिसरात त्याने समोर जात असलेल्या ट्रक क्र. जीजे-०३/बीव्ही-७३२५ ला जबर धडक दिली. यात आरिफच्या ट्रकचे कॅबिन पूर्णतः चक्काचूर झाले आणि तो आतमध्येच अडकून पडला. नागरिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिस घटनास्थळी पोहोचले, मात्र तोपर्यंत आरिफचा मृत्यू झाला होता.

# गुन्हेगारासह बँक संचालकावर गुन्हा दाखल

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १७ :**

शासकीय कंत्राटदार पेनमाचा उर्फ मुन्ना वर्मा (६१) यांच्या आत्महत्या प्रकरणाला नवीन वळण आले आहे. पोलिसांनी या प्रकरणात पूसद अर्बन कोऑपरेटिव्ह बँकेचे संचालक शरद अप्पा मैंद आणि चर्चित गुंड मंजीत वाडे याला अटक केली आहे. या प्रकरणात शरदची पत्नी भारती मैंद आणि इतर आरोपींचा सहभाग असल्याचे पुढे आले आहे. मात्र सध्या मैंद आणि वाडे यालाच अटक झाली आहे. या लोकांनीच वर्मा यांना कर्जात बुडवले आणि नंतर वुसलीसाठी इतका छळ केला की, वर्मा यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले.

साई असोसिएट कंस्ट्रक्शन कंपनीचे संचालक वर्मा यांनी गत १ सप्टेंबर रोजी राजनगरच्या शंखनाद अपार्टमेंटमधील राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली होती. पोलिसांनी या प्रकरणात अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला होता. तपासादरम्यान पोलिसांच्या लक्षात आले की, वर्मा यांचा मोबाईल फोन आत्महत्येपासूनच गायब होता. त्यामुळे संशय वाढत गेला. वर्मा यांची पत्नी अनुराधा यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबात सांगितले की, २०१२ मध्ये त्यांचे पती मुन्ना यांनी पूसद अर्बन कोऑपरेटिव्ह बँकेतून कर्ज घेतले होते. कर्जाचे हफ्ते व्याजासह नियमित भरत होते, मात्र काही दिवसानंतर त्यांची आर्थिक परिस्थिती खालावली. ते कर्जाचे हफ्ते भरण्यात असमर्थ ठरले. या कर्जाची परतफेड करण्यासाठी बँक संचालक शरद मैंद यांनी त्यांना जाळ्यात अडकवले. एका कर्जाची परतफेड करण्यासाठी दुसरे कर्ज घेण्यास बाध्य केले. अशाप्रकारे मुन्ना यांच्यावर कर्जासोबतच व्याजाचे ओझे वाढतच चालले होते. मैंद याच्या बोलण्यात येऊन मुन्ना आपली मालमत्ता गहाण ठेवत बँकेतून कर्ज घेत होते. त्यांच्यावर व्याजासह दंड लावून कर्जाची रक्कम वाढविण्यात येत होती. नंतर मैंद याने त्यांची भेट काही लोकांशी घालून दिली. त्यांच्या कागदपत्रांवर कर्ज घेण्यासाठी बाध्य केले. कर्जाची रक्कम संबंधितांना मिळत होती. काही रक्कम मैंद स्वतःकडे ठेवून घेत होता. मात्र त्या कर्जांचे हफ्तेही तो मुन्ना यांच्याकडूनच वसूल करीत होता. याच दरम्यान मंजीत वाडेही त्यांच्या संपर्कात आला. तो अवैध सावकारी करतो आणि लोकांना कर्ज देऊन बक्कळ व्याज वसूल करतो. वाडे हा ट्रांस्पोर्टर बॉबी माकन हत्याकांडातही आरोपी होता. वाडे याने सुद्धा कर्जाच्या पैशांसाठी वर्मा यांना त्रास देण्यास सुरूवात केली होती. मुन्ना यांना सतत धमकी मिळत होती. वाडेचे लोक कोणत्याही वेळी घरी आणि कार्यालयात धडकत होते.

# अंमली पदार्थासह दोघांना अटक

**नागपूर :** कळमना पोलिसांनी गस्ती दरम्यान दोन आरोपींना अंमली पदार्थासह अटक केली. पोलिसांनी आरोपींकडून अंमली पदार्थासह १५ लाख रुपये किंमतीची कारही जप्त केली. अमित लज्जाराम शर्मा (४४) रा. दारोडकर चौक आणि मुकेश निरंजन कराडे (४७) रा. वसंतनगर, अजनी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. कळमना पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान मिनी मातानगरात वरील आरोपी एमएच-४९/सीएफ-७२१४ क्रमांकाच्या कारजवळ संशयास्पदरित्या उभे असल्याचे दिसले. त्यांची झडती घेतली असता प्लॅस्टिकच्या पिशवित ५.३० ग्रॅम मेफेड्रॉन ड्रग्ज मिळाले.

# तोतलाडोह आणि पेंच धरणाचे दरवाजे उघडले

■ **महासागर प्रतिनिधी कन्हान, दि. १७ :**

तोतलाडोह आणि नवेगांव खैरी पेंच धरणाचे दरवाजे उघडल्याने कन्हान नदीच्या पाणी पातळीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने नदी काठावरील गावांना सर्तकतेचा ईशारा दिला आहे.



पारशिवनी तालुक्यात सह ग्रामीण भागात मागील काही दिवसान अधुन मधुन दमदार पाऊस सुरु आहे. तोतलाडोह आणि नवेगांव खैरी पेंच धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुद्धा दमदार पाऊस झाल्याने आणि मध्यप्रदेशील चौराई धरणाचे दरवाजे उघडल्याने तोतलाडोह आणि पेंच धरणाच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. धरण सुस्थितीत राखण्याकरिता आणि परिस्थिति नियंत्रणा करिता मंगळवार (दि.१७) सप्टेबंर पासुन तोतलाडोह आणि पेंच धरणाचे दरवाजे उघडले आहे. दिवसभर, रात्रभर आणि बुधवार (दि.१७) सप्टेबंर रोजी सायंकाळ पर्यंत धरणाचे दरवाजे सुरुच असुन त्यातुन पाण्याचा विसर्ग कन्हान नदी पात्रात सुरु असल्याने कन्हान नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली असुन नदी दुधळी भरुन वाहत आहे. बातमी लिहण्यापर्यंत धरणाचे दरवाजे सुरुच असुन नदी पात्राच्या पाणी पातळीत वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे नदी काठावरील गावांना आणि नदी पात्रातुन आवागमन करणाऱ्या नागरिकांनी स्वताची काळजी घ्यावी आणि नागरिकांनी नदी पात्रात जाण्याचे टाळावे असे कडकडीचे आव्हाहन तोतलाडोह धरण अधिकारी देवेंद्र महादुले, नवेगांव खैरी पेंच जलाशय शाखा अधिकारी सुमित लोखंडे यांनी केले आहे.



**नागपूर :** येत्या सोमवारपासून नवरात्रोत्सवाला आरंभ होत असून, अनेक सार्वजनिक मंडळांच्या वतिने दुर्गोत्सव साजरा केला जाणार आहे. त्यासाठी मुर्तीकारांकडून दुर्गा मातेच्या आकर्षत मुर्त्या तयार केल्या जात असून, रंगरंगोटी देखील करण्यात आली आहे.

# हिंगण्यात मुख्यमंत्री समृद्धी पंचायत राज अभियानाचा शुभारंभ



■ **महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. १७ :**

तालुक्यात आजपासून मुख्यमंत्री समृद्धी पंचायत राज अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.यात सर्व ग्रामपंचायत नी सहभाग नोंदवला व कार्यक्रमाचे आयोजन केले. ग्रामपंचायत किरमीटी भारकस येथे माजी जिल्हा परिषदचे माजी विरोधी पक्षनेते आतिश उमरे, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप गोडशलवार, विस्तार अधिकारी जीवन देशमुख, सरपंच रोशनी उमरे उपसरपंच अतुल गावंडे, कृषी अधिकारी ओंकार मेश्राम, पंचायत विस्तार अधिकारी जीवन देशमुख, शेषराव चव्हाण, गट ग्रामपंचायत अधिकारी पुनम पांडे, ग्राम पंचायत सदस्य शोभा भिसे, कुसुम उईके, राखी खडसे, सपना गायकवाड, राधा सयाम, सुरेंद्र गायकवाड, भूषण निखाडे, धीरज गायकवाड, महादेव उईके, पवन गायकवाडू (उपाध्यक्ष हिंगणा महामंडळ), उच्च प्राथमिक शाळेचे शिक्षक उमेश आष्टणकर, अविनाश महाजन व गावकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या अभियानाच्या उदघाटनाचे थेट प्रक्षेपण दाखवण्यात आले. याशिवाय तालुक्यातील सर्व ग्राम पंचायत मध्ये हा कार्यक्रम घेण्यात आला. गटविकास अधिकारी संदीप गोळशलवार,महिला व बालविकास अधिकारी सुशांत गाडेवार यांनी काही गावातील विशेष सभेला भेटी दिल्या.

**महासागर प्रभाग वार्ता**

# पाटणकर चौक ते सन्याल नगर सिमेंट रस्त्यावर भेगा

## वाहनचालकांचे हाल

**प्रभू गजभिये, नागपूर दि.१७**

प्रभाग क्रमांक २ मधील पाटणकर चौक ते सन्याल नगर या दरम्यान सिमेंट रस्त्यावर मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या असून, पावसाळ्यात या रस्त्यावर पाणी साचल्यामुळे वाहनचालकांना घसरगुंडीचा सामना करावा लागत आहे. परिणामी अपघाताचे प्रमाण वाढले असून नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.



या रस्त्याचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असून, दररोज शेकडो दुचाकी, चारचाकी वाहने याच रस्त्यावरून ये-जाकरतात. मात्र सध्या रस्त्यावर भेगा पडल्याने व पाणी साचल्याने गाडी घसरून अपघात होण्याच्या घटना घडत आहेत. विशेषतः संध्याकाळी व रात्री याचा त्रास अधिक जाणवतो. स्थानिक रहिवासी प्रवीण पाटील यांनी सांगितले की, ''या रस्त्याचे काम झाले अवघ्या काही महिन्यांपूर्वीच. एवढ्या कमी कालावधीत रस्ता खराब होणे म्हणजे निकृष्ट दर्जाचे काम झाले असावे, असा संशय आहे.''

या रस्त्याच्या त्वरित दुरुस्तीची मागणी करताना अजय मेश्राम, पद्माकर पाटील, भूषण नाईक, संदीप चौधरी, अंबरीश रामटेके, सुधीर खोब्रागडे, शशी जांभुळकर, युवराज सोनारे, सतीश जांभुळकर आदींनी प्रशासनाकडे निवेदन सादर करण्याचा इशारा दिला आहे.

नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने व वाहतूक सुरळीत करण्यासाठी या रस्त्याचे तातडीने डागडुजीचे काम हाती घेण्यात यावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

# विद्याविहार मैदानाशेजारी कचऱ्याचे साम्राज्य; नागरिक त्रस्त, प्रशासन गप्प

**प्रमोद जांभूळकर, नागपूर दि.१७**

(प्रभाग क्रमांक ४, लक्ष्मीनगर झोन): इन्कम टॅक्स कॉलनीतील गायत्री भोजनालयाच्या मागे, प्लॉट क्रमांक ९ (कुलकर्णी व दिनेश गोरखेडे यांच्या शेजारी) असलेल्या विद्याविहार मैदानाजवळ सध्या कचऱ्याचा प्रचंड ढिगारा उभा राहिला आहे. या वाढत्या अस्वच्छतेमुळे परिसरातील नागरिक हैराण झाले असून, त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.



रहिवासी मनोज रक्षक यांच्यानुसार स्वच्छता कर्मी दररोज झाडू मारून याच ठिकाणी कचरा साठवतात. त्यात भाजी विक्रेते आणि काही स्थानिक रहिवासीही आपला घरगुती कचरा टाकतात. परिणामी परिसरात प्रचंड दुर्गंधी निर्माण झाली आहे.कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर कुत्रे, गायी यांची वर्दळ असून, त्यामुळे कचरा आसपास पसरतो. त्यातून माशा, डासांची उत्पत्ती होऊन डेंग्यू, मलेरिया, टायफॉइड यांसारख्या आजारांचा धोका वाढत आहे. मुलांना मैदानात खेळणे अशक्य झाले आहे. उद्या जर कोणी आजारी पडले, तर त्याला जबाबदार कोण?असा संतप्त सवाल स्थानिक रहिवासी डॉ. जगताप यांनी उपस्थित केला आहे.सध्या या ठिकाणी कचरा संकलनाची किंवा विल्हेवाट लावण्याची कोणतीही ठोस व्यवस्था करण्यात आलेली नाही. नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी केल्या असल्या तरीही प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे स्पष्ट होत आहे.परिसरातील रहिवासी कुलकर्णी, दिनेश गोरखेडे, यशवंत रक्षक, अमित घरलुटे, हेमंत रक्षक यांनी नागपूर महानगरपालिकेच्या लक्ष्मीनगर झोन अंतर्गत येणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित या प्रश्नाकडे लक्ष देऊन ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी केली आहे.